अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

जून २०१४ | किंमत १५ रुपये



सळ सळ सळ पाऊस कोसळे
हिरवाळुन हे मळे









## 'लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा' **पुस्तक प्रकाशन सोहळा**




धनंजय बिजले लिखित 'लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ समाजसेवक आदरणीय अण्णा हजारे यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी प्रकाशक श्री. सुनील मेहता, लेखक श्री. बिजले, मा. श्री. अण्णा हजारे, खासदार श्री. राजू शेट्टी आणि श्री. विश्वंभर चौधरी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

**Cash on Delivery ही सुविधा महाराष्ट्रात खालील शहरांमध्ये उपलब्ध !**

| | | |
|---|---|---|
| अकोला | बुटिबोरी | भिवंडी |
| अमरावती | नाशिक | वसई |
| अहमदनगर | नांदेड | उल्हासनगर |
| औरंगाबाद | पुणे | कल्याण |
| कणकवली | पिरंगूट | शहापूर |
| कराड | पिंपरी | पनवेल |
| कोल्हापूर | पंढरपूर | कळंबोली |
| चन्द्रपूर | बारामती | लातूर |
| चिपळूण | मुंबई | सातारा |
| जळगाव | वाशी | सांगली |
| नागपूर | ठाणे | सोलापूर |

# मेहता मराठी ग्रंथजगत

जून २०१४ वर्ष चौदावे अंक सहावा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ६ |
| साहित्यवार्ता | १० |
| पुरस्कार | ५८ |
| पुस्तक परिचय | ६८ |
| सेंड देम टू हेल | |
| एल्मर आणि विल्बर | |
| लढा लोकपालचा | |
| श्रद्धांजली | १०४ |
| बालनगरी | ११० |

मांडणी-अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन :०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com

डिजिटल अंकाची वर्गणी

तीन वर्षांची ३००रु. पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संवाद.....

वाचकहो,

पाऊस आधी अंगणात ओली पावले टाकत येतो, मग झिम्मड झपाटले डोंगर, दऱ्या झाकत येतो.

'अचानक आकाशात मेघांची गर्दी व्हावी. काहीतरी गुजगोष्टी करीत उत्सवाची सुरुवात व्हावी. नकळत आभाळातून एक सर कोसळावी, चिंब भिजत ओठावर सुरावटीची धुन चढावी.' जणू हीच भावना सोबत घेऊन 'जून' चे आगमन होते.

'ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट,<br>
गारठलेल्या संध्याकाळी, हिरवीचिंब पायवाट<br>
कोणासाठी गर्द गहिरा, कोणासाठी हिरवे रान<br>
पाऊस म्हणजे वेगळीच धुंदी, हरवून जाई मनाचे भान'

चार महिने उन्हाची काहिली सहन करत चातकाप्रमाणे वाट पाहणाऱ्या जीवांसाठी मृगावर पडणारा पाऊस जणू चैतन्याची एक लाटच घेऊन येतो. कवींचा सर्वात आवडता ऋतू. कविता आणि पावसात प्रेमात पडणे, प्रथम अव्यक्त पण नंतर एकमेकांकडे व्यक्त होणे. नंतरचा दुरावा, विरह... यातूनच जन्म होतो. 'मेघदूत' सारख्या काव्याचा, तर असा हा पाऊस प्रत्येकासाठीच खास असतो. कितीतरी भावना, आठवणी या पावसाशी निगडीत असतात.

दोघांनी मिळून अनुभवलेला पहिला पाऊस, बदलीच्या नव्या शहरातला नकळत भिजवणारा पाऊस. लग्नानंतर पहिल्यांदाच सासरच्या मंडळीबरोबर चिंब पावसात केलेली भटकंती. जन्मानंतर इवलुश्या हातात गच्च धरून ठेवलेला पहिल्या पावसाचा पहिला टपोरा थेंब... अशा एक ना अनेक आठवणी सरींबरोबर मनातून ओघळतात. कदाचित ते क्षण त्याच थेंबांबरोबर कधीच विरून गेले असतील पण, अशा आठवणींचा गंध अजूनही मनाच्या कोणत्यातरी कोपऱ्यात दरवळत असतो. तर आम्हालाही आवडेल तुमच्या या अशा गंधात न्हाऊन जायला. तुम्हीही तुमचा असा एखादा अनुभव, पावसाळ्यातील न विसरता येणारा एखादा क्षण, एखादा प्रसंग, एखादे पुस्तक, सिनेमा किंवा केवळ खिडकीतून कोसळणारा पाऊस बघत, वाफाळणाऱ्या कॉफीच्या कपासोबत केवळ स्वान्त सुखायः म्हणून केलेले लेखन आम्हास ई-मेल ने पाठवू शकता.

आपले लेखन ई-मेल ने खालील पत्त्यावर पाठवा –

mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखनाचा अंकात समावेश करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत,

मेहता मराठी ग्रंथजगत

१) पावसाळी ट्रिप : कॉलेजमध्ये नवीनच झालेल्या मित्रांबरोबर चिंब पावसात केलेली 'Bike Ride'

आपल्या आयुष्यात पावसाची सर
नवीन चैतन्याचा गारवा,
आपलेपणाचा ओलावा आणि
सुखाची नवी हिरवळ पसरवो
हीच ''श्री चरणी प्रार्थना''
।। पहिल्या पावसाच्या हार्दिक शुभेच्छा ।।






# माध्यमांचा प्रभावी वापर

सोशल मिडिया, टीव्ही चॅनल्स, वृत्तपत्रे व जाहिराती, फेसबुक, ट्विटर वगैरेंचा मोठ्या प्रमाणावरील वापर किती प्रभावी ठरतो, हे यावेळच्या लोकसभा निवडणुकीने दाखवून दिले आहे. मार्केटिंगचे हे एक उत्तम उदाहरण ठरेल.

मे २०१४ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये नरेंद्र मोदी यांनी ५४३ पैकी ३३३ जागा भाजप आणि मित्रपक्षाला मिळवून दिल्या. १९८४ नंतर प्रथमच कोणा एका पक्षाला निर्विवाद बहुमत मिळवून पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेता आली. यावेळच्या निवडणुकीला एक विशिष्ट पार्श्वभूमी होती. मनमोहन सिंह-सोनिया गांधी यांच्या दुसऱ्या टर्ममध्ये भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे बाहेर आली. अण्णा हजारे यांच्या लोकपाल विधेयकाच्या संदर्भातील उपोषणाने देशात सर्वत्र तरुण वर्ग आणि मध्यमवर्ग संघटित झाला. कांद्याचे भाव भरमसाट वाढले. त्यामुळे या लढ्याची ठिणगी पडली. भाजीपाला, अन्नधान्य, पेट्रोल-डिझेल, रेल्वे-बस वाहतूक, सर्वच क्षेत्रात दरवाढझाली. त्यामुळे सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या विरोधात जनमत एकवटत गेले. कुठल्याच बाबतीत ठाम निर्णय घेण्याऐवजी प्रश्न चिघळत ठेवले गेले. त्यामुळे लोक वैतागले. दरम्यान आम आदमी पक्षाच्या दिल्लीतील यशाने अनेकांच्या आशा पल्लवित झाल्या. पण केजरीवालांच्या नवखेपणामुळे त्यांची एकूणच खेळी हास्यास्पद ठरली. गेली दोन वर्षे भारतातील प्रशासन अर्थकारण, समाजकारण, परराष्ट्रसंबंध सर्वच बाबतीत कमालीची घसरण झाली. नव्या तंत्रज्ञानाचा घाईगर्दीने केलेला वापर, 'आधार कार्ड' निगडित एलपीजी सिलिंडरवरील अनुदान परस्पर बँकखात्यावर जमा

करण्याचा प्रयोग सर्वांनाच तापदायक ठरला. पूर्वलक्षी प्रभावाने करआकारणीचा निर्णय परदेशी गुंतवणुकीला खीळ घालणारा ठरला आणि अशावेळी अर्थतज्ज्ञ मनमोहनसिंह यांनी मौनव्रत धारण करून स्वत:ची भूमिका ठामपणे राबविण्याऐवजी प्रत्येक बाबतीत सुप्रीम कार्टाकडे धाव घेण्यात धन्यता मानली. मंत्रीमंडळाऐवजी सुप्रीमकोर्टच देशाचा कारभार चालवत आहे की काय, अशी शंका यावी इतपत राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाची लक्तरे सर्वत्र लटकू लागली.

अशा वेळी परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् कोणीतरी अवतार घेतोच अशी भगवद्गीतेने आपल्या भारतीयांना जन्मोजन्मीची हमी देऊन ठेवलेली आहेच. त्यामुळे गुजरातच्या मुख्यमंत्रीपदावरून दहा वर्षे, प्रशासकीय, राजकीय अनुभव घेतलेल्या नरेंद्र मोदी यांनी गोधरा कांड वगैरे वादग्रस्त प्रकरणांना मागे टाकून 'मीच भारताचा भावी पंतप्रधान' अशी सप्टेंबर २०१३ मध्ये स्पष्ट घोषणा करून पुढच्या आठ महिन्यात पद्धतशीरपणे दौरे करून, आपली भारताच्या अभ्युदयाची कल्पना मतदारांना विशद केली. पक्षातील अडवाणी, सुषमा स्वराज, अरुण जेटली वगैरेंना आणि संघाच्या बुजुर्गांना आपल्याविना पर्याय नाही हे हस्ते-परहस्ते पटवून देऊन, नव्या तंत्रज्ञानाचा आणि माध्यमांचा कल्पकतेने वापर करून देशभर 'अबकी बार मोदी सरकार' हा संदेश पोचवला. टेलिव्हिजनचे चॅनेल्स, फेसबुक, ट्विटर, वृत्तपत्रे, जाहिराती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राज्याराज्यातले शिस्तबद्ध नेटवर्क वगैरेंचा मोठ्या प्रमाणावर वापर करून अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीच्या धर्तीवर, सोशल माध्यम तज्ज्ञ आणि सल्लागार यांच्या मार्गदर्शनाच्या चौकटीत राहून आठ महिने नेटाने प्रचार मोहिम राबवली. माध्यमांचा इतका प्रभावी वापर भारतीय निवडणुकीत या वेळी प्रथमच झाला. या वेळी प्रचारासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. एवढा प्रचंड पैसा कुठून आला हा प्रश्न येथे गैरलागू ठरतो. सध्या भूखंडांचे वाटप, कोळसा खाणींचे वाटप, विविध अनुदाने, लष्करासाठी होणारी खरेदी आणि त्यात मिळणारी दलाली– उगाच नाही भारतीय श्रीमंतीचे तेज जगभर झळाळत! महासत्ता म्हणजे महान संधी, तर निवडणुकीसाठी काही हजार कोटींची उलाढाल ही एक प्रचंड लाट असते.

तेव्हा कोणत्या पक्षाने किंवा नेत्याने किती निधी उभा केला याचा हिशेब करण्यात आपण सामान्य मतदारांनी कशाला आपले तर्कवितर्क करीत बसावे? भाजपाने आणि नरेंद्र मोदींनी आपले मार्केटिंग पॅकेज योग्य प्रकारे उपयोगात आणून अभूतपूर्व यश मिळवले ही गोष्ट महत्त्वाची! माध्यमांचा वापर इतक्या मोठ्या प्रमाणावर भारतात निवडणुकीमध्ये प्रथमच झाला आणि तो अपेक्षेपेक्षाही जास्त फलदायी ठरला हे मान्य करायलाच हवे.

नवे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी भारतात विकासाचे नवे मॉडेल कसे कार्यान्वित करतात हे महत्त्वाचे ठरेल.

ग्रंथप्रकाशन क्षेत्रात माध्यमांचा वापर अपरिहार्य असतो. प्रिंट मिडिया आणि डिजिटल मिडिया या दोहोंमध्ये स्पर्धा हवी, त्याचप्रमाणे समन्वयही हवा. जास्तीत जास्त वाचक-ग्राहक-प्रेक्षक-रसिक यांच्यापर्यंत पोचण्यासाठी, मनोरंजन उद्योगाची उलाढाल वाढवण्यासाठी सृजनशील कल्पकता हवी. नित्य नव्या कल्पनांना या क्षेत्रात मोठा वाव आहे. पुस्तक प्रकाशन, वृत्तपत्र प्रकाशन, चित्रपट टीव्ही, संगीताचे ध्वनिमुद्रण, इंटरनेट, सोशल मिडिया हा सर्व मार्केटिंगचा महाखेळ आहे. या महाखेळात आता निवडणुकींचा आणि इव्हेंट मॅनेजमेंटचा वरचष्मा अटळ आहे.माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याप्रमाणे मौन राखून आपल्या चांगल्या कामाचे मार्केटिंग करण्यात कमी पडलो. असे आता होणार नाही असे वाटते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाबद्दल भारतीय जनतेच्या आकांक्षा गगनाला गवसणी घालणाऱ्या आहेत. तशा त्या असणेही स्वाभाविक आहे. भारतीय जनतेला प्रत्येक बाबतीत समृद्धी, संपन्नता हवी आहे. तीही अगदी नजीकच्या काही दिवसात अशी घाई सर्वांना झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या अपेक्षा मर्यादित होत्या. शिक्षणाच्या सोयी नव्हत्या, कारखाने नव्हते, रोजगाराच्या संधी अत्यंत अल्प होत्या. शेती पावसावर अवलंबून असल्याने धान्याचे उत्पादन बेभरवशाचे होते. वाहतुकीची साधने कमी होती. रस्ते नव्हते. गरीबी हटाव वगैरे नारा देऊन मते मिळत होती. परंतु जागतिकीकरणानंतर माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रगतीनंतर, वाहतूक साधनांच्या विस्तारानंतर जीवनविषयक अपेक्षा वाढल्या. पगार वाढले. शिक्षणसंस्थांचे पेव फुटले. आता सर्वांनाच सर्व सुखसोयी झटपट हव्या आहेत. नरेंद्र मोदी

भारतीयांच्या या वाढत्या आकांक्षांना आटोक्यात आणण्यासाठी काय जादू करतात– याची सर्वांनाच प्रतीक्षा राहील. एक जागतिक महासत्ता म्हणून भारताने अग्रगण्य असावे अशी सर्वांनाच उतावीळ आहे. इंटरनेट, मोबाईल, स्मार्टफोन, फेसबुक, टीव्ही चॅनल्स, यांनी तरुणाईला नवनवी क्षितिजे खुली करून दिली आहेत... दुसरीकडे भ्रष्टाचार, सामाजिक अनाचार, बलात्कार... अशा बातम्यांनी रोजची वृत्तपत्रे, चॅनल्स समाजाचे विध्वंसक, आक्रमक, अभद्र रूप प्रकट करीत आहेत.

मुद्रण-प्रकाशन क्षेत्रातही मोठी क्रांती गेल्या तीस वर्षांत झाली आहे. प्रिंटमिडियाच्या जोडीने डिजिटल मिडिया मुसंडी मारत आहे. ई-बुक्सच्या संकल्पनेने मुद्रित पुस्तकाचे पारंपरिक स्वरूप कालविसंगत ठरत आहे. भारतीय प्रकाशन क्षेत्रांत आणि ग्रंथवितरण क्षेत्रात ॲमेझॉन वगैरे संस्था आपले हातपाय पसरत आहेत. भारतातील वेगवेगळ्या भाषांतील साहित्य जगातील अन्य देशातही यापुढे जाऊ लागेल. अनुवाद हा एक अवाढव्य उद्योग होऊ शकेल. भाषांतर प्रक्रियेतील तज्ज्ञांची गरज भासेल. खाजगी प्रकाशन संस्था हे विशाल आव्हान समर्थपणे हाताळू शकणार नाहीत. शासनाला त्यासाठी उदार हस्ते मदत करावी लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: कवी आहेत. भारतीय लेखकांना आंतरराष्ट्रीय रसिकवर्ग लाभावा यासाठी ग्रंथ जत्रा, चर्चासत्रे, अनुवाद, समाजावलोकनासाठी अभ्यासवृत्त्या (फेलोशिप) वगैरे मार्ग चोखाळावे लागतील. ग्रंथजत्रांमध्ये ग्रंथ अनुवाद-वितरणाचे करार व्हावेत, बालवाचकांना वाचनाची गोडी लागावी म्हणून रंगीत, आकर्षक पुस्तकांची निर्मिती व्हावी, जागोजागी ग्रंथालये, ई-बुक रीडर्स वगैरेंची सोय असावी. सार्क देशांमध्ये शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध वाढावेत यासाठी उपयुक्त साहित्य आणि अनुवाद प्रकल्प यावरही भर देता येईल. या दृष्टीने काही उपक्रम राबवून नवे पंतप्रधान या आघाडीवरही सक्रिय राहतील अशी अपेक्षा असायला हरकत नाही. त्यासाठी नव्या पंतप्रधानांना शुभेच्छा!






## ‘कास व्हॅली ऑफ फ्लॉवर’वर ‘डॉक्युमेंटरी’

‘व्हॅली ऑफ फ्लॉवर’ अशी ख्याती असलेल्या सातारजवळच्या कास पठारावरील असंख्य प्रजातींची फुले आणि जैवविविधता धोक्यात येऊ नये आणि पठाराचे जागतिक महत्त्व समोर यावे, या उद्देशाने वनविभागातर्फे ‘डॉक्युमेंटरी’ बनविली जात आहे.

‘डॉक्युमेंटरी’ साठी २०१२-१३ या आर्थिक वर्षात दोन लाखाचा निधी मंजूर झाला आहे. वर्षभरात हंगामानुसार पठारावर होणारे बदल, आकर्षक फुलांचे वैशिष्ट्य, या संदर्भात अभ्यासपूर्ण असा हा माहितीपट आहे. पर्यावरणप्रेमी श्रीनिवास डोंगरे यांनी माहितीपटाचे काम पूर्ण केले. ३००० हून अधिक प्रजातींच्या वनस्पती (प्रदेशनिष्ठ दुर्मिळ आणि अतिदुर्मिळ), रंगीबेरंगी फुले हे पठाराचे अनोखे वैशिष्ट्य आहे. अतिधोक्याच्या यादीतील ६०-७० फुले या पठारावर आहेत...

पर्यटकांना पठारावरील नाजूक फुलांची, आजूबाजूच्या परिसराची आणि जैवविविधतेची माहिती व्हावी, यासाठी दहा मिनिटांच्या माहितीपटामध्ये कास तलाव, शिवसागर जलाशय, सज्जनगड अशा पर्यटनस्थळांची माहिती देण्यात आली आहे. कास पठारावर बांधण्यात येणाऱ्या इंटरप्रिटेशन सेंटरमध्ये हा माहितीपट पाहता येईल. तसेच तो ‘www.kas.ind.in’ या संकेतस्थळावर अपलोड केला जाईल.

कास पठारावरील बहुतांश फुले काही वर्षांपूर्वी पाचगणी परिसरातही आढळून येत असत, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. याबद्दल डोंगरे म्हणाले, “पठारावरील छायाचित्रांमध्ये येथील वनस्पती आणि फुले आकाराने मोठी वाटतात. मात्र, प्रत्यक्षात कमी उंचीचे गवत असून नखाएवढी फुले असलेल्या अनेक प्रजाती येथे आहेत. आठवड्याभरात

पहिली फुले गळून पडतात. त्या जागी नव्याने फुले येतात. निसर्गचक्रातील या बदलामुळे दर १०-१५ दिवसांनी पठारावरील फुलांचा रंग बदलत असल्याचा भास होतो.''

## पुणे ॲप

पुण्यात उपलब्ध असलेल्या नोकऱ्यांपासून ते पर्यटन स्थळांपर्यंत, चित्रपटगृहांच्या माहितीपासून ते पीएमपीच्या वेळापत्रकापर्यंत, रिक्षा भाडे दरापासून ते महत्त्वाच्या दूरध्वनींपर्यंत आणि मराठी दिनदर्शिकेपासून ते रेस्टॉरन्टस्पर्यंत सर्व प्रकारची माहिती देणारे 'पुणे इन माय पॉकेट' हे नवे कोरे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध झाले आहे. त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

'पुणे इन माय पॉकेट' हे ॲप अँड्रॉईड फोन वा टॅब्लेटवरून नि:शुल्क डाऊनलोड करून घेता येते.

धीरज कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली पुण्यातील चार संगणक अभियंत्यांनी हे ॲप तयार केले आहे. पुण्यातील चालू घडामोडींसह अनेकविध प्रकारची माहिती उत्तम व अद्ययावत स्वरूपात या ॲपवर उपलब्ध आहे. त्या वास्तूंचे नकाशे, मार्गदर्शक नकाशे, छायाचित्रे या ॲपवर पाहायला मिळतात. रिक्षा दरपत्रक, रेल्वेचे सुधारित वेळापत्रक, पुण्यातील रक्तपेढ्या, महावितरणची कार्यालये, रुग्णालये आदींचे दूरध्वनी क्रमांकही येथे पाहता येतात. महत्त्वाची हॉटेल्स, रेस्टॉरन्टस्, मराठी सणवार, उत्सव, एसटी, रेल्वे, खासगी प्रवासी गाड्या, विमाने यांचे वेळापत्रक, पुण्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींची माहिती या ॲपवर मिळू शकते.

## मराठी हस्तलिखितांची सूची

हस्तलिखितांचा इतिहास हा एका अर्थाने दैवदुर्विलासाचा इतिहास आहे. इतिहास लोकांपर्यंत नेणे दुरापास्त झालेले असताना परदेशी लोकांना आपल्या इतिहासामध्ये रस वाटतो आणि या इतिहासाच्या जतनासाठी ते प्रयत्न करतात, ही आनंदाची गोष्ट असल्याचे मत डेक्कन कॉलेजचे अध्यक्ष डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले. दुर्मिळ मराठी हस्तलिखितांची सूची हा महत्त्वाचा प्रकल्प हाती घेतल्यामुळे हस्तलिखितांचे भाग्य उजळेल आणि

आपल्याही ज्ञानात भर पडेल, असे ते म्हणाले.

उत्कर्ष प्रकाशनतर्फे डॉ. ॲन फेल्डहाउस आणि वा. ल. मंजूळ यांनी संपादित केलेल्या 'मराठी हस्तलिखितांची समग्र सूची' या प्रकल्पातील पहिल्या खंडाचे प्रकाशन झाले. आनंदाश्रम संस्थेच्या विश्वस्त डॉ. सरोज भाटे, संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे आणि प्रकाशक सु. वा. जोशी या वेळी उपस्थित होते.

डॉ. देगलूरकर म्हणाले, ''पूर्वी आपल्याकडे ज्ञानोपासनेची मौखिक परंपरा होती. नंतर ती लिखित झाली. कागदाचा शोध लागण्यापूर्वी लेखन करण्यासाठी भूर्जपत्राचा वापर केला गेला. विज्ञानाच्या प्रगतीमुळे ध्वनिमुद्रणाचे तंत्र आले. नंतरच्या पिढीमध्ये पांडित्य क्षीण झाले आणि पराक्रम आटला. पण पूर्व पंडितांनी एवढे काम करून ठेवले आहे की त्याचा केवळ मागोवा घेतला तरी मोठा ज्ञानसाठा लोकांसमोर येऊ शकतो.''

डॉ. सरोज भाटे म्हणाल्या, ''हस्तलिखिते हा महत्त्वाचा आणि समृद्ध पण दुर्लक्षित ठेवा आहे. महाराष्ट्राबाहेर सुमारे सात हजार मराठी हस्तलिखिते आहेत. दक्षिणेमध्ये तंजावरला २३००० हस्तलिखिते आहेत.''

इतिहासाची भूते गाडून भविष्याकडे जायचे अशी सध्याची मानसिकता दिसते. पण, इतिहासामध्ये भविष्याचे पदर असतात. १५ व्या शतकातील दुर्मिळ हस्तलिखित हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठात तर पहिले व्याकरणावरील पुस्तक चेन्नईमध्ये आहे. संस्कृतीची सोनपावलं कोठेही उमटतात. मग भूगोलाच्या सीमांनाही मर्यादा पडतात.

## 'माय फादर गॉडफादर' थिएटरऐवजी संकेतस्थळावर

तरुण पिढीची 'इंटरनेट क्रेझ लक्षात घेऊन एस्सेल व्हिजन प्रॉडक्शन लिमिटेडने खास इंटरनेटसाठीच चित्रपट बनविण्याचा निर्णय घेतला आहे. 'माय फादर गॉडफादर' असे त्या चित्रपटाचे नाव आहे. महाभारत या दूरचित्रवाणी मालिकेतील कर्णाच्या भूमिकेमुळे प्रसिद्धीस आलेला पंकज धीर या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे. दोन ते अडीच तास लांबीचा हा हिंदी चित्रपट थिएटरऐवजी केवळ संकेतस्थळावर प्रदर्शित केला जाईल. भारतात अशा प्रकारचा प्रयोग पहिल्यांदाच होत असल्याचा दावा निर्माते नितीन केणी यांनी केला आहे.

केणी म्हणाले, ''हा चित्रपट तद्दन व्यावसायिक आहे आणि एखाद्या

व्यावसायिक चित्रपटावर जेवढा खर्च होतो, तेवढाच खर्च आम्ही इंटरनेटवरील चित्रपटासाठी करणार आहोत. उत्पन्नाचे म्हणाल, तर जाहिरातींबरोबरच अन्य काही पर्यायांची चाचपणी आम्ही करतो आहोत.''

## 'अंडरस्टँडिंग थिएटर'मध्ये 'बंदिश'चा प्रयोग

''बंदिश लिहिताना कोणताही निश्चित असा आकृतिबंध डोक्यात पक्का तयार नव्हता. मुख्य म्हणजे 'काय करायचं नाही', ते माहीत होतं. हे नाटक अमूर्त स्वरूपातून उभं राहिलेलं आहे.'' अशी भावना नाटककार डॉ. राजीव नाईक यांनी व्यक्त केली.

नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एनएसडी) व पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र यांच्या विद्यमाने घेतलेल्या 'अंडरस्टँडिंग - थिएटर' या अभ्यासवर्गात नाईक यांनी लिहिलेले 'आसक्त' निर्मित बंदिश हे नाटक सादर झाले. त्या वेळी त्यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. नाटकाचे दिग्दर्शक मोहित टाकळकर, मुख्य कलाकार किरण यज्ञोपवीत आदी उपस्थित होते. पाच निरनिराळ्या पार्श्वभूमीच्या पात्रांनी एकत्र येत परस्परांच्या आयुष्याचा एक भाग बनून जाणे व एका टप्प्यावर त्यांच्यातील नात्यांची वीण नकळतपणे सुटणे, हा आशय या नाटकात गुंफण्यात आलेला आहे. नाईक म्हणाले, ''नाटकातील पात्रे आधी सुचली होती. त्यापुढचे नाटक पुरेसे स्पष्ट दिसत नव्हते. ते ऐकू मात्र येत होते. एखादं ठोस विधान करू पाहत नसले तरीही 'बंदिश' काही अर्थवलये मात्र नक्कीच उभी करू पाहते.''

टाकळकर म्हणाले, ''नाटकातील मुख्य पात्र निखिल हे माझ्या जगण्याशी व भूतकाळाशी खूप साधर्म्य दाखवणारं होतं. माझ्याशी जुळेल असं काही सापडल्यामुळे मला हे नाटक करावेसे वाटले.'' नाटकाची रचना, त्यातील प्रसंग, दिग्दर्शकीय दृष्टिकोन या विषयी प्रेक्षकांनी कलाकारांना अनेक प्रश्न विचारले.

''अनेक आव्हानांचा सामना करत रंगभूमीची वाटचाल सुरू आहे. भरत मुनींपासून ते आतापर्यंत रंगभूमीला हल्ल्यांचे चटके सोसावे लागले. अशा संघर्षातून रंगभूमीने अस्तित्व अबाधित ठेवले आहे. माणूस आहे तसा दाखवण्याची किमया फक्त रंगभूमीवरच शक्य आहे. त्यामुळेच आधुनिक माध्यमांची बलस्थाने मान्य केली, तरीही रंगभूमीच्या जिवंतपणाला जगात तोड नाही.'' असे मत नाट्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. राधावल्लभ त्रिपाठी

यांनी व्यक्त केले.

## वाघोबाच्या भावविश्वावरील अतुल धामणकर यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

खट्याळ... मस्ती करतानाही सावध असणारा... पण तरीही डोळ्यातील रागीट भाव... भक्ष्यावर रोखली जाणारी त्याची नजर... असा हा 'वाघोबा' आणि त्याचे भावविश्व वन्यजीव अभ्यासक अतुल धामणकर यांनी 'स्लाइड शो'च्या माध्यमातून उलगडून दाखविले.

ताडोबाच्या जंगलातील वाघांचे वैशिष्ट्य, वाघाचे बारसे, ताडोबा आणि इतर अधिवासात राहणाऱ्या वाघांचे वेगळेपण... अन् मूळचे भारताचे नसणारे हे वाघ नेमके आले तरी कोठून याचे रहस्य त्यांनी सांगितले.

इंकिंग इनोव्हेशन्सतर्फे अतुल धामणकर यांच्या 'ट्रेलिंग द टायगर' आणि 'डिअर टेल्स' या इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन एस. एम. जोशी सभागृहात झाले. पुणे वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक सुनील लिमये आणि मानद वन्यजीव रक्षक अनुज खरे उपस्थित होते.

तेलिया धरणाजवळ 'माधुरी' नावाच्या वाघिणीने जन्माला घातलेली पिले, कानाजवळ 'एस'सारखे निशाण असल्याने 'सोनम' म्हणून बारसे झालेली वाघीण, खेकडे आणि कासव यांसारख्या जिवांच्या आधारे भूक भागविणारे सुंदरबनमधील वाघ, अशी जंगलसफर धामणकर यांनी घडवून आणली. कमालीची स्वच्छता बाळगणाऱ्या आणि आरामप्रिय असणाऱ्या वाघोबाचे दर्शन उपस्थितांना झाले. या वेळी लिमये म्हणाले, ''वन्य जीवन वाचण्यातील आनंद काही औरच आहे. निसर्गशिक्षण निसर्ग संवर्धनाची पहिली पायरी आहे. धामणकर यांच्या पुस्तकांतून निसर्गाचे अवघड गणित उलगडले आहे. हे साहित्य म्हणजे मराठीतील ज्ञानकोश आहे.'' या वेळी प्रकाशक आनंद लिमये आणि सोनिया खरे आदि उपस्थित होते.

## प्लॅस्टिक निर्मूलनासाठी विद्यार्थी स्वयंसेवक

प्लॅस्टिक कचऱ्यामुळे वाढणाऱ्या प्रदूषणाला रोखण्याची गरज नेहमी व्यक्त होते. पण केवळ पोपटपंची न करता पुण्यातील विद्यार्थ्यांनी घरापासून नदीपर्यंत आढळणारा प्लॅस्टिक कचरा गोळा करण्यास सुरुवात केली. एका वर्षात त्यांनी तब्बल दहा टन प्लॅस्टिक जमा केले.

'सागरमित्र' या मोहिमेअंतर्गत हा अभिनव उपक्रम राबविला आहे. पुणे

नवे कोरे


**टी-बुक क्लबचे**
**४थे पुस्तक...**

# द मॅन इन द वुडन हॅट

मूळ लेखक
जेन गार्डम

अनुवाद
डॉ. मीना शेटे- संभू

**किंमत : ३००/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




**टी-बुक क्लबच्या सभासदांना**
**निम्म्या किंमतीत उपलब्ध**

एडवर्ड, बेट्टी आणि व्हेनिरिंग या प्रेमाच्या त्रिकोणात अनेक योगायोगाने भरलेल्या आणि अर्तक्य घटना घडत जातात. विश्वासघात, फसवणूक, सूड आणि प्रेम यांच्या बेमालूम मिश्रणातून तीन आयुष्यांचा प्रवास होतो. अखेर काय होते? दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर साकारलेली जेन गार्डम यांची रहस्यमय कादंबरी

व पिंपरी-चिंचवडमधील ५५ शाळांतील विद्यार्थ्यांचा त्यात सहभाग आहे. महापालिकेचे इंद्रधनुष्य केंद्र, दि ॲकॅडमिक ॲडव्हायजर, सस्टेनेबल एन्हवायरनमेंट थ्रू युनिव्हर्सल नेटवर्किंग (सेतू) आणि रिस्पॉंसिबल रिसायकलर इंडिया फाउंडेशनतर्फे हे अभियान राबविले जात आहे. या उपक्रमात आतापर्यंत ६१ हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे.

"स्वयंसेवक शाळांमध्ये जाऊन पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना चित्रफित, भित्तिपत्रक आणि व्याख्यानांमधून पटवून देतात. पुढील शैक्षणिक वर्षात सुरत, सोलापूर आणि कल्याण-डोंबिवलीत हा उपक्रम सुरू होईल. प्लॅस्टिकमुळे नदी प्रदूषणाबरोबरच माशांच्या काही जाती नामशेष होत आहेत."

## 'इंग्रजी माध्यमाच्या हट्टामुळे आकलनक्षमतेवर परिणाम'

'मुलांना इंग्रजी माध्यमात शिकवण्याच्या पालकांच्या हट्टामुळे मुलांची आकलनक्षमता कमी होत आहे. इंग्रजी माध्यमातील मुलांना पालकांनी मराठी माध्यमाची पुस्तके वाचायला दिल्यास त्यांच्या संकल्पना अधिक स्पष्ट होतात,' असे मत मराठी भाषेचे अभ्यासक प्रा. अनिल गोरे यांनी व्यक्त केले.

भारती निवास सोसायटीच्या सुजाण पालक मंडळात 'मराठी भाषेची व्याप्ती आणि महती' या विषयावर प्रा. गोरे यांचे व्याख्यान झाले. केंद्राच्या संचालिका माधुरी सहस्रबुद्धे या वेळी उपस्थित होत्या.

'मराठी भाषेतील शब्द, वाक्ये लहान असतात. वाक्यातील शब्दांची जागा बदलता येते. तसेच मराठी लेखन आणि उच्चार सारखेच असतात. त्यामुळे विषयाचा गाभा मराठीतून सहज समजतो. उलट, इंग्रजी भाषा कळायला अवघड आहे. आकलनक्षमता ही इंग्रजी भाषेची मोठी उणीव आहे. आयआयटीसारख्या स्पर्धा परीक्षांचा अभ्यासही मराठीतूनच सोपा होत असल्याचे स्पष्ट झाले आहे,' असे गोरे यांनी सांगितले, माधवी केसकर यांनी आभारप्रदर्शन केले.

## फेसबुकचे न्यूजवायर टूल

फेसबुकने पत्रकारांसाठी एक खास न्यूजवायर टूल (https://www.facebook.com/FBNewswire) बनविले आहे. फेसबुक या लोकप्रिय सोशल नेटवर्किंग वेबसाईटवरील सदस्य ती छायाचित्रे

किंवा माहिती शेअर करू शकतील.

यासाठी फेसबुक न्यूज कॉर्पच्या स्टोरीफुल मीडिया टूलबरोबर काम करीत आहे. त्यामुळे ट्विटरसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बातम्या आणि व्हिडिओचे कॉपीराईट ओळखणे आणि ते ताब्यात ठेवणे शक्य होणार आहे. एफबी न्यूजवायरची घोषणा करताना फेसबुकमधील न्यूज अँड ग्लोबल मीडिया पार्टनरशिपचे संचालक अँडी मिशेल यांनी सांगितले, की आता फेसबुकवर बातम्यांना कोणत्याही वेळी अधिकाधिक वाचक मिळत आहेत. फेसबुकने न्यूजवायरचे ट्विटर अकाउंटही (@FBNewswire) सुरू केले आहे.

एक अब्जापेक्षा अधिक लोक जगभरातील घडामोडी जाणून घेण्यासाठी फेसबुकचा वापर करतात, असे मिशेल म्हणाले.

## मॉरिशसचे आध्यात्मिक शिष्टमंडळ

''आम्ही दूर असलो तरी हिंदू अध्यात्माचे संस्कार एकात्मतेचे दर्शन घडवितात. त्यामुळे धार्मिक मेळ्याच्या माध्यमातून साहित्य, संस्कृतीचा प्रसार करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहोत,'' असे मॉरिशसच्या शिष्टमंडळाने सांगितले.

कासारवाडीतील श्री दत्त सेवा आश्रम आणि मॉरिशसमधील सद्‌गुरू सेवा मंडळ यांच्या वतीने आध्यात्मिक उपक्रम राबविण्यात आला. त्यात मॉरिशसमधील मंडळाचे अध्यक्ष दौलतराव गंगाराम, रुपजी गुनू यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भाग घेतला. मॉरिशसमध्ये हिंदू संस्कृती टिकविण्यासाठी मंडळाकडून विविध उपक्रम राबविले जातात.

गंगाराम म्हणाले, ''मॉरिशसमध्ये ५०हजारांहून अधिक मराठी बांधव आहेत. ते नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने तेथे गुण्यागोविंदाने राहतात. प्रत्येकाला संस्कृतीचा अभिमान असतोच. परंतु, तो सातत्याने जतन करणे तसे फारसे सोपे नसते. ही खंत दूर करून आम्ही एकत्र येत असतो. केवळ सांस्कृतिक कार्यक्रमच नव्हे तर गुढी पाडवा, गणेशोत्सव, रामनवमी, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गुरुपौर्णिमा हे धार्मिक सणही उत्साहाने साजरे करीत असतो.''

ते म्हणाले, ''दोन्ही देशांमधील आध्यात्मिक केंद्राचा संबंध सद्‌गुरू प्रेमानंद महाराज यांच्यामुळे आला. ते मॉरिशसला येत असतात.''

मॉरिशसमध्ये कॅसवेल गावी विठ्ठल-रखुमाईचे खूप जुने मंदिर आहे. या ठिकाणी गेल्या आठ वर्षांपासून पालखी सोहळा आणि दिंडीचे आयोजन केले जात आहे. हा अनुभव अवर्णनीय असतो, असे मॉरिशसमधील मराठी मंडळाचे सदस्य विजय मुकुंद यांनी सांगितले.

## व्यवहारात खेळताहेत ७६.४७ अब्ज नोटा

जगातील सर्वांत श्रीमंत देशापेक्षाही भारतीय नागरिकांच्या खिशात अन् व्यवहारात सर्वाधिक नोटा वापरात असतात. भारताचे व्यवहार कमी, मात्र वापरातील नोटा जास्त असल्याने त्यावर नियंत्रणासाठी रिझर्व्ह बँकेचे तज्ज्ञ उपाय शोधत आहेत.

या संदर्भात रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गर्व्हनर डॉ. के. सी. चक्रवर्ती यांनी देशातील चलनात नोटांचा वाढता प्रत्यक्ष वापर, क्लीन नोट पॉलिसी, नोटांची सिक्युरिटी व उत्पादन खर्च याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. २०१३ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात भारतात ७६.४७ अब्ज (१२,४६८ अब्ज) (कंसात दर्शनी मूल्य) नोटा वापरात होत्या. अमेरिका ३४.५ (११९८), युरोप २.९९ (५८), ऑस्ट्रेलिया १.१५ (५३.६) असे होते. जगभरात रोख नोटांची व्यवहारातील गंगाजळी जीडीपीच्या तुलनेत २.५ ते ८ टक्के असते. भारतात तिचे प्रमाण १३ टक्के आहे. ती अप्रगत मानल्या जाणाऱ्या आफ्रिकेपेक्षाही एक टक्का अधिक आहे. चलनात नोटांचा प्रत्यक्ष वापर वाढल्यास त्याचा देशविरोधी शक्तींकडूनही दुरुपयोग होतो. भारतीय चलनात बनावट नोटा घुसविण्याचे प्रयत्न गेली अनेक वर्षे सुरू आहेत.

## इंटरनेट सेवेसाठी अतिरिक्त शुल्क?

इंटरनेट सेवापुरवठादारांना महसुलापैकी ८ टक्के दराने एक वर्षाचे परवाना शुल्क अदा करण्याची सूचना दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ट्राय) केली आहे. या सूचनेची अंमलबजावणी झाल्यास इंटरनेट सेवा ३० टक्क्यांनी महागणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोचण्याच्या मुख्य उद्देशालाच सुरुंग लागण्याची शक्यता आहे.

सरकार अशा प्रकारची कोणतीही शुल्क आकारणी करत नव्हते. त्यामुळे कंपन्यांकडून वार्षिक महसुलपोटी अशी आकारणी झालीच तर ग्राहकांकडून

ही वसुली कशी करायची, याबाबतचेही धोरण अद्याप स्पष्ट नाही. याआधीच अशी आकारणी होणे अपेक्षित होते; पण कंपन्यांच्या महसुलीपैकी अंतिम शुल्क म्हणून नेमकी आकारणी कशी करायची, याबाबत वाद होता. त्यामुळे ही आकारणी वर्षभर रखडली. सर्व सेवापुरवठादारांना समान वागणूक मिळावी, यासाठी हे धोरण अवलंबणे गरजेचे असल्याचे ट्रायचे म्हणणे आहे. 'इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर्स असोसिएशन' (ईएसपीएआय)च्या म्हणण्यानुसार जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोचण्याच्या सरकारच्याच योजनेला या निर्णयामुळे खीळ बसण्याची शक्यता आहे.

## स्वामी समर्थ सांस्कृतिक महोत्सव

''जगताना स्वत:तले चैतन्य प्रत्येकाने जपायला हवे. स्वामी समर्थ हे चैतन्याचे प्रतीक असल्यानेच मी नास्तिक असूनही त्यांना मानतो.'' अशी भावना साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ. मुं. शिंदे यांनी व्यक्त केली. अक्कलकोट स्वामी समर्थ ट्रस्टतर्फे आयोजित सांस्कृतिक महोत्सव उद्‍घाटन प्रसंगी व्यक्त केले.

शिंदे म्हणाले, ''जगताना श्वासागणिक सर्वांबद्दलची कृतज्ञता सांभाळली पाहिजे. कृतज्ञतेइतकी उदात्त भावना दुसरी नाही. नाती दोन प्रकारची असतात. रक्ताची आणि रक्तातून वाहणारी. माझे रसिकांशी असलेले नाते दुसऱ्या प्रकारचे आहे.''

स्त्री शक्ती निर्माण करा, निसर्गाचा समतोल राखा, लेक वाचवा, स्त्रीशक्तीचा विजय असो... अशा घोषणा देत प्रेक्षकांना अंतर्मुख करणारी एकांकिका सादर करत अंकुर प्रतिष्ठान व तनिष्का ग्रुपच्या कलाकारांनी स्त्रीशक्तीचा जागर केला.

रोटरी क्लब ऑफ पुणे शनिवारवाडा बिझी वर्ल्डतर्फे भरत नाट्य मंदिर येथे आयोजित एकांकिका स्पर्धेचे उद्‍घाटन 'स्त्रीभ्रूणहत्या' या एकांकिकेद्वारे करण्यात आले. यावेळी कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, रोटरीचे प्रांतपाल डॉ. दीपक शिकारपूर, सुनील करंबेळकर, संजय कुलकर्णी, सुरेश नातू, दिलीप कुंभोजकर, योगेश भालेराव उपस्थित होते. शिकारपूर म्हणाले, ''स्त्रीभ्रूणहत्येसारख्या सामाजिक प्रश्नावर आशयप्रधान कला सादर करून कलाकारांनी समाजात जागृती करण्याचे काम केले आहे. एकांकिकेची गंमत सादरीकरणात नसून एकमेकांचे सोबती बनण्यामध्ये आहे.''

## इच्छामरण म्हणजे सन्मानाने मरण्याचा अधिकार

''इच्छामरण म्हणजे आत्महत्या नव्हे, तर संबंधित व्यक्तीचा सन्मानाने मरण्याचा अधिकार आहे. स्वित्झरलँडमध्ये इच्छामरणाला कायदेशीर मान्यता असून, अन्य देशातही त्याबाबत सकारात्मक विचार होत आहे. म्हणूनच आपल्याकडेही त्याबाबत जागृती होण्याची गरज आहे.'' असे मत सामाजिक कार्यकत्या विद्या बाळ यांनी व्यक्त केले.

पी. एम. शहा फाउंडेशनतर्फे 'डॉक्टर तुमच्या भेटीला' या उपक्रमांतर्गत 'इच्छामरण' या विषयावर व्याख्यान झाले. त्या म्हणाल्या, ''इच्छामरणाचे 'स्वेच्छामरण' व 'दयामरण' असे प्रकार पडतात. आत्तापर्यंत चांगले जगलोय, जगण्यासारखी परिस्थिती नाही म्हणून ती व्यक्ती मरण्याचा विचार करत असेल तर त्याला 'स्वेच्छामरण' असे म्हणतात, तर दुर्धर आजाराने ग्रासलेली आणि स्वत:लाच जगणं नकोसे झालेल्या व्यक्तीचे नातेवाईक तिच्यावरील प्रेमापोटी दयामरणाची विनंती करू शकतात; परंतु मृत्यूचे भय मनात असल्यामुळे आपण त्याबाबत मनमोकळेपणाने बोलत नाही.''

आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात हेवेदावे विसरून चांगले जगायला हवे. त्यामुळे आपल्या खांद्यावरील दु:खाची ओझी कमी होतील. परिणामी, आपले आयुष्य अधिक गुणवत्तापूर्ण होण्यास मदत होईल. समविचारी, समवयस्क लोकांबरोबर राहण्याचा प्रयत्न करतानाच लहान मुलांमध्ये स्वत:ला गुंतवण्याचा प्रयत्न करा. तसेच आपले वैद्यकीय उपचारासंबंधी इच्छापत्रही तयार करण्यास विसरू नका, असेही बाळ यांनी सांगितले.

## ॲपलचे रिसायकलिंग

पृथ्वीवरील प्रदूषण कमी करण्यासाठी ॲपल खारीचा वाटा उचलत आहे.

गेल्या सात वर्षांमध्ये ॲपलने जगात दहा लक्ष आयफोन, आयपॅड आणि कम्प्युटर्स विकलेले आहेत. जगभरातील चारशेपेक्षा अधिक स्टोअर्समध्ये ॲपल रिसायकलिंगबाबतचे गिफ्ट कार्ड वितरित करीत आहे. यामध्ये ग्राहकांनी चांगल्या स्थितीतील एक्स्चेंज केलेले आयफोन आणि आयपॅड परत विकले जाणार आहेत.

कम्प्युटरचा डाटा स्टोअर करणे, सर्च प्रोसेस, फोटो, व्हिडिओ आणि मेलची सुरक्षितता यासाठी ॲपलला अमेरिका, चीन, जपान, भारत आणि

रशिया या पाच देशांमध्ये सर्वाधिक एनर्जी लागते. आपल्याच वापरलेल्या प्रॉडक्टचे रिसायकलिंग ही पहिली पायरी मानता येईल. कंपनी आपल्या बहुतांश प्लांटसाठी लागणारी एनर्जी बायोगॅस, सोलर, हायड्रो पॉवरबरोबरच विंड पॉवर यांच्या माध्यमातून भागविते. २०१० मध्ये अशा ऊर्जा स्त्रोतांच्या माध्यमांतून आपली ३५ टक्के एनर्जीची गरज  ॲपल भागवित होते. आता तेच प्रमाण ९४ टक्क्यांपर्यंत पोचले आहे.

**ड्युलिंगो**

आपल्या फॉरेन लँग्वेज शिकायच्या असतील तर मोठमोठी पुस्तके वाचण्याची आणि क्लास लावण्याची गरज राहिलेली नाही. मोबाइलमध्ये ऽल्दत्ह्गुद हे ॲप डाउनलोड केले की स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन, पोर्तुगीज, इटालियन आणि इंग्लिश शिकणे सहज शक्य होणार आहे. जगभरातील सहा लाखपेक्षा अधिक जणांनी हे ॲप डाउनलोड केलेले आहे.

## कक्षा रुंदावणारा अनुभव

‘असोसिएशन ऑफ द फ्रेंड्स ऑफ जर्मनी तर्फे ७ जून ते १४ जून दरम्यान जर्मनी, ऑस्ट्रिया आणि स्वित्झर्लंड येथे दहाव्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी जर्मन वा फ्रेंच येण्याची आवश्यकता नाही. तेरा वर्षांपुढील विद्यार्थ्यांना त्या अभ्यासदौऱ्यात भाग घेता येईल. यात पूर्वतयारी, साक्षात अनुभव आणि उत्तरावलोकन असे तीन टप्पे आहेत.

(१) पूर्व तयारीमध्ये मुलांना रुचेल, समजेल अशा पद्धतीने त्या-त्या स्थळांची संस्कृती, इतिहास, हवामान, तेथील जीवनशैली यांची माहिती दिली जाते. सामानाची बांधाबांध, निसर्ग व पक्षी निरीक्षण, युरोपियन युनियन, जर्मनीचे एकीकरण अशी अनेक विषयांवर उपयुक्त सेशन्स आयोजित केली जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो व वेगळ्या संस्कृतीचा अभ्यास करताना आपल्याला आपली संस्कृती, देश, राज्य, शहर इत्यादी विषयी माहिती असणे आवश्यक आहे, याची जाणीव होते.

(२) अभ्यासदौऱ्यात त्या स्थळांची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक माहिती दिली जाते. युरो, पासपोर्ट, कॅमेरा हाताळणे व सांभाळणे, कुटुंबातील सर्वांचा विचार करून खरेदी करणे वगैरे गोष्टी शिकायला मिळतात.

(३) तीन दिवस जर्मन कुटुंबात राहून तेथील संस्कृतीची तोंडओळख करून घेणे हा या अभ्यासदौऱ्याचा एक महत्त्वाचा टप्पा. ९ जून रोजी त्या छोट्या गावातले महापौर विद्यार्थ्यांना त्यांच्या सणाला घेऊन जाणार आहेत व त्या गावाची संस्कृती, इतिहास, महत्त्व अशा नानाविध विषयांवर चर्चा करणार आहेत. या अभ्यासदौऱ्यामुळे जर्मनीतील एका कुटुंबाशी आपली ओळख होते व मैत्रीचे पूल बांधले जातात.

(४) उत्तरावलोकन : युरोपहून परत आल्यावर विद्यार्थ्यांनी व त्याच्या पालकांनी आपले अनुभव लिहिणे अपेक्षित असते. ते प्रसिद्धही केले जातात. हा उपक्रम मुलांना अंतर्मुख करतो. त्यामुळे मनाची दारे उघडतात.

कौशल्यपूर्ण नियोजन, शिस्तबद्ध कार्यवाही व विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून केलेला अभ्यासदौऱ्याचा सखोल विचार यामुळे हा अनुभव संस्मरणीय ठरतो.

अधिक माहितीसाठी

डॉ. सविता केळकर : ९४२२५२९३३५

श्रीनिवास पेंडसे : ९८८११५४०३१

## बालभारती दुसरी व तिसरीची पुस्तके बाजारात

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) दुसरी आणि तिसरीची बहुतांश पुस्तके बाजारात आणली आहेत.

ए-फोर आकार आणि रंगीत आकर्षक रंगसंगती हे यंदाच्या तिसरी आणि चौथीच्या पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. पुस्तकाच्या आशयामध्ये विद्यार्थ्यांसाठी देण्यात आलेल्या भाषिक कृती, उपक्रम आणि प्रकल्प, विनोद, कोडी विद्यार्थ्यांना 'ॲक्टिव्हिटी बेस्ड लर्निंग'कडे घेऊन जाणारी आहेत.

बालभारतीच्या संग्रहातील पुस्तके संस्थेच्या वेबसाइटच्या माध्यमातून पीडीएफ स्वरूपामध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहेत. आत्तापर्यंत ४५० पुस्तके या वेबसाइटवर टाकण्यात आली आहेत. हे काम पूर्ण करण्यासाठी वेबसाइटची क्षमताही वाढविण्यात येत आहे.

## ‘चैत्रपालवी’चे प्रकाशन

“प्रत्येकाच्या मनाच्या तळाशी त्याची स्वत:ची कविता सदोदित झंकारत गात असते,” असे प्रतिपादन ‘सकाळ’चे संपादक मल्हार अरणकल्ले यांनी केले.

पुणे विद्यार्थी गृहाच्या मुक्तांगण इंग्लिश स्कूलचे निवृत्त प्राचार्य प्रा. म. द. कश्यप यांनी लिहिलेल्या ‘चैत्रपालवी’ या काव्यसंग्रहाचे तसेच ‘गीत गुरुचरित्र’ या गीतसंग्रहाचे प्रकाशन अनुक्रमे अभिनेत्री तेजस्विनी पंडित आणि अरणकल्ले यांच्या हस्ते झाले. हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या वास्तुरचनाशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप उपस्थित होते.

अरणकल्ले म्हणाले, “कविता म्हणजे केवळ शब्द, छंदोरचना किंवा यमकांची जुळणी नव्हे; तर तो भावनांचा उत्कट, तरल आविष्कार असतो. प्रत्येकाच्या मनात या भावनांचे आंदोलन सतत सुरू असते. त्याच्या प्रकटीकरणाचे माध्यम गद्यलेखन, चित्रकला, नृत्य, गायन, अभिनय अशा कोणत्याही स्वरूपात असू शकते.”

पंडित म्हणाल्या, “या संग्रहातील प्रेमकवितांतील तारुण्यसुलभ हळुवारपणा ‘चैत्रपालवी’च्या लुसलुसशीत कोवळेपणाची अनुभूती देणारा आहे.” म. द. कश्यप म्हणाले, “या कविता म्हणजे माझा माझ्याशीच केलेला मुक्त संवाद आहे. झाडावर फूल उमलावे, तशा या कविता सहजपणाने अवतरल्या आहेत. गुरुचरित्राच्या अभ्यासातून, या कथा सोप्या भाषेत मांडाव्यात असे वाटल्याने ‘गीत गुरुचरित्रा’चे सश्रद्ध लेखन केले आहे.” डॉ. अनुराग कश्यप यांनी प्रास्ताविक केले.

## फेसबुकमुळे विस्तारलेले क्षितिज

फेसबुक हे अनेक जणांसाठी टाइमपास आणि ऑनलाइन भेटीगाठींचे माध्यम आहे तसेच फेसबुकमुळे अनेक विषयांशी विद्यार्थ्यांचा परिचय होतो. जे विद्यार्थी फेसबुकचा वापर करतात, त्यांचे सामाजिक क्षेत्र विस्तारलेले असते. ते सामाजिकदृष्ट्या अधिक सजग असतात व त्याचा प्रभाव त्यांच्या अभ्यासामध्ये दिसून येतो, असे एका संशोधनात आढळले आहे.

अमेरिकेत बेलर युनिव्हर्सिटीने यासंबंधी केलेल्या संशोधनात अधिक विद्यार्थीसंख्या असलेल्या वर्गांत अध्यापन करताना जाणवणारी आव्हाने आणि उच्च माध्यमिक शिक्षणासमोरील समस्या तपासण्यात आल्या. उच्च

माध्यमिक वर्गांना शिकवणाऱ्या काही शिक्षकांचा फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंग साइट्सना तीव्र विरोध आहे. त्यांच्या मते सोशल मीडिया ही विद्यार्थ्यांना विचलित करणारी गोष्ट असून, त्यामुळे अभ्यासात व्यत्यय येतो. त्या उलट इतर काही प्रयोगांच्या निरीक्षणांद्वारे मात्र फेसबुकवरील विविध कम्युनिटींचे भाग बनल्याने विद्यार्थ्यांची शिकाऊ वृत्ती वाढत असल्याचे दिसून आले आहे.

या संशोधनात समाजशास्त्र विषयासाठी प्रवेश घेतलेल्या २१८ विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला. त्यानुसार फेसबुकवर अधिक सहभाग दर्शविणारी विद्यार्थी हे प्रश्नमंजूषेत अग्रेसर होते, त्यांच्या उत्तरपत्रिका अधिक सखोल होत्या आणि फेसबुकवर केवळ बघ्याची भूमिका घेणाऱ्या विद्यार्थीमित्रांपेक्षा ते सामाजिकदृष्ट्या सजग होते. या संशोधनासाठी फेसबुकवर काही विशेष ग्रुप निर्माण केले होते. केवळ संशोधनात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या ग्रुपमध्ये प्रवेश होता. या ग्रुपमधील प्रवेश ऐच्छिक होता. एकूण विद्यार्थीपैकी दोन तृतीयांश विद्यार्थ्यांनी ग्रुपमध्ये सहभाग नोंदवला. त्यानंतर या ग्रुप्समध्ये काही सामाजिक प्रश्न मांडून चर्चेला आमंत्रण देण्यात आले. या प्रश्नांनी संबंधित माहितीच्या ऑनलाइन लिंक, फोटो, व्हिडिओ व व्याख्याने या ग्रुपमध्ये अपलोड करण्यात आली. काही विद्यार्थ्यांनी चर्चेत सक्रिय सहभाग घेऊन आपल्याला सापडलेले संदर्भ, फोटो, व्हिडिओ इत्यादी ग्रुपमध्ये शेअर केले.

प्रत्यक्ष परीक्षेवेळी एकमेकांशी शेअर केलेल्या या माहितीचा विद्यार्थ्यांना विशेष उपयोग झाला. त्यामुळे फेसबुकवर सक्रिय असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी स्वतंत्र तयारी करावी लागली नाही. फेसबुक ग्रुपवर आपल्या अभ्यासाशी संबंधित विषयांबद्दल चर्चा केल्याने स्वयंअध्ययनासाठी चालना मिळाली, असेही अमेरिकन सोशोलॉजिकल असोसिएशनच्या ‘टीचिंग सोशोलॉजी’ या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे.

गुगलचा पर्याय ठरू पाहणारे यॉंदेक्स हे रशियन सर्च इंजिन या वेब ॲड्रेसवर उपलब्ध आहे. गुगलप्रमाणेच वेब सर्च, इमेजेस, व्हिडिओ, मेल, ट्रान्स्लेट इत्यादी सेवा यॉंदेक्सवर आहेत. आयलंड्स ही यॉंदेक्सची नवी सेवा असून, सर्च इंजिनकडून केवळ पूरक माहिती देण्यापेक्षा यूजरच्या शोधाच्या मूळ कारणावर समर्पक उपाय शोधणे या नव्या सेवेद्वारे एका क्लिकवर उपलब्ध होईल.

## पोर्नोग्राफिक संकेत स्थळे बंद करणे अवघड

अश्लील मजकूर आणि व्हिडिओचा समावेश असलेली इंटरनेटवरील सर्व संकेतस्थळे 'ब्लॉक' करणे शक्य नाही. असे करणे अधिक धोकादायक असून, त्यामुळे अश्लील शब्दांचा समावेश असणारे इंटरनेटवरील चांगले साहित्यही नागरिकांना उपलब्ध होऊ शकणार नाही, असे स्पष्टीकरण केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिले.

केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के.व्ही. विश्वनाथन यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यात म्हटले आहे की अश्लील मजकूर आणि व्हिडिओचा समावेश असलेली सर्वच संकेतस्थळे 'ब्लॉक' केल्यास मोठे नुकसान होऊ शकते. कारण, त्यामुळे अश्लील शब्दांचा समावेश असलेले; परंतु चांगले साहित्य नागरिकांना इंटरनेटवर उपलब्ध होऊ शकणार नाही. अश्लील साहित्य असलेली संकेतस्थळे 'ब्लॉक' करणारे सॉफ्टवेअर प्रत्येक संगणकात कार्यान्वित करण्याची (इन्स्टॉल) सूचना सर्व संगणक उत्पादक कंपन्यांना द्यावी, अशी विनंती न्यायालयाला करण्यात आली आहे.

इंदूर येथील एका वकिलाने या संदर्भात याचिका दाखल केली असून, अश्लील मजकूर आणि व्हिडिओंमुळे देशातील बलात्काराच्या घटनांमध्ये वाढहोत असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

## बालनाट्य संमेलन

'बालनाट्यातून मुलांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांना नाटकातून स्वत:चा शोध घेता येतो. मात्र, शाळांमधून बालनाट्ये बाजूला पडली असून, शाळांना मुलांच्या बालपणचा विसर पडला आहे. शाळांमध्ये केवळ वार्षिक स्नेहसंमेलनांपुरतीच बालनाट्ये होतात,' अशी खंत अभिनेत्री संजना कपूर यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पुणे शाखेतर्फे आयोजित बालनाट्य संमेलनाचे उद्घाटन कपूर यांच्या हस्ते झाले. अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण काकडे, बाल कलाकार अथर्व कर्वे, नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष सुरेश देशमुख, उपाध्यक्ष दादा पासलकर, अविनाश देशमुख, प्रमुख कार्यवाह, दीपक रेगे, ज्येष्ठ नाट्यसमीक्षक माधव वझे, उदय लागू, शुभांगी दामले, प्रकाश पारखी आदी या वेळी उपस्थित

होते.

गेल्या पंचवीस वर्षांहून अधिक काळ नाट्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या कपूर यांनी बालनाट्य संमेलनाच्या कल्पनेचे कौतुक केले. 'शाळांनी मुलांना अभिव्यक्त होण्यासाठी संधी दिली पाहिजे. मात्र, अभ्यास, निकाल यांना प्राधान्य देण्याच्या नादात शाळांना मुलांच्या बालपणाचा विसर पडला आहे. शाळांतून बालनाट्ये केवळ स्नेहसंमेलनापुरतीच होणे हे धक्कादायक आहे. रंगमंचावर मुलांचा सर्वांगीण विकास होतो. नाटकांतून सर्जनशील अनुभव मिळत असल्याने मुलांनी नाटके पाहणे, त्यात काम करणे गरजेचे आहे. बालनाट्यांसाठी वेगळी नाट्यगृहे उभारण्याची  गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) बालनाट्यांचे गांभीर्य ओळखून त्यांचा समावेश अभ्यासक्रमात केला आहे,' असेही कपूर यांनी सांगितले.

'बालरंगभूमी जगविणे आवश्यक असल्याचे सांगून बालरंगभूमी ही उद्याच्या नाटकाचे भवितव्य आहे. बालनाट्यातून प्रेक्षक घडवण्यास मदत होते' असे अरुण काकडे यांनी सांगितले.

बालनाट्यातून कलाकार म्हणून घडतानाच व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत होते असे अथर्व म्हणाला. मकरंद टिल्लू यांनी आभार मानले.

## 'मी, नंदू पोळ' या आत्मचरित्राचे प्रकाशन

नाट्य, ध्वनिमुद्रण व चित्रपट अशा नानाविध क्षेत्रांत यशस्वी मुशाफिरी करताना स्वत:चे न्यून विसरून मुक्तहस्ते आनंद वाटणारे हरहुन्नरी अभिनेते नंदू पोळ यांच्या 'मी, नंदू पोळ' या आत्मचरित्राचे प्रकाशन ज्येष्ठ दिग्दर्शक व नाटककार सतीश आळेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी स्वत: नंदू पोळ, निवेदक सुधीर गाडगीळ, अभिनेते राहुल सोलापूरकर, चंद्रकांत काळे व 'उत्कर्ष प्रकाशन'चे सु.वा. जोशी उपस्थित होते.

कट्ट्यावरच्या मिश्किलीत रमणारे, बी. जे. मेडिकल कॉलेजमधील कारकुनीपासून 'घाशीराम कोतवाल' नाटकामधल्या भूमिकेपर्यंत सगळी कामे तितकीच समरसून करणारे, अखंड संवादातून माणसे जोडणारे... अशी पोळ यांची नानाविध रूपे त्यांचे शाळासोबती व मित्र गाडगीळ, सोलापूरकर यांनी मनोगतातून उभी केली. आळेकर म्हणाले, ''स्वत:तील कमतरता कुणावरही दोषारोप न करता, संयतपणे मांडण्याचे धारिष्ट्य नंदू पोळ यांच्यात होते.

नाटक, ध्वनिमुद्रण अशा आनंदाच्या जागा सापडल्यावर स्वत:मधले न्यून विसरून जगता येते, हे त्यांचे साधेसुधे तत्त्वज्ञान प्रत्येकासाठीच अनुकरणीय आहे. पुण्याच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासासह नाटकाच्या बदलत्या तंत्राचा शोध घेणारा एक वाचनीय दस्तावेज यानिमित्ताने समोर आला आहे.''

पायरेटेड पुस्तके

'वपुर्झा', 'उल्का', 'शाळा', 'ती फुलराणी', 'हिरवा चाफा', 'अग्निपंख', 'पानिपत', 'असा मी असामी' अशा मराठी; तर 'हॅरी पॉटर', 'द व्हाइट टायगर', 'वाइज अँड अदरवाइज', 'शक्ती', 'द लाइफ ऑफ पाय' अशा इंग्रजी पुस्तकांच्या बनावट आवृत्त्या स्वस्तात फूटपाथवर उपलब्ध आहेत.

भालचंद्र नेमाडे, व. पु. काळे, व्यंकटेश माडगूळकर, पु.ल., अब्दुल कलाम आणि अमीश त्रिपाठी या गाजलेल्या लेखकांच्या पुस्तकांचाही त्यात समावेश आहे.

याबाबत विक्रेत्याशी संवाद साधला असता, ''पुस्तके बनावट असूनही लोक विकत घेत असल्याचे त्याने सांगितले. यामध्ये सर्वांत जास्त बनावट पुस्तके इंग्रजी लेखकांची आहेत.''

पायरसी रोखणे खूपच कठीण आहे. तरुणाईने अशी पुस्तके विकत घेऊ नयेत. पायरसी हा गुन्हा आहे. त्यामुळे प्रकाशन संस्थांचे व लेखकांचे आर्थिक नुकसान होते. ते थांबविले पाहिजे.

## 'आयुष्यावर बोलू काही'चा एक हजारावा प्रयोग

मराठी कवितांना श्रोत्यांच्या ओठांवर रुंजी घालायला लावणाऱ्या कवी संदीप खरे आणि संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांच्या 'आयुष्यावर बोलू काही' कार्यक्रमाचा एक हजाराचा प्रयोग गरवारे महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजिण्यात आला होता. 'कृष्णा राजाराम अष्टकर ज्वेलर्स' हे या कार्यक्रमाचे प्रायोजक होते. कार्यक्रमापूर्वी येऊन गेलेल्या पावसाची आठवण करून देत संदीप-सलिल यांनी आरंभीच 'सरीवर सर...' 'पाऊस असा रुणझुण...' अशी गीते आपल्या दमदार स्वरात सादर करीत मैफल रंगवली.

'अगोबाई ढगोबाई..', 'सुटी...', 'बाबा म्हणतो..', 'या विश्वाची आम्ही लेकरे...', मिसेस स्पायडर मॅन...' या गीतांनी 'थोरांमधल्या पोरांनाही'

मनमुराद आनंद दिला. मात्र 'दमलेल्या बाबाची कहाणी' ऐकताना याच थोरांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. त्यानंतर सादर झालेल्या 'मी मोर्चा नेला नाही.... 'जपत किनारा शीड सोडणे...', 'काळी माती निळं पाणी...', 'नसतेस घरी तू जेव्हा...', 'तुझं खरं का माझं खरं...' या एकाहून एक सुंदर गीतांनी मैफल रंगली. या वेळी संदीप-सलिल बरोबरच गायिका आर्या आंबेकर आणि छोटा गायक शुभंकर कुलकर्णी यांनाही रसिकांनी भरभरून दाद दिली. 'आयुष्यावर बोलू काही' या गीताने मैफलीचा समारोप झाला. मैफलीला ताल वाद्यांची सुरेल साथ देणारे आदित्य आठल्ये, रितेश ओहोळ, मिथिलेश पाटणकर, कमलेश भडकमकर, कृष्णा मुसळे, अभय इंगळे यांच्यासह इतर कलावंतांचा सत्कार करण्यात आला.

## पुण्यात १२० हास्य क्लब

सध्याच्या धावपळीच्या, तणावाच्या युगात माणूस खळखळून हसणे विसरला की काय असे वाटते आणि त्यामुळेच हसायलासुद्धा आपल्याला चक्क क्लबमध्ये जावे लागते. हास्य क्लब ही आता गरजच झाली असून, पुण्यातील अशा अनेक क्लबांनी मनसोक्त हसण्याची संकल्पना रुजवली आहे.

नवचैतन्य हास्ययोग क्लबसारखे शहरात सुमारे १२० हास्यक्लब असून, दहा हजार सभासद या हास्ययोगाचा फायदा घेत आहेत. दिवसेंदिवस क्लबची आणि सभासदांची संख्या वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. मे महिन्याच्या पहिल्या रविवारी 'जागतिक हास्य दिन' साजरा केला जातो.

पुण्यात १७-१८ वर्षांपूर्वी सार्वजनिक ठिकाणी जाऊन एकत्र पद्धतीने व्यायाम करण्याची पद्धत रूढ झाली नव्हती; परंतु त्याच काळात नारायण पेठ येथील नवचैतन्य क्लबने हास्ययोग ही नवीन संकल्पना नागरिकांमध्ये रुजविण्यास सुरवात केली. सुरुवातीला १५ सभासद असणाऱ्या या क्लबमध्ये आज दहा हजारांवर सभासद आहेत. कर्मचाऱ्यांना असलेले ताणतणाव दूर करण्यासाठी आणि कामात प्रगती होण्यासाठी अनेक सरकारी कार्यालये, विविध आयटी कंपन्या हास्ययोग संकल्पनेचा आधार घेत आहेत. या हास्ययोगामध्ये एक किंवा दोनच हास्य प्रकार नसून, तब्बल ५० हास्य प्रकारांचा समावेश आहे. त्यामध्ये वेलकम हास्य, मंत्री हास्य, मिरची हास्य आणि मोबाईल हास्य आदींचा समावेश आहे. शारीरिक व्यायामातून हास्य

करण्यासाठी कोणत्याही विनोदाची आवश्यकता नसते याची प्रचिती आपल्याला सकाळी उद्यानात फेरफटका मारला की येते.

याबद्दल क्लबचे अध्यक्ष विठ्ठल काटे म्हणाले, ''या हास्ययोगात ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुलांचा समावेश उल्लेखनीय आहे. एक विरंगुळा म्हणून ज्येष्ठ नागरिकांना आपला एकाकीपणा दूर करण्यासाठी, नैराश्य कमी करण्यासाठी या क्लबचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होताना दिसत आहे. उत्तम रक्ताभिसरण, नकारात्मक वृत्ती कमी होऊन जीवनाकडे नव्या उमेदीने पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन तयार होण्यास मदत होते. हास्ययोगामुळे रक्तदाब, मधुमेह यासारखे आजार कमी होणे तसेच भूक, झोप लागणे अगदी चांगले सकारात्मक बदल होत आहेत. विविध धर्मांचे, भाषांचे लोक एकत्र येत असल्याने राष्ट्रीय एकात्मता वाढण्यास हातभार लागत आहे.

मानसोपचार तज्ज्ञ डॉ. स्वप्नील देशमुख म्हणाले, ''दररोज सकाळी मनमोकळेपणाने हसल्याने मेंदूतील वाईट विचारांचे रसायन नष्ट होऊन मेंदूला चालना मिळते. हृदयविकार, सांधेदुखी, रक्तदाब, मधुमेह यांसारखे आजार हास्ययोगामुळे कमी होतात. कामातील ताणतणावांमुळे येणारा थकवा, नैराश्य, नकारात्मक वृत्ती दूर होऊन नवीन उत्साह, प्रेरणा मिळते. त्यामुळे कामाचा स्तर वाढण्यास मदत होते. हास्याबरोबर शारीरिक व्यायाम होत असल्याने दीर्घकालीन रोगांवरदेखील नियंत्रण आणता येते.''

## जागतिक हास्यदिन

'देशामध्ये कोणीही वीज पाणी या ज्वलंत प्रश्नांबाबत बोलत नाही. सिनेमातील प्रेमाचं स्वप्न विकणाऱ्यांची गर्दी दूरचित्रवाणीवर झाली आहे,'' असे मत वात्रटिकाकार रामदास फुटाणे व्यक्त केले.

फुटाणे म्हणाले, ''जगण्यासाठी आनंदाची गरज आहे. हास्यामधून आपल्या शरीरात रक्ताभिसरण चांगल्या पद्धतीने होते. जन्म व मृत्यू यामधील प्रवास सुखकर होण्यासाठी हास्य कलबमध्ये जाणे आवश्यक आहे.''

नवचैतन्य क्लब हास्य चळवळीच्या माध्यमातून 'आरोग्य सुधारा, चिंतामुक्त व्हा' असा संदेश देत असल्याचे मत कर्णे गुरुजी यांनी व्यक्त केले. शरीर व मन यांना तणावापासून मुक्त करण्याचे काम हास्यातून होते. सूत्रसंचालन मकरंद टिल्लू यांनी केले. विजय भोसले यांनी आभार मानले.

## निवडणुकांच्या सल्ल्यांचे बजेट आठशे कोटींवर

राजकीय पक्षांच्या प्रचाराचे नियोजन करणाऱ्या सल्लागार कंपन्यांची या निवडणुकीतील उलाढाल सातशे ते आठशे कोटी रुपयांवर जाईल, असा अंदाज असोचेम या संस्थेने वर्तविला होता.

प्रचाराच्या नवनव्या तंत्राने राजकीय पक्षांना प्रचाराचे नियोजन सांभाळणाऱ्या कंपन्यांची गरज भासू लागली आहे. या कंपन्या मतदानाचा हिस्सा, विजयातील फरक, मतदान आणि डेमॉग्राफिक प्रोफाइल तयार करतात. त्यामुळे जिंकणारा उमेदवार आपले वर्चस्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करतो, तर पराभूत उमेदवार त्याचे भविष्यातील नियोजन करतो. देशात सुमारे १५० राजकीय सल्लागार कंपन्या कार्यरत असल्याचे 'असोचेम' ला आढळले आहे. या कंपन्या एका मतदारसंघासाठी एक लाखापासून ५० लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारतात. यात प्रसारमाध्यमे हाताळणे, प्रचाराचे नियोजन करणे, मार्केटिंग पॉलिसी, जाहिराती तयार करणे, वेबसाइट, स्पेशल मीडिया पेज तयार करणे आणि प्रतिस्पर्ध्यांच्या स्ट्रॅटेजीचा अभ्यास करणे अगदी कामे करतात. मतदारांचे प्रोफाइल तयार करणे आणि त्यांना योग्य तो संदेश पाठविणे महत्त्वाचे असते.

या कंपन्यामध्ये जनसंपर्क आणि राजकीय प्रचार व्यवस्थापनाचा अनुभव असलेल्या मीडिया कंपन्यांचा समावेश असतो.

## 'हमीद दलवाई : क्रांतिकारी विचारवंत' - पुस्तकाचे प्रकाशन

''देशात समान नागरी कायदा नाही, म्हणून देशात एकात्मता नाही, असे म्हणणे चुकीचे आहे. फक्त कौटुंबिक कायदे वगळता इतर सर्व बाबतीत देशात समान नागरी कायदा अस्तित्वात आहे. समान नागरी कायद्यामुळे नाही तर भौतिक प्रगतीतला प्रत्येकाला समान वाटा मिळाल्यासच देशात एकात्मता नांदेल,'' असे मत सुप्रीम कोर्टाचे निवृत्त न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांनी व्यक्त केले.

प्रा. शमसुद्दिन तांबोळी संपादित 'हमीद दलवाई-क्रांतिकारी विचारवंत' या पुस्तकाचे प्रकाशन न्या. सावंत यांच्या हस्ते झाले. मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठन यांच्या संयुक्त विद्यमाने हमीद दलवाई व दिनकर जवळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला होता. कामगार नेते डॉ. बाबा आढाव, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे

सय्यदभाई, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर, मराठवाडा मित्र मंडळाचे प्रा. भाऊसाहेब जाधव आदी उपस्थित होते. गडहिंग्लज येथील देवदासी कार्यकर्त्या गौराबाई सलवादे यांची नात लक्ष्मी उर्फ योजना यांनी पीएचडी मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

'समान नागरी कायद्यावर बोलणाऱ्यांना मुस्लिम समाजातील महिलांची दया येत नसून त्यांना त्यातून वाढणाऱ्या लोकसंख्येची भीती आहे. एकात्मता हवी असेल, तर दुसऱ्यांच्या धर्मात लुडबुड करता कामा नये,' असे न्या. सावंत यांनी सांगितले.

''हमीद दलवाई हे मुस्लिम समाजीतील महात्मा फुले होते. आंतरजातीय विवाहांचा विचार अधिक जोमाने मांडला पाहिजे. देवदासी ही संकल्पनाच भयानक आहे. समान मूल्य, समान धारणा असल्यास त्यातून देवदासी प्रथेसारख्या क्लेशदायक घटना घडणार नाहीत,'' असे डॉ. विद्यासागर म्हणाले.

नगर जिल्ह्यातील नितीन आगे या युवकाच्या हत्येचा संदर्भ डॉ. आढाव यांनी शिक्षणामध्ये जातीअंताचा समावेश करण्याची मागणी केली. ते म्हणाले, ''पाच वर्षांच्या आतील लहान मुलांना शासनाकडून पोलिओ डोस देण्यात येतो, त्याप्रमाणे जातीअंताचे डोसही विद्यार्थ्यांना विद्यापीठांमधून दिले जावेत. शिक्षणामध्ये जातीअंताचा विषय समाविष्ट केला पाहिजे. त्यातून व्यापक समाज मानस तयार होऊ शकेल.''

## पुरुषोत्तमीयन्सचा स्नेहमेळा

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेतर्फे पुरुषोत्तम करंडक आंतर-महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त कलाकारांचा स्नेहमेळावा झाला. चार पिढ्यांतील कलाकार मेळाव्याला उपस्थित होते. ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, समीक्षक माधव वझे, नाटककार सतीश आळेकर, अभिराम भडकमकर, योगेश सोमण, सुषमा देशपांडे, न्यायमूर्ती मृदुला भाटकर, प्रवीण तरडे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सुहास जोशी आदी या वेळी उपस्थित होते. सुधीर गाडगीळ यांनी सर्वांशी संवाद साधला.

स्पर्धा सुरू होण्यामागील पार्श्वभूमी आणि ज्यांच्या नावाने स्पर्धा होते, त्या पुरुषोत्तम वझे यांच्या आठवणींना माधव वझे यांनी उजाळा दिला.

‘तेव्हाच्या एमईएस (आताच्या गरवारे) कॉलेजमधून १९६३मध्ये खंडेराव केळकर दिग्दर्शित राधेय या एकांकिकेतून रंगमंचावर पहिला प्रवेश झाला. त्यानंतर कलोपासकशी आजही निगडित असल्याचा आनंद वाटतो,’ असे गोखले म्हणाले.

पुरुषोत्तम केल्यानंतर नाटक हेच अभिव्यक्तीचे माध्यम असल्याची जाणीव झाल्याचे आळेकर यांनी सांगितले. भाटकर आणि देशपांडे यांनी पत्रकारिता विभागाकडून केलेल्या ‘रक्तपुष्प’ या एकांकिकेच्या आठवणी सांगितल्या. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेशी संबंधित प्रश्नमंजुषाही या वेळी घेण्यात आली.

## बाल दीर्घांक महोत्सव

नाट्यसंस्कार कला अकादमीतर्फे आयोजित रंगकर्मी कृष्णदेव मुळगुंद यांच्या जन्मशताब्दीनिमित्त यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात बालमहोत्सव संपन्न झाला. धनंजय सरदेशपांडे लिखित ‘येस वुई वॉंट चार्ली’ आणि विनीता पिंपळखरे लिखित ‘सिंहगडाला जेव्हा जाग येते’ हे दीर्घांक सादर करण्यात आले. सुयश झुंजूरके याने या दीर्घांकांचे दिग्दर्शन केले होते.

‘...चार्ली’ दीर्घांकात एका श्रीमंत घरातील चिमुरडी घरात आई-वडील नसताना चार्ली हवा म्हणून हट्ट करते. तिला सांभाळणारा नोकर चार्ली केवळ चित्रपटातील असतो, ते खोटा असतो वगैरे सांगून तिची हरप्रकारे समजूत काढण्याचा प्रयत्न करतो. मात्र, तिला ते काही पटत नाही. काही गुंड त्या मुलीचे अपहरण करून खंडणी मिळवण्याच्या तयारीत असतात. अशावेळी तो नोकर चार्ली बनून येतो आणि धमाल उडवतो त्याची गोष्ट या दीर्घांकातून उलगडली होती. रंगमंचावर चार्ली पाहून उपस्थित बालप्रेक्षक खुश झाले.

इंग्रजी माध्यमात शिकणारी काही मुले नाटक करायचे ठरवतात. नाटकासाठी ‘सिंहगड’ची गोष्ट निवडतात. त्याची माहिती शोधत असताना एका मुलाला पोवाडा सापडतो. तो पोवाडा म्हटल्यावर त्यांना स्फुरण चढते आणि ते स्वत:च नाटक कसे करतात हे ‘सिंहगडला जेव्हा जाग येते’ या दीर्घांकातून दाखविण्यात आले होते.

## ज्योत्स्ना भोळे यांची जन्मशताब्दी

स्वरवंदना प्रतिष्ठानतर्फे दिवंगत गायिका ज्योत्स्ना भोळे यांचा शंभरावा

नवे कोरे

# द घोस्ट इन लव्ह


मूळ लेखक
जोनाथन कॅरोल

अनुवाद
उदय कुलकर्णी

**किंमत : ३००/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

**टी-बुक क्लबच्या सभासदांना निम्म्या किंमतीत उपलब्ध**

**टी-बुक क्लबचे ५वे पुस्तक...**




एक माणूस मरण पावतो आणि विचित्र काहीतरी घडतं. तो माणूस मरत नाही त्यामुळे मृत्यूनंतरच्या प्रवासाकरिता त्याच्या आत्म्याला न्यायला आलेलं भूत आश्चर्यचकित होतं. ते भूत त्याच्या वरिष्ठाकडे जातं आणि आणि आता काय करायचं असा प्रश्न विचारतं. वरिष्ठदेखील बुचकळ्यात पडतो. त्यालाही हे कसं काय झालं याचं उलगडा होत नाही. तो त्या भूताला माणसासोबतच राहण्याचा सल्ला देतो. बिचारं भूत सल्ला मान्य करतं आणि मग गमतीशीर गोष्टी घडायला लागतात. ते भूत त्या माणसाच्या मैत्रिणीच्या प्रेमातच पडतं आणि गुंतागुंत वाढतच जाते!

लवकरच त्या माणसाला कळतं की तो मेला नाही, कारण इतिहासात प्रथमच माणसांनी आपलं नशीब देवावरती सोपवणं बंद केलेलं असतं. हा बदल सोपा असला तरी त्याची किंमत मात्र मोजावी लागणार असते...

नशीब, इच्छा, प्रेम अशा विषयांवर खुमासदार व खुसखुशीत शैलीत भाष्य करणारी फँटसी!

जन्मदिन साजरा करण्यात आला. भोळे यांचा फोटो ज्येष्ठ व्हायोलिनवादक फैय्याज हुसेन खाँ यांच्या हस्ते भारत गायन समाजाच्या अध्यक्षा शैला दातार यांना भेट देण्यात आला. भोळे यांच्या कन्या वंदना खांडेकर, 'स्वरानंद प्रतिष्ठान'चे प्रकाश भोंडे, भारत गायन समाजाचे विश्वस्त सुहास दातार आदी या वेळी उपस्थित होते.

केशवराव आणि ज्योत्स्ना भोळे यांचे भारत गायन समाजाशी दृढसंबंध होते. भोळे यांच्या आठवणींना उजाळा देताना हुसेन खाँ म्हणाले, 'ज्योत्स्ना भोळे यांच्याशी अगदी निकटचा संबंध आला हे माझे भाग्य आहे. त्या थोर गायिका होत्या. त्यांना सर्व गायनप्रकार अवगत होते. त्या स्वत:च खऱ्या अर्थाने मैफल होत्या. त्यांना संगत करण्याची संधी मिळाली.' कार्यक्रमानंतर भोळे यांच्या शास्त्रीय गायनाच्या रेकॉर्ड ऐकविण्यात आल्या तसेच आग्रा घराण्याचे राजा मियाँ यांचे गायन झाले.

## रंगलेली गझल-संध्या

साप्ताहिक लोकगौरव आणि शब्दसंस्कार साहित्य कला मंच यांच्यातर्फे एस. एम. जोशी, सभागृहात ज्येष्ठ गझल समीक्षक डॉ. राम पंडित यांच्या अध्यक्षतेखाली मुशायरा घेतला गेला.

ज्येष्ठ गझलकार रमण रणदिवे यांच्या गझलांनी सुरू झालेला मुशायरा उत्तरोत्तर रंगत गेला. वा. न. सरदेसाई, ज्योती बालिगा-राव, ए. के. शेख, सदानंद डबीर, दिलीप पांढरपट्टे या गझलकारांनी काव्यरसाची उधळण केली.

अक्षरांना आशयाचे भान कोठे राहिले,
सूरही शालीन आता छान कोठे राहिले,
हा जमाना वेगळा, तो जमाना वेगळा
गोड गाणी ऐकणारे कान कोठे राहिले...

गझलेतले अनेक बारकावे उलगडणाऱ्या रणदिवे यांच्या निवेदनानंतर अलिबागचे दिलीप पांढरपट्टे यांनी मैफिलीचा ताबा घेतला.

उडवाच मान माझी, माझा नकार नाही
इतकीच शर्त आहे, मी वाकणार नाही.
मी एवढ्याचसाठी स्थायिक कुठे न झालो
भिंती छतात माझे घर मावणार नाही.

पांढरपट्टेंच्या या ओळींना रसिकांची दाद मिळाली.

मज सांग आज तुझ्याकडे उमलून मी येऊ कशी?
भवतालच्या नजरांस या चुकवून मी येऊ कशी?
कुठल्या घराचा उंबरा खिळवून मजला ठेवतो तुझिया करी,
उल्केपरी निखळून मी येऊ कशी?

पहिली महिला गझलकार म्हणून ज्योती बालिगा राव यांच्या काव्याचं रसिकांनी भरभरून कौतुक केलं.

सदानंद डबीर यांनी ज्येष्ठ गझलकार सुरेश भट यांच्या निधनसमयी केलेल्या ओळी ऐकवल्या.

अंत्ययात्रा ज्या दिशेनं जायला लागेल रे
धूळही रस्त्यातली गायला लागेल रे
तो कवी होता न साधा, एक झंझावात तो
शब्द सांभाळून त्याचा न्यायला लागेल रे

सरदेसाई आणि शेख यांच्या सादरीकरणालाही दाद मिळाली. पुष्पा सुरेश भट आणि शैला नाडकर्णी यांचा यावेळी प्रतिभा शाहू मोडक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राम खोमणे, जयवंत हापन, सुभाष पवार आदी या वेळी उपस्थित होते.

## रुपे कार्ड

व्हिसा कार्ड आणि मास्टर कार्डच्या धर्तीवर भारतीय कार्ड म्हणून भारताने रुपे कार्ड हे नवीन कार्ड बाजारात आणले आहे. म्हणजेच रुपेच्या रूपात एक नवा पर्याय भारतीयांना उपलब्ध झालेला आहे. राष्ट्रपती भवनात प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते या कार्डचे नुकतेच उद्‌घाटन करण्यात आले.

रु म्हणजे या रुपया आणि पे म्हणजे पेमेंट! या दोन्हींचे रूप आणि कार्य रुपे कार्ड मध्ये आहे. त्यामुळे या दोन्ही शब्दांची आद्याक्षरे घेऊन रुपे हे नाव या कार्डला देण्यात आले आहे. या कार्डचे काम नावाशी मेळ खाणारे आहे. 'नॅशनल पेमेंटस् कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ने या कार्डची निर्मिती केलेली आहे.

एटीएम इंटरनॅशनल कार्डच्या तुलनेत रुपे कार्ड कमी किंमतीत उपलब्ध केले जाणार आहे. सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांनी आतापर्यंत २५,३३१ रुपे एटीएम वितरित केले आहेत. चालू आर्थिक वर्षांच्या कालावधीत आणखी ९

हजार एटीएम लावले जाणार आहेत. भारतासारख्या देशात या कार्डामुळे देवाणघेवाणीची चौकट रुंदावण्यास मदत होणार आहे.

* एटीएम मशीनमधून कॅश काढण्यासाठी, शॉपिंगसाठी आणि पेट्रोल पंपांवर पैसे देण्यासाठीही रुपे कार्डचा वापर करता येईल.
* 'आयआरसीटीसी' अर्थात भारतीय रेल्वे लवकरच रुपे कार्डमार्फत तिकीट बुकिंग सुविधादेखील सुरू करेल.
* या कार्डामुळे कॅशवर अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी होईल.
* ग्राहकांना पैसे देण्याच्या ऑप्शन्समध्ये व्हरायटीदेखील मिळेल.
* बँक यासाठी विदेशी मुद्राच्या मोबदल्यात भारतीय रुपयांमध्ये शुल्क चुकवेल.
* एटीएम, विक्री केंद्र, ऑनलाईन विक्री या तीनही मार्गांनी रुपे कार्ड काम करू शकते.
* बँक यासाठी विदेशी मुद्राच्या मोबदल्यात भारतीय रुपयांमध्ये शुल्क चुकवेल.
* अडीचशेपेक्षा जास्त बँका रुपे कार्ड जारी करणार आहेत.
* सक्रिय रुपे कार्डधारकांना १ लाख रुपयांपर्यंतची विमा सुरक्षा.
* रुपे कार्डसारख्या सुविधा कुठल्याही आंतरराष्ट्रीय कार्ड योजनेकडे नाहीत.
* बँकांनी जारी केलेले एकात्मिक किसान कार्डही रुपे पुरविते.

## 'लढा लोकपालचा' पुस्तकाचे प्रकाशन

लोकपाल विधेयक संसदेत १९६८ पासून आठ वेळा आले; पण कायदा झाला नाही. मात्र, लोकशक्ती रस्त्यावर आल्यावर तिच्या रेट्यामुळे सरकारला कायदा करावा लागला. आता भ्रष्ट लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा (राइट टू रिकॉल) कायदा होण्यासाठी लढा सुरू करणार आहे. त्यासाठी सरकारवर दबाव आणता यावा म्हणून लोकसभेच्या निकालानंतर देशभर फिरून तरुणांचे भक्कम संघटन करणार आहे, अशी घोषणा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केली.

'सकाळ'चे मुख्य उपसंपादक धनंजय बिजले यांनी लिहिलेल्या 'लढा लोकपालाचा : उद्रेक आम आदमीचा' या पुस्तकाचे प्रकाशन हजारे यांच्या हस्ते झाले. खासदार राजू शेट्टी, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, प्रकाशक सुनील मेहता

व्यासपीठावर उपस्थित होते. हजारे म्हणाले, ''सरकारने लोकपालचा अर्धवट कायदा केल्याने भ्रष्टाचार थांबणार नाही. त्यामुळे आता 'राइट टू रिजेक्ट' आणि 'राइट टू रिकॉल' हे कायदे अस्तित्वात आणण्यासाठी लढा देणार आहे. लोकसभा निवडणुकीनंतर देशभरात फिरून बळकट जनसंघटन उभे करणार आहे.''

''केवळ सत्तेवर जाऊनच देशाचा विकास होईल असे नाही. त्यासाठी जनशक्तीचा दबाव राहणे ही काळाची गरज आहे. माहिती अधिकार आणि लोकपालचा कायदाही लोकांच्या आंदोलनामुळे करावा लागला. चळवळ आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे विकासाला गती देण्याबरोबर चळवळींनाही बळ द्यावे लागेल. ''माझ्यासमोर एकटे सुरेश जैन वा पद्मसिंह पाटील नाहीत. संसदेत चारित्र्यशील लोक जावेत, अशी अपेक्षा आहे. समाजविघातक प्रवृत्तींचा बीमोड करण्याचा विचार घेऊन आम्ही त्यांना विरोध करीत आहोत,'' असे हजारे यांनी स्पष्ट केले.

शेट्टी म्हणाले, ''चळवळीतील व्यक्तींनी राजकारणात पडू नये ही भूमिका मान्य नाही. धोरणे बदलण्याची संधी मिळत असेल, तर ती घेतलीच पाहिजे. निवडणुकीसाठी खूप पैसा लागतो हा समजही चुकीचा आहे. उमेदवार योग्य असला की लोकच त्याचा खर्च करतात. मी त्याचे एक उदाहरण आहे.'' चौधरी म्हणाले, ''राजकीय व्यवस्था बदलण्यासाठी नवा राजकीय पक्ष हा पर्याय नाही. व्यवस्था बदलण्यासाठी आंदोलने सुरू राहिली पाहिजेत.'' धर्माधिकारी म्हणाले, ''लोकप्रतिनिधींवर 'राइट टू रिकॉल'ची टांगती तलवार राहिलीच पाहिजे. यामुळे राजकीय पक्ष त्यांचे उमेदवार जबाबदारीने निवडतील.'' सामाजिक चळवळीतील तरुणाईच्या अस्वस्थेत वेध घेण्याचा प्रयत्न पुस्तकातून केल्याचे बिजले यांनी सांगितले.

## 'निराला' काव्यरस

रसिक मित्र मंडळ आयोजित 'एक कवी एक भाषा' उपक्रमांतर्गत डॉ. सुनील देवधर आणि डॉ. शशिकला राय यांनी हिंदी कवी 'निराला' यांच्या काव्याचे सादरीकरण केले.

राम-रावण युद्धप्रसंगी भगवान श्रीराम यांनी केलेल्या शक्तीपूजेचं अतिशय सुरेख वर्णन कवी निराला यांनी केलं आहे.

रवी का हुआ अस्त

ज्योती के पत्र पर लिखा
अमर रह गया, राम-रावण
का अपराजेय समर...

श्रीराम यांचं स्वत:च्या मनाशी सुरू असणारं द्वंद्व या काव्यातून प्रकटतं. भगवान श्रीरामांसह लढणारे त्यांचं मनोबल कसं वाढवतात, याचं रसभरित वर्णनही या काव्यात निराला यांनी केलं आहे.

रावण अशुद्ध होकर भी
यदी कर सकता त्रस्त
तो निश्चित तुम हो शुद्ध
करोगे उसे ध्वस्त...

या जांबुवंताच्या तोंडी असणाऱ्या ओळी याचीच प्रचिती देतात. देवधर आणि राय यांनी त्या-त्या व्यक्तिरेखेनुसार काव्यवाचनात आणलेले बारकावे उपस्थितांची दाद मिळवून गेले. निराला यांच्या काव्याबाबत रसिकांनी प्रश्न विचारले. डॉ. महेंद्र ठाकूरदास यांनी कवी निराला यांची गझल सादर केली.

## महाराष्ट्रात मान्यताप्राप्त ग्रंथालये फक्त १३ हजार

कोलकत्ता येथील राजा राममोहन राय प्रतिष्ठानकडून अनुदान मिळविण्यास महाराष्ट्र राज्यातील ग्रंथालये पिछाडीवर आहेत. सर्वांत लहान असलेल्या केरळातील ग्रंथालयांनी तेथून अनुदान मिळवण्यात बाजी मारली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामोद्धाराची जी चार उद्दिष्टे विचाराधीन होती, त्यात 'गाव तेथे ग्रंथालय'चा समावेश होता. राज्यात ४५ हजार गाव-खेडी असूनही मान्यताप्राप्त ग्रंथालयांची संख्या १३ हजारच आहे. वाचन-संस्कृतीबाबत सरकारी पातळीवर अशी अनास्था असताना भुदरगड तालुक्यातील १८ गावांमध्ये ९० ठिकाणी सार्वजनिक वाचनालये आहेत. 'गाव तेथे ग्रंथालय' हे उदिष्ट साध्य करणारा भुदरगड तालुका पहिला असेल. तालुक्यातील ११ ग्रंथालये स्वत:च्या इमारतीत असून, उर्वरित इमारत बांधणीसाठी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. अर्थसाहाय्य मिळणे अवघड नाही.

राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानकडून दोन प्रकारचे अनुदान मिळते. त्यात ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान, सार्वजनिक ग्रंथालयातील विविध विभागांचा विकास करण्यासाठी अर्थसाहाय्य,

ग्रंथालयांना महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी मदत, बालविकास विभाग स्थापन करण्यासाठी निधी यांचा समावेश आहे. शिवाय मॅचिंग स्कीम आणि नॉन मॅचिंग स्कीम अशा दोन प्रकारच्या अनुदानातून ग्रंथालयांची इमारत सुसज्ज इमारत व ग्रंथखरेदी होऊ शकते. यासाठी सरकारतर्फे प्रस्ताव पाठविण्याची गरज असते. मात्र बहुतांश ग्रंथालयांना या योजनेची माहितीच नाही.

## 'दुसरी गोष्ट' चित्रपटाचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्याकडून कौतुक

''दुसरी गोष्ट' हा चित्रपट खरोखरच प्रेरणादायी आहे,' अशा शब्दांत राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी या चित्रपटाचे कौतुक केले. मुखर्जी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनाही या चित्रपटाने भुरळ घातली.

राष्ट्रपती मुखर्जी यांच्यासाठी चित्रपटाच्या विशेष खेळाचे दिल्लीतील राष्ट्रपती भवनात आयोजन केले होते. या वेळी दिग्दर्शक कुलकर्णी, लेखक अजित दळवी, प्रशांत दळवी, निर्मात्या मंजिरी हेटे, डॉ. शैलजा गायकवाड, प्रसाद महाडकर व काही कलाकार उपस्थित होते.

चित्रपट पाहताना मुखर्जी यांना भाषेची अडचण आली नाही. दुसऱ्या भागातील अनेक राजकीय, सामाजिक संदर्भ आणि कलावंतांनी केलेले काम पाहून त्यांच्या आठवणींना उजाळा मिळाला. चित्रपट पाहिल्यानंतर शिंदे म्हणाले, ''हा चित्रपट माझ्या आयुष्याशी साधर्म्य साधणारा आहे. मात्र चित्रपट संपताना तो भारतातील प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी ठरतो, ही बाब अधिक मोलाची आहे.''

राज्याच्या कानाकोपऱ्यातून हा चित्रपट पाहून भारावल्याच्या प्रतिक्रिया येत आहेत. चित्रपटाची गुंतवून ठेवण्याची शक्ती, लेखन, दिग्दर्शन, छायांकन, पात्र योजना, कलावंतांचा अभिनय आणि निर्मितीमूल्य यांचे कौतुक होत आहे. पुण्यातील आदित्य गानू हा बालकलाकार महिला प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे, तर सिद्धार्थ-नेहाची जोडी तरुणांमध्ये लोकप्रिय झाली आहे. विक्रम गोखले, आनंद इंगळे, सुनील तावडे, भारती पाटील-सरवदे या कलाकारांसह रेणुका शहाणे, प्रतीक्षा लोणकर या पाहुण्या कलाकारांच्या योगदानाचेही कौतुक होत आहे.

## भारतातील अब्जाधीश

समाजातील गरीब आणि श्रीमंतांमधील दरी दिवसेंदिवस वाढतच चालली असून, आर्थिक उत्पन्नातील असमानतेत भरच पडत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (आयएमएफ) संचालिका ख्रिस्तिन लगार्डे यांनी सांगितले की, गेल्या १५ वर्षांत भारतातील अब्जाधीशांची संपत्ती १२ पटींनी वाढली आहे. त्याचे नेमके प्रमाण सांगायचे झाले, तर त्या संपत्तीद्वारे देशातील गरिबीचे दोनदा निर्मूलन करता येईल,' 'आर्थिक उत्पन्नातील असमानता बहुतांश देशांत वाढीला लागली असल्याचेही त्या म्हणाल्या, 'ब्रेड मिळत नसेल, तर केक खा' असा सल्ला फ्रान्सच्या राणीने दिल्याचा इतिहास आपल्याला माहिती आहे. वाढत्या आर्थिक असमानतेमुळे त्या इतिहासाची पुनरावृत्ती होणार असल्याचे भय वाटत आहे.

दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेच्या सुरुवातीला 'ऑक्सफॅम'चा 'वर्किंग फॉर द फ्यू' हा अहवाल सादर करण्यात आला. जगाची लोकसंख्या सात अब्ज आहे. यातील ३.५ अब्ज लोकांच्या एकूण संपत्ती एवढी संपत्ती ८५ श्रीमंतांकडे एकवटली आहे, असे त्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. मोजक्याच, श्रीमंतांकडे अतिप्रचंड संपत्ती एकवटल्यामुळे अनेक सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

* जगातील दर दहापैकी सात माणसे, गेल्या तीन दशकांत आर्थिक असमानता वेगाने वाढलेल्या देशात राहतात.
* जगातील कवेळ ८५ श्रीमंतांकडे निम्म्या जगाची संपत्ती एकवटली आहे.
* अमेरिकेत केवळ एक टक्का नागरिक १५ टक्के उत्पन्न मिळवत असून, ही परिस्थिती २००९ पासून आहे.
* अर्थतज्ज्ञांनी असमानतेच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष केले. त्यांनी आर्थिक वाढीच्या वितरणापेक्षा तिच्या आकाराकडे लक्ष केंद्रित केले.
* आर्थिक उत्पन्नाच्या वितरणात खूप असमानता असेल, तर विकासाचा वेग आणि शाश्वतता यांच्यावर दीर्घकालीन विपरीत परिणाम होतो.
* आगामी तीन दशकांत पृथ्वीतलावर आणखी दोन अब्ज लोकांची भर पडलेली असेल आणि त्यापैकी सुमारे ७५ कोटींहून अधिक नागरिक ६५ वर्षांवरील असतील.

* ६५ वर्षांवरील व्यक्तींचे प्रमाण पाच वर्षांखालील मुलांपेक्षा अधिक असणे ही घटना प्रथमच २०२० पर्यंत घडेल.

## पत्रांचा लिलाव

महात्मा गांधी यांचे ज्येष्ठ चिरंजीव हरिलाल यांच्या वर्तणुकीबद्दल गंभीर चिंता व्यक्त करणाऱ्या गांधीजींच्या तीन पत्रांचा इंग्लंडमध्ये लिलाव होणार आहे. जून १९३५ मध्ये लिहिलेल्या या तीन पत्रांच्या संचाला सुमारे ५० ते ६० हजार पौंड किंमत येण्याची शक्यता लिलाव करणाऱ्या म्युलॉक संस्थेने व्यक्त केली आहे.

गुजराती भाषेत असलेली ही पत्रे अद्याप सुस्थितीत आहेत. ही पत्रे गांधी कुटुंबीयांकडूनच मिळाल्याचे म्युलॉकने म्हटले आहे. ती पत्रे ऐतिहासिक दस्तावेजाचा एक भाग असून, ल्युडली रेसकोर्समध्ये २२ मेपासून लिलावासाठी ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय, गांधीजींनी बंदिवासाच्या काळात जवाहरलाल नेहरू यांच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित यांना लिहिलेल्या २७ पत्रांचा संचही विक्रीस ठेवण्यात येणार आहे. हरिलालच्या पत्राबाबत आम्हाला कल्पना आहे, की यापूर्वी अशा प्रकारची बाब कधीही समोर आली नाही आणि या पत्रांच्या माध्यमातून प्रथमच गांधीजी आणि त्यांच्या मुलाच्या संबंधांबाबत नवीन माहिती जगासमोर येत आहे, असे म्युलॉकने म्हटले आहे. वडिलांप्रमाणेच आपणही इंग्लंडला बॅरिस्टर होण्यासाठी जावे, अशी हरिलाल यांची इच्छा होती. मात्र, गांधीजींनी त्यास विरोध केला होता. ब्रिटिशराज्यविरोधातील आंदोलनास पाश्चात्य शिक्षण साह्यभूत ठरणार नाही, अशी गांधींजींची धारणा होती. यामुळे हरिलाल यांनी कुटुंबाशी संबंध तोडले आणि शेवटपर्यंत वडिलांशी त्यांचे कधीही पटले नाही.

हरिलाल यांच्या वाईट वर्तणुकीबाबत चिंता व्यक्त करताना गांधीजींनी पत्रात म्हटले, ''मला खरे सत्य सांग. तुला अजूनही मद्यामध्ये रुची आहे. मद्याच्या आहारी जाण्यापेक्षा मरण बरे, असे मला वाटते. तुला कळायला पाहिजे, की हा प्रश्न माझ्यासाठी त्रासदायक आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्य संग्रामासाठीसुद्धा तो अडचणीचा ठरू शकेल.''

साबरमती येथील आश्रमात आपल्या आजोबांकडे (गांधीजी) राहण्यासाठी आलेल्या मनूने गांधीजींना वडिलांबद्दल (हरिलाल) काही गोष्टी

सांगितल्या याचा उल्लेख करताना गांधीजी म्हणतात ''मनूने (हरिलाल यांची कन्या) मला तुझ्याबाबत अनेक भयंकर गोष्टी सांगितल्या आहेत. आठ वर्षांपूर्वी झालेले अत्याचार आणि त्यानंतर घ्याव्या लागलेल्या वैद्यकीय उपचारांमुळे झालेला त्रास हा सहन करण्यापलीकडचा होता.''

## 'ऑप्ट्रा स्कॅन' उपकरणाची पुण्यात निर्मिती

कॅन्सरसारख्या दुर्धर व्याधींचे नेमके निदान करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा सूक्ष्मदर्शक (मायक्रोस्कोप) विकसित करण्यात यश आले आहे.

बायोमेडिकल इंजिनीअरिंग क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 'ऑप्ट्रा ग्रुप ऑफ कंपनीज' ने हा आकाराने लहान असलेला परिणामकारक डिजिटल मायक्रोस्कोप विकसित केला आहे. 'ऑप्ट्रा स्कॅन' असे त्याचे नामकरण करण्यात आले आहे, अशी माहिती कंपनीचे अध्यक्ष अभिजित घोलप यांनी दिली.

उघड्या डोळ्याने पाहता येणार नाही इतक्या सूक्ष्म वस्तूंच्या निरीक्षणांसाठी मायक्रोस्कोप वापरले जाते. १९८० पासून संशोधकांने सूक्ष्मदर्शकाला डिजिटल कॅमेरा आणि रोबोटिक सिस्टीम जोडण्याचे प्रयोग चालू होते. २००० मध्ये अमेरिका आणि युरोपातील काही संशोधकांनी सूक्ष्मदर्शकाखाली पाहण्यात येणाऱ्या स्लाइडच्या चित्रीकरणासाठी डिजिटल स्कॅनरचे प्रारूप तयार केले. स्कॅनरची बाजारातील किंमत होती दोन लाख डॉलर! त्यामुळे विकसनशीलच नव्हे, तर विकसित देशांनाही ते परवडणारे नव्हते. या पार्श्वभूमीवर 'ऑप्ट्रा स्कॅन'चे महत्त्व ठसते.

'दीडशे वर्षांच्या या तंत्रज्ञानाचा चेहरामोहरा बदलून टाकण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. गेल्या काही दशकांपासून अशा प्रकारच्या उपकरणांची मागणी होती,' केंद्र सरकार आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशीलकर या दोघांनीही या संशोधनाबाबत प्रोत्साहन दिले. या प्रकल्पाला केंद्राच्या जैवतंत्रज्ञान; तसेच औद्योगिक आणि वैज्ञानिक संशोधन विभागाने मान्यता दिली आहे.

## न्युझिअम

वॉशिंग्टन डीसीमध्ये नसिसल्वानिया ॲव्हेन्यू भागात २००८ पासून न्यूझिअम या वृत्तमाध्यमाविषयीच्या अनोख्या संग्रहालयाने सोशल

मीडियालाही आता आपलेसे केले आहे. लोकशाहीमध्ये फ्री मीडियाचे स्थान काय आहे, हे अधोरेखित व्हावे व जग आणि जनता यांच्यात एकमेकांविषयी जाणीव वाढावी, या उद्देशाने १९९७मध्ये या न्यूझिअमची संकल्पना प्रत्यक्षात आली. न्यूझिअममध्ये सहा मजल्यांवरील १५ दालनांमध्ये वृत्तपत्रे, टीव्ही, रेडिओपासून इंटरनेटपर्यंत बातमीदारीचा प्रवास उलगडत जातो. ‘अवर लिबर्टी डिपेन्ड्स ऑन द फ्रीडम ऑफ द प्रेस...’ हे थॉमस जेफरसन यांचे वाक्य वृत्तपत्रस्वातंत्र्याची आठवण देत राहते. फ्रीडम फोरम हे फाऊन्डेशन ना नफा ना तोटा तत्त्वावर हे न्यूझिअम चालविले.

प्रत्येक ठिकाणी टचस्क्रीन, व्होडिओ क्लिप, भित्तीचित्रे-माहिती यांचा वापर केला आहे. न्यूझिअममध्ये दररोज जगभरातील ७०० हून अधिक वृत्तपत्रांच्या मुखपृष्ठांचे डॉक्युमेन्टेशन होते. इमारतीच्या दर्शनी भागातच त्यातील ८० मुखपृष्ठे आपल्याला पाहायला मिळतात. पहिल्या मजल्यावर पुलित्झर पुरस्कार विजेत्या हजार छायाचित्रांची गॅलरी असून तिथेच फोटोग्राफर्सच्या अनुभवाविषयीच्या ३०० व्हिडीओ क्लिप्स आणि ४०० ऑडिओ क्लिप्स आहेत.

## मोबाइल स्क्रीन

एकाएकी मोबाइल खाली पडला की त्याचा स्क्रीन फुटतो. त्यानंतर काय मग, सगळाच उजेड... कॉल करता येत नाही आणि कॉल घेताही येत नाही... अशावेळी मोबाइलचा स्क्रीन बदलण्याशिवाय काही तरणोपाय राहत नाही. टचस्क्रीन असेल तर परिस्थिती आणखीच बिकट होते. या पार्श्वभूमीवर वैज्ञानिकांनी अशा प्रकारच्या प्लॅस्टिकची निर्मिती केली आहे, की तुटल्या-फुटल्यानंतर हे प्लास्टिक स्वत:च स्वत:ची काळजी घेईल आणि तुटलेला भाग पुन्हा भरून काढेल.

वैज्ञानिकांनी विकसित केलेल्या या पॉलिमरमध्ये तीन सेंटिमीटरपर्यंतची तुटलेली वस्तू जोडण्याची क्षमता आहे. एखादी जखम झाल्यानंतर ज्या पद्धतीने रक्त गोठते, त्या प्रक्रियेवर आधारित हे नवीन संशोधन आधारित आहे. त्यामुळे मोबाइलचा स्क्रीन फुटला किंवा टेनिसची रॅकेट मोडली तर हे प्लॅस्टिक स्वत:हून तुटलेला भाग परत भरून काढेल, असे हे तंत्रज्ञान आहे. गेल्या काही दशकांपासून संशोधक मानवी त्वचेसारख्या कार्यरत प्लॅस्टिकच्या निर्मितीत गढून गेले आहेत

अंतराळात सोडलेले कृत्रिम उपग्रहदेखील स्वत:च्या स्वत: दुरुस्ती करून स्वयंपूर्ण होतील, लॅपटॉप आणि मोबाइल यांच्या 'इलेक्ट्रॉनिक चिप' याच प्लास्टिक पासून तयार केल्यास त्यांच्यातील छोट्यामोठ्या दुरुस्त्या आपोआपच होतील, युनिव्हर्सिटी ऑफ इलिनॉयामधील प्रा. स्कॉट व्हाइट आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशिष्ट प्रकारच्या पॉलिमरमध्ये सूक्ष्म कॅप्सूलचे मिश्रण टाकले. या कॅप्सूलमध्ये दुरुस्तीसाठी वापरण्यात येणारे द्रव भरण्यात आले होते. मोबाइल अथवा लॅपटॉपला तडे अथवा चिरा पडल्यास त्वरित रसायनाचा स्राव त्या जागी जातो आणि तडे भरून काढण्यास मदत करतो.

हे पॉलिमर अद्याप चाचणीच्या टप्प्यात असून सध्या फक्त छोटे तडेच भरून काढण्याची त्याची क्षमता आहे. ज्या जागी तुटले आहे, त्या जागी सूक्ष्म नलिकांचा अंतर्भाव असणारे रसायन दोन टप्प्यांत टाकले जाते. पहिल्या टप्प्यांत तडे आलेल्या ठिकाणी ते भरून काढणारे रसायन टाकले जाते. ते वाळल्यानंतर वस्तू पूर्वीसारखी दिसण्यासाठी दुसरे रसायन टाकण्यात येते. संशोधकांच्या मते ३५ मिलिमीटर जाडीच्या चिरा अथवा तडे भरून काढण्यासाठी २० मिनिटांचा अवधी लागतो.

जगभरात चालू असलेले वैज्ञानिक प्रयोग, अभ्यास आणि पेपर प्रेझेंटेशन आदींची इत्थंभूत माहिती मिळविण्यासाठी ही वेबसाइट अत्यंत उपयुक्त आहे. आकर्षक फोटो आणि संबंधित व्हिडिओंच्या माध्यमातून प्रत्येक वैज्ञानिक विषयाचे विश्लेषण येथे उपलब्ध आहे. या साइटच्या माध्यमातून एका दृष्टिक्षेपात जगभरातील विज्ञानविषयक ज्ञान आपल्यासमोर हजर होते.

## गेमचेंजर टेक्नॉलॉजी

जगभरातील कोणतीही अर्थव्यवस्था असो, तिच्या दीर्घकालीन वाटचालीसाठी 'टेक्नॉलॉजिकल इनोव्हेशन्स' अर्थात तंत्रज्ञान निर्मितीची आवश्यकता असते. तंत्रज्ञानातील नवनिर्मितीशिवाय अर्थव्यवस्थेची दीर्घकालीन आणि दमदार वाटचाल अशक्यच आहे.

चार प्रकारच्या तंत्रज्ञानामुळे संबंधित उद्योगांमध्ये आगामी दशकात १० ते २० ट्रिलियन (हजार अब्ज) डॉलरची उलाढाल होण्याची दाट शक्यता आहे.

माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगांत 'न भूतो न भविष्यति' अशी क्रांती

घडवून आणणारी शक्ती म्हणून ‘एसएमएसी’ अर्थात सोशल, मोबाइल, ॲनलिटिक्स आणि क्लाउड’चा उदय झाला आहे. एकाच ॲप्लिकेशनमध्ये सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानाचा समावेश असलेले ‘एसएमएसी’ विकसित करण्यात आले. गेल्या काही वर्षांमध्ये मोबाइलच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढझाली. या शिवाय मोबाइल नेटवर्कमध्येही (टू जी, थ्री जी आणि फोर जी) क्रांती होत आहे. या शिवाय क्लाउड कम्प्युटिंगच्याही उदयाने तंत्रज्ञानाला हात दिला आहे. या सर्वांच्या एकत्रीकरणातून माहिती तंत्रज्ञान उद्योगाची दमदार वाटचाल सुरू आहे.

२०१४ मधील नेमके बदल काय ?

पेशंटना उपचार घेण्यासाठी हॉस्पिटलांत जाण्याची गरज नाही. कनेक्टिव्हिटींच्या माध्यमातून घरबसल्या उपचार शक्य.

अतिरिक्त शुल्काशिवाय बँकेच्या सर्व सेवा मोबाइलवर उपलब्ध होणार.

‘एसएमएसी’द्वारे रिटेलर्सकडून ग्राहकांना ऑनलाइन शॉपिंगची सुविधा.

चारचाकी वाहनांमध्ये इंटेलिजन्सचा अंतर्भाव शक्य.

**जनुकीय तंत्रज्ञान**

मानवी आरोग्याचा सर्वांत महत्त्वाचा घटक असणाऱ्या ‘डीएनए’चे संपूर्ण विश्लेषण करण्याचे तंत्रज्ञान शोधण्यात येत आहे. ‘जनुकी’च्या (जिनेम) माध्यमातून आजाराचे निदान करण्याला किंवा पूर्वइतिहास जाणून घेण्याला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाल्याने त्याचा खर्चही आवाक्यात आला आहे. काही हजार डॉलरच्या बदल्यात जिनेमची निर्मिती करता येते. केवळ दोन आठवड्यातच जनुकीय आराखडा तयार करता येऊ शकतो. त्यानुसार या आराखड्याला पूरक असणारी उपचारपद्धती अथवा औषधांची उपाययोजना करणे शक्य होते. भविष्यात हे तंत्रज्ञान कॅन्सरग्रस्त पेशंटना जीवदान देणारे ठरू शकते. मेंदूचा कॅन्सर झालेल्या पेशंटच्या जनुकीय आराखड्याचा अभ्यास करून योग्य त्या औषधांची उपाययोजना प्रत्यक्षात केली जात.

२०१४ मधील नेमके बदल काय?

संपूर्ण जनुकीय आराखडा एका आठवड्यातच तयार होणार.

जनुकीय आराखडे आउटसोर्स करण्याचे काम भारतात येण्याची शक्यता.

जनुकीय आराखड्यांचा उपयोग कॅन्सरग्रस्त पेशंटच्या उपचारांसाठी

होण्याची शक्यता.

**इलेक्ट्रिक कार**

२०१३ मध्ये अमेरिकेतील 'तेस्ला' कंपनीने मॉडेल एस या नावाने इलेक्ट्रिक कारची यशस्वी चाचणी घेतली. चालू वर्षात 'तेस्ला' तर्फे जगभरात उत्पादनांची निर्मिती आणि विस्तार करण्यात येणार आहे. 'तेस्ला' शिवाय होंडा, बीएमडब्ल्यू, जनरल मोटर्स, फोक्सवॅगन आदी आघाडीच्या कंपन्याही इलेक्ट्रिक कारच्या निर्मितीत उतरण्याची दाट शक्यता आहे. साधारणत: २०२० नंतर जगभरात इलेक्ट्रिक कारच्या विक्रीत वाढहोण्याची शक्यता आहे. त्यानंतर बाजारात याच कारचा वरचष्मा राहण्याची शक्यता आहे. चालू वर्षात अनेक मोटारमधील गिअरबॉक्सही लुप्त होण्याची शक्यता आहे. शिवाय एकाच चार्जमध्ये अधिक अंतर कापणाऱ्या इलेक्ट्रिक मोटारही बाजारात येण्याची शक्यता आहे.

२०१४ मधील नेमके बदल काय?

एका चार्जिंगमध्ये ५०० किमी धावणाऱ्या मोटारीचे स्वप्न प्रत्यक्षात.

इलेक्ट्रिक कार्स भारतात लाँच होणार

अमेरिकेत एकूण वाहनांच्या तुलनेत इलेक्ट्रिक कार्सची संख्या १ टक्के होणार.

**उत्पादनप्रक्रियेत इंटरनेटचा वापर**

मशिन्सचे एकमेकांशी जाळे विणणे अर्थात अर्थात इंटरनेट हा आजच्या आधुनिक युगाचा सक्सेस पासवर्ड बनला आहे. इंटरनेटच्या प्रभावी जाळ्याची निर्मिती ही विविध प्रकारचे सेन्सर आणि मोटारींची एकत्र विणलेली मोट होय. एकीकडून माहितीचा अखंड पुरवठा आणि दुसरीकडून त्या उत्पादकतेला इंटरनेटची जोड देण्याला खऱ्या अर्थाने पुढील वर्षी सुरुवात होण्याची शक्यता आहे. उत्पादकता वाढविणे आणि कमीतकमी वेळेचा वापर होणे, यासाठी त्याचा वापर होऊ शकतो. आजपर्यंत इंटरनेटचा वापर केवळ संदेशांची देवाणघेवाण करण्यासाठीच करण्यात आला. मात्र नजीकच्या भविष्यात या माध्यमातून उत्पादकतेला दिशा देण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

२०१४ मधील नेमके बदल काय ?

'एसएमएसी' तंत्रज्ञानाचा वापर उत्पादनात होणे शक्य

स्वस्त मायक्रोप्रोसेसरची निर्मिती आवाक्यात येणार.

उत्पादित वस्तूंमध्ये सेन्सर बसवणे शक्य.

विक्रेते कॉमन कम्युनिकेशन प्रोटोकॉलशी जोडले जाणार.

## स्त्रीदेहाच्या वस्तूकरणाविरोधात ‘अभिव्यक्ती’ची मोहीम

जाहिरातीमधून होणारे स्त्रीदेहाचे बाजारीकरण आणि स्त्रीची ठरवून दिली जाणारी भूमिका याविरोधात ‘लोकायत’ची ‘अभिव्यक्ती’ ही संघटना ‘ॲडव्हरटायझिंग काऊन्सिल ऑफ इंडिया’ कडे दाद मागणार आहे. स्त्रीदेहाचे वस्तूकरण टाळण्यासाठी जाहिरातींमध्ये काय दाखवले जावे याबाबत काही नियम असावेत, या मागणीसाठी राज्य महिला आयोगाकडेही संघटनेतर्फे मागणी करण्यात येणार आहे.

‘इंडियन मेन वाँटेड’ अशा मथळ्याखाली मुलांना ‘बोट पार्टी’साठी आमंत्रित करणाऱ्या ‘ॲक्स डिओरंट’च्या जाहिरातींचा निषेध करत शहरात तीन ठिकाणी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या जाहिरातींना काळे फासले. अशा प्रकारच्या जाहिरातींच्या विरोधातील मोहीम सुरू ठेवण्यासाठी संघटनेने महाविद्यालये, महिला मंडळे आणि सोसायट्यांमध्ये स्त्रीदेहाच्या बाजारीकरणासंबंधी चर्चा आणि परिसंवाद घडवून आणायचे ठरवले आहे.

या मोहिमेत अभिव्यक्तीला इतर महिला संघटनांचीही साथ मिळाली आहे. त्या म्हणाल्या, ‘‘जाहिरातीतील महिलांनी कोणत्या प्रकारचे कपडे घालावेत हा आमचा मुद्दा नसून स्त्री देहाच्या वस्तूकरणावर आक्षेप आहे. डिओडरंट विकण्यासाठी स्त्रीदेहाचा वापर केला जाणे ही शरमेची बाब आहे. जाहिरातीत स्त्रियांनी स्त्री म्हणून कोणती भूमिका पाडायला हवी हेही ठरवून दिलेले असते. या जाहिराती महाविद्यालयीन युवकांना डोळ्यासमोर ठेवून बनवल्या जात आहेत. तसेच लहान मुलेही या जाहिराती बघतात. स्त्रीकडे पाहण्याची चुकीची नजर या जाहिरातींमधून त्यांना मिळते. या सर्व गोष्टींचा संबंध स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांशी आहे.’’

## ‘आयफोन ६’

जगभरातील ‘ॲपल’प्रेमींना प्रतीक्षा असते, ती आयफोनच्या नव्या मॉडेलची. आयफोन ६ ऑगस्टमध्येच बाजारात येंणार असल्याने ‘ॲपल’प्रेमींमध्ये उत्साह संचारला आहे. आता या फोनच्या फीचर्सवरून चर्चा सुरू झाली आहे.

सॅमसंग आणि नोकियाच्या मोठ्या स्क्रीनचे युजर्सना आकर्षण वाटते. आयफोनने आता मोठा स्क्रीन आणण्याचे मनावर घेतले आहे. ५.५ इंच स्क्रीनचा फोन लौकरच बाजारात येईल.

'ॲपल'च्या आयफोन ६ च्या संपूर्ण डिस्प्ले पॅनलवर सफायर कोटिंग असल्यामुळे डिस्प्लेवर स्क्रॅचेस पडणार नाहीत. शिवाय फुटण्या-तुटण्याचाही धोका नाही. 'केजीआय सिक्युरिट'चे विश्लेषक मिंग-ची-कुओ यांच्या म्हणण्यानुसार कंपनी अशी सॅफायर ग्लास फक्त ५.५ इंच डिस्प्ले असलेल्या ६४ जीबी क्षमतेच्या आय-फोन ६ लाच वापरली जाणार आहे. सफायर डिस्प्ले पॅनल देऊ शकणार आहे. सफायर डिस्प्ले पॅनल बसविण्यासाठी प्रत्येक 'आय-फोन६'ला २८० डॉलर जादा खर्च येणार आहे. सध्या बाजारात असलेल्या 'आय-फोन५ एस' साठी ९९१ डॉलर खर्च येतो. त्यामुळे या तुलनेत ६४ जीबीची स्टोअर कॅपॅसिटी असलेला सफायर पॅनल आय-फोन ६ खूपच महाग वाटतो. या फोनची चीनमध्ये किंमत ८००० युआन (१२८५ डॉलर) होते.

नव्या आयफोनचा लूक 'आयफोन ४'शी मिळताजुळता असेल.

सध्याच्या फोनपेक्षा त्याच्या कडा अधिक वक्राकार असतील आणि लुक 'आयपॅड एअर' सारखा दिसणारा असेल. या फोनमध्ये क्वाडकोअर श्रेणीतील ए ८ प्रोसेसरह २ जीबी रॅम असेल.

## राजीव सुरी

नोकियाचे मायक्रोसॉफ्टमध्ये विलीनीकरण झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची धुरा अपेक्षेप्रमाणेच, भारतीय वंशाचे राजीव सुरी यांच्याकडे सोपविण्यात आली. सन २००९ पासून सुरी हे नोकिया सोल्युशन आणि नेटवर्क विभागाचे प्रमुख होते. ४६ वर्षीय सुरी आणि मायक्रोसॉफ्टचे नवे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नडेला हे दोघेही मणिपाल तंत्र संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. सुरी यांचा जन्म सन १९६७ मध्ये भारतात झाला. त्यांचे बहुतांश बालपण कुवेतमध्ये गेले. शिक्षणासाठी मात्र भारतात राहून, मणिपाल तंत्र संस्थेतून त्यांनी सन १९८९ मध्ये इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन या शाखेतून अभियांत्रिकी पदवी मिळवली.

सुरी सन १९९५ मध्ये नोकियात रुजू झाले. त्याआधी आयसीएल (इंडिया), नायजेरिया येथे आरपीजी आणि चर्चगेट समूहामध्ये नोकरी केली.

सुरुवातीला नोकिया-सीमेन्स नेटवर्कच्या व्यावसायिक विभागात काम करणाऱ्या सुरी यांनी पुढल्या १२ वर्षांत व्यवसाय वृद्धी, विपणन, विक्री अशा विविध विभागांमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. एप्रिल ते ऑक्टोबर २००७ या कालावधीत नोकियाच्या सेवा विभागाचे प्रमुख म्हणून काम करताना भारतात नोकियाचे मोठे सेवा केंद्र सुरू व्हावे यासाठी कंपनीला प्रवृत्त केले. भारत, कुवेत, फिनलंड, ब्रिटन, नायजेरिया, जर्मनी आणि सिंगापूर या देशांमध्ये त्यांनी काम केले आहे. सुरी हे सध्या फिनलंडच्या हेलसिंकी या राजधानीत राहतात. त्यांच्या पत्नी उद्योजक आहेत, तर मोठा मुलगा बोस्टन येथील संगीत शाळेत संगीताचे धडे घेत आहे. स्वत: राजीव यांनाही संगीताची आवड आहे, पण व्यायामशाळेत जाऊन तंदुरुस्ती टिकवण्याच्या छंदात त्यांचा अधिक वेळ जातो.

सुरी यांच्यातील कामाचा उत्साह आणि त्यांची भविष्यवेधी निर्णयनीती ही व्यवसायवृद्धीस कारणीभूत ठरेल आणि कंपनीला बाजारात आपले नाव पुन्हा प्रस्थापित करता येईल.

## मुखपृष्ठाची गोष्ट

पुणे नगर वाचन मंदिरातर्फे जानकीबाई आणि कृष्णाजी नूलकर स्मृती व्याख्यानमालेत रविमुकुल यांचे ‘मुखपृष्ठाची गोष्ट’ या विषयावर सदीप व्याख्यान झाले. ज्येष्ठ साहित्यिकांच्या विविध साहित्यकृतींची मुखपृष्ठे आणि ती चितारताना केलेला विचार याविषयी रविमुकुल म्हणाले, ‘‘जी. ए. कुलकर्णी आणि पु. ल. देशपांडे या ज्येष्ठ साहित्यिकांचा अपवाद वगळता बऱ्याच लेखकांच्या पुस्तकांसाठी मुखपृष्ठ करण्याचे भाग्य मला लाभले. अर्थात, त्या साहित्यकृतीचे वाचन केल्याशिवाय चित्र रेखाटायचे नाही ही माझ्या कामाची पद्धत आहे. पूर्वी लेखक हस्तलिखित द्यायचे. काळानुसार आता डीटीपी लेखन हाती येते. या लेखनाचे मी आधी वाचन करतो. माझ्या पद्धतीने अर्थ आणि अन्वयार्थ लावतो. त्यानंतर चित्र साकारताना त्यामध्ये माझे अनुभव मिसळले जातात. लेखनकृतीसाठी निर्मिलेली सुसंवादी चित्रकृती म्हणजे मुखपृष्ठ अशी माझी धारणा आहे.’’

## शाळांना पुस्तकांच्या संचाचे वाटप करणारे दत्तात्रेय पारखी

अवसरी खुर्द (तर्फ आंबेगाव) येथील मूळचे रहिवासी असलेले दत्तात्रेय

पारखी हे निवृत्तीनंतर पुण्यातील कात्रज परिसरातील सुखसागरनगर येथे स्थायिक झाले आहेत. आपल्यापेक्षा वयाने जास्त असलेल्या आणि हालचाल करण्यास सक्षम नसलेल्या इतर ज्येष्ठांची अनेक प्रकारची कामे ते सेवाभावीपणे करीत असतात. रुग्णांची औषधे आणून देणे, त्यांना दवाखान्यात जाण्यासाठी रिक्षा आणून देणे, ज्या जेष्ठ व्यक्तींना फारसे चालणे जमत नाही; त्यांची लाइट बिले, मोबाईल बिले, टेलिफोन बिले भरणे, पोस्टकार्ड, रेव्हेन्यू स्टॅम्प आणून देणे ही कामे ते आवर्जून करतात. या कामातून समाजसेवाही होते आणि सत्कारणी वेळ जातो, असे त्यांचे प्रांजळ मत आहे.

अशी छोटी-मोठी कामे करताना पारखी यांच्या अनेक कुटुंबीयांशी ओळखी झाल्या आहेत. या ओळखीतून वारंवार त्यांच्या घरी जाताना त्यांच्या घरातील जुनी, अडगळीत पडलेली पुस्तके ते स्वतःहून मागून घेतात व हीच पुस्तके एकमेकांच्या घरी पोचवतात. त्यातून सर्वांनाच अदलून-बदलून पुस्तके वाचायला मिळतात व ते मनोमन पारखींना धन्यवादही देतात.

आपल्याला मिळणाऱ्या पैशातील काही वाटा समाजासाठी द्यावा, इतरांची दुःखे जाणून घेऊन त्यांना आपल्या परीने मदत करावी, या वडिलांनी दिलेल्या शिकवणुकीने या पैशांतून बचत करून शेकडो पुस्तके स्वतः खरेदी करून ती त्यांनी शाळांतून वाटली आहेत.

'सेवानिवृत्त झालो म्हणजे आपले काम संपले, असे म्हणून घरात हातपाय गाळून बसण्यात काय अर्थ आहे, त्यापेक्षा बाहेर पडले पाहिजे. आपल्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्यांना मदत केली पाहिजे. इतरांना केलेल्या मदतीतून मिळणारा आनंद अद्वितीय आहे. तो प्रत्येकाने मिळविला पाहिजे आणि त्यातून आपलेही जगणे सुसह्य केले पाहिजे,' असे ते आवर्जून सांगतात.

## 'प्रिंट ऑन डिमांड'चा ट्रेंड

बाजारपेठेतील 'मागणी तसा पुरवठा' या सूत्राने मराठी पुस्तक प्रकाशनविश्वातही प्रवेश केला आहे.

'पुस्तकांच्या किती प्रती खपल्या?' याला मोठे महत्त्व असते. काही वेळा पुस्तकाची एक हजार प्रतींची पहिली आवृत्तीही संपत नाही. या पार्श्वभूमीवर मागणी असतानाही दुर्मिळ पुस्तके हजार प्रतींच्या संख्येत पुनर्मुद्रित करणे

प्रकाशकांना परवडत नाही. त्यामुळे प्रकाशकांकडून 'प्रिंट ऑन डिमांड' हे सूत्र अंमलात आणले जात आहे. एरवी पुस्तकांची छपाई 'ऑफसेट प्रिंटिंग' या तंत्राने केली जाते. त्यात प्लेट तयार करून पाचशे-हजार पुस्तके छापली जातात. मात्र लेसर तंत्रज्ञानामध्ये प्लेट तयार करण्याची गरज राहिलेली नाही. या तंत्रामुळे पाहिजे तेवढ्याच पुस्तकांची छपाई करता येते. या तंत्राच्या मदतीने मौज प्रकाशनगृहाने एके काळी गाजलेल्या; मात्र सध्या दुर्मिळ झालेल्या सुमारे चाळीसहून अधिक पुस्तकांचे पुनर्मुद्रण केले आहे. त्यात चिं.त्र्यं. खानोलकर, इंदिरा संत, न.र. फाटक, श्री.दा. पानवलकर अशा दिग्गज साहित्यिकांच्या पुस्तकांचाही समावेश आहे.

'मराठी साहित्यात एक काळ गाजवलेली अनेक पुस्तके आहेत. मात्र सध्या ती आउट ऑफ स्टॉक आहेत. या पार्श्वभूमीवर या पुस्तकांना मागणी असल्यास पाहिजे तितकीच पुस्तके पुनर्मुद्रित करणे शक्य आहे. 'प्रिंट ऑन डिमांड' तंत्रामुळे अनेक जुनी पुस्तके पुन्हा बाजारपेठेत येऊ शकतात,' असे मौज प्रकाशनगृहाचे संजय भागवत यांनी सांगितले.

## रूबिक क्यूबची चाळिशी

रूबिक क्यूब या कोड्याच्या रूपातील खेळण्याला चाळीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल गुगलने रूबिक क्यूबचे त्रिमिती डुडल सादर केले. हे त्रिमिती डुडल तयार करणे खूप आव्हानात्मक होते, असे रायन जेरमिक यांनी सांगितले.

या खेळण्यातील चौकोनांची रचना ५१९ क्विंटिलियन (एकवर अठरा शून्य) इतक्या पद्धतींनी करता येते. चौदा वर्षांपूर्वी गुगलने डुडल सुरू केले. यापूर्वी मूग डुडल हे मध्ये सादर करण्यात आले होते. ते संगीत प्रेमीसाठी होते. २०१० मध्ये 'पॅकमॅन' या व्हिडिओ गेमच्या तिसाव्या वर्षपूर्तीनिमित्त गुगलने डुडल सादर केले होते. रूबिक क्युब हे मुलांचे आवडते कोडे आहे. त्याच्या चाळिशीनिमित्त डिजिटल स्वरूपात त्रिमिती डुडल सादर केले गेले. त्यात वेगवेगळ्या रचना करण्याची सोयही करण्यात आली होती, म्हणजे वापरकर्ते ते खेळू शकत होते. रूबिक क्युबचा शोध हंगेरीचे शिल्पकार व प्राध्यापक एरनो रूबिक यांनी लावला होता.

## नखाते, देशमुख यांना बलराज सहानी पुरस्कार

बलराज सहानी-साहिर लुधीयानवी फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा बलराज सहानी पुरस्कार यंदा प्रसिद्ध चित्रपट अभ्यासक समर नखाते यांना, तर कैफी आझमी पुरस्कार निवृत्त न्यायाधीश एहतेशाम देशमुख यांना देण्यात आला. डॉ. जब्बार पटेल आणि सतीश आळेकर यांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण झाले.

## मालामाल शाहरुख

बॉलिवूडचा 'किंग ऑफ रोमान्स' शाहरुख खान याच्या नावाला आणखी एक उपाधी जोडली गेलीय. आता जगातील सर्वांत श्रीमंत कलाकारांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर जाऊन पोहोचला आहे. हॉलिवूड आणि बॉलिवूड अशा दोन्हीमध्ये अव्वल ठरलेल्या कॉमेडियन जेरी सोनफेल्डच्या नंतर शाहरुखचा नंबर लागला. या यादीप्रमाणे ६०० दशलक्ष मालमत्ता असलेला किंग खान हा एकमेव बॉलिवूडकर असून त्यानं चक्क टॉम क्रूझ, क्लिंट इस्टवूडसारख्या हॉलिवूडच्या मातब्बर लोकांना मागं टाकलंय हे विशेष.

## फ्लिपकार्ट' मध्ये 'मिंत्रा' चे विलीनीकरण

देशातील सर्वांत मोठी ऑनलाइन रिटेल कंपनी असणाऱ्या 'फ्लिपकार्ट'ने फॅशन पोर्टल 'मिंत्रा'ला ताब्यात घेतले असून, लवकरच तिच्यात ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. जागतिक ऑनलाइन बाजारपेठेत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या 'ॲमेझॉन'चे भारतात आगमन झाल्याच्या पार्श्वभूमीवर या दोन कंपन्यांच्या विलीनीकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

'मिंत्रा'चे शंभर टक्के विलीनीकरण करण्यात आले असून, भविष्यात फॅशन क्षेत्रामध्ये अधिकाधिक गुंतवणूक करण्याचा आमचा विचार आहे,' असे बेंगळुरूस्थित 'फ्लिपकार्ट'चे सहसंस्थापक सचिन बन्सल यांनी स्पष्ट केले. कंपनीतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार 'फ्लिपकार्ट'ने या व्यवहारासाठी १८०० कोटी रुपये मोजले आहेत. या व्यवहारामुळे वेगाने विस्तारणाऱ्या ऑनलाइन फॅशन उद्योगामध्ये 'फ्लिपकार्ट'चा पाया मजबूत होणार आहे. 'ॲमेझॉन'मध्ये कार्यरत दोन

माजी कर्मचाऱ्यांनी २००७मध्ये 'फ्लिपकार्ट'ची स्थापना केली होती. वेगाने वाढणाऱ्या ऑनलाइन रिटेलमध्ये आपला दबदबा निर्माण करण्याच्या उद्देशाने 'मिंत्रा'ला ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त आहे. या विलीनीकरणानंतरही दोन्ही कंपन्यांचे अस्तित्व स्वतंत्र राहणार असून, 'मिंत्रा'चे संस्थापक मुकेश बन्सल 'फ्लिपकार्ट'च्या फॅशन विभागाचे काम पाहणार आहेत. तसेच ते 'फ्लिपकार्ट'च्या संचालक मंडळावरही कार्यरत राहणार आहेत.

मुकेश बन्सल, आशुतोष लवानिया, इम्रान खान आणि विनीत सक्सेना या चार माजी 'आयआयटी'यन्सनी फेब्रुवारी २००७मध्ये 'मित्रां'ची स्थापना केली. २०१६पर्यंत 'मिंत्रा'ला अब्ज डॉलर उलाढाल करणाऱ्या कंपन्यांच्या यादीत नेण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे.

## चीनमध्ये फेसबुक

६१.८ कोटी इंटरनेट युझर असलेल्या चीनमध्ये २००९ पासून फेसबुक, ट्विटर, यू-ट्यूब आणि इतर अनेक सोशल साइट्सवर बंदी आहे. मात्र सरकारी योजना, विविध उपक्रमांचा प्रचारप्रसार करण्यासाठी चिनी अधिकारी याच साइट्सचा वापर करत आहेत.

चीनमध्ये सर्वसामान्य नागरिकांना सोशल साइट्स वापरण्यास बंदी असली तरी सरकारची अधिकृत वृत्तसंस्था झिनुआ, कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र पीपल्स डेली आणि सरकारी वृत्तवाहिनी सीसीटीव्ही या सर्वांचे ट्विटर अकाउंट आहे. हँगझोऊ या शहराला जेव्हा जागतिक पातळीवर स्वत:ची प्रतिमा उंचावायची होती, तेव्हाही फेसबुकची मदत घेण्यात आली. ऑस्ट्रेलियातील 'बेस्ट जॉब इन द वर्ल्ड'च्या धर्तीवर या शहराने आयोजित केलेल्या मॉडर्न मार्को पोलो स्पर्धेतही सहा फेसबुक ॲप्सचा समावेश होता. फेसबुक आणि ट्विटर अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेतील विजेत्याला ५५ हजार डॉलरचे बक्षीस आणि दोन आठवड्यांची हँगझोऊ शहराची ट्रिप मिळणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी शहराने हाँगकाँगमधील डिजिटल एजन्सीची नियुक्ती केली आहे, कारण तेथे फेसबुकवर बंदी नाही.

या स्पर्धेच्या प्रसिद्धीचे काम करणाऱ्या संस्थेचे सल्लागार मायकेल कॅव्हानॉग यांच्या मते, अशा साइट्सचा वापर टाळता येण्यासारखा नाही. या

स्पर्धेचा विजेता चीनमधलाच असेल की नाही यावर ते काहीही बोलत नाहीत. चीनमधील इतर शहरेही हाच ट्रेंड अमलात आणत आहेत.

त्यामुळे सोशल मीडिया कंपन्याही या देशातील संधींवर मोठ्या प्रमाणावर लक्ष ठेवून आहेत. म्हणूनच फेसबुकने बीजिंगमध्ये सेल्स ऑफिस सुरू करण्याची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी कर्मचारी भरतीची जाहिरात त्यांनी वेबसाइटवर टाकली आहे. चीनमधील पर्यटन संस्थांना जागतिक पातळीवर व्यवसाय विस्तार करण्यासाठी मदत करण्याची आमची इच्छा आहे, चीनमधील अनेक गोष्टी नागरिकांपर्यंत पोहोचलेल्याच नाहीत, असे फेसबुकच्या कॉर्पोरेट डेव्हलपमेंट विभागाचे उपाध्यक्ष बॉघन स्मिथ यांनी म्हटले होते. चीनमधील कम्युनिस्ट राजवटीने त्यांच्या एकछत्री अमलाविरोधातील जनमत मोठ्या प्रमाणात पसरू नये, यासाठी ऑनलाइन-ऑफलाइन दोन्ही प्रकारे प्रयत्न केले आहेत. त्यामुळे चीनमधील काही इंटरनेट युझर आणि व्यावसायिक ही सेन्सॉरशिप फेटाळण्यासाठी व्हर्च्युअल प्रायव्हेट नेटवर्कचा वापर करतात. खुद्द सरकारी वृत्तसंस्थाही कधीकधी याच मार्गांचा अवलंब करतात.


**५वी आवृत्ती**

# सोनेरी स्वप्नं भंगलेली

लेखक
वि.स. खांडेकर

**किंमत : १३०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




६वी आवृत्ती

# आत्मविश्वासाचा कानमंत्र

मूळ लेखक
अनंत पै

अनुवाद
चारुलता पाटील

**किंमत : ७०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




सर्वसाधारणपणे असा एक समज रूढ आहे की फक्त बुद्धिमान माणसं आणि अभ्यासात उत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी यांनाच उज्ज्वल भवितव्य असतं. परंतु लेखकाच्या मते हा समज पूर्ण चुकीचा आहे! ते म्हणतात,
''असं मुळीच नाही! बुद्धा नाही असं कुणीही नसतं; फक्त काही लोकांना बुद्धिमान कसं व्हावं याची नस सापडलेली नसते, एवढंच!''
माणसानं आयुष्यात आपल्या समोर ठाकलेल्या प्रत्येक प्रसंगाला केवळ इच्छाशक्तीच्या बळावर धैर्यानं आणि आत्मविश्वासानं कसं तोंड द्यावं, हेच 'आत्मविश्वासाचा कानमंत्र' या पुस्तकात सांगितलेलं आहे. मनात दृढआत्मविश्वास निर्माण करण्याचा एक निश्चित, सुस्पष्ट आणि विचारपूर्ण मार्ग लेखकानं दाखविलेला आहे.

प्रति, दिनांक २६ मे, २०१४

श्री. सुनील मेहता,

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, स.न.

आपणास कळविण्यास आनंद होतो. कन्याकुमारी पब्लिशिंग हाऊस, वाठार या प्रकाशन संस्थेमार्फत २४ मार्च, २०१३ रोजी, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शल्यविशारद, आणि शास्त्रज्ञ मा. श्री. डॉ. सतीश पत्की, (Gynaecologist) यांच्या शुभहस्ते आणि प्रख्यात साहित्यिक व समीक्षक मा. श्री. वैजनाथ महाजन यांच्या अध्यक्षतेखाली आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रकाशक मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक मा. श्री अनिल मेहता यांच्या मार्गदर्शनानुसार आणि उपस्थितीत प्रकाशित झालेल्या श्री. वसंत गायकवाड यांच्या ‘सत्यमेव जयते’ या कादंबरीस दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांच्या वतीने, ‘उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार’ म्हणून विशेष पुरस्कार’ देऊन गौरविले आहे.

पुरस्कार समारंभ दिनांक २५ मे, २०१४ रोजी पुरस्कार समारंभ छ. शाहू स्मारक भवन कोल्हापूर, दसरा चौक, कोल्हापूर येथे ख्यातनाम ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन खान यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागाचे प्रपाठक ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. रवींद्र ठाकूर हे होते. विचारमंचावर ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकुमार नलगे, दक्षिण महाराष्ट्र सभेचे अध्यक्ष विजय चोरमारे, कार्याध्यक्ष प्रा. वि. द. कदम कार्यवाह श्री. गोविंद पाटील उपस्थित होते. सरकार्यवाह प्रा. विनोद कांबळे यांनी आभार मानले.

मेहता पब्लिशिंग हाऊस या प्रकाशन संस्थेने श्री. वसंत गायकवाड यांच्या, तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर ‘साहित्यसम्राट’ आणि हुंडाबळी या ज्वलंत सामाजिक समस्येवरील ‘चितेवरच्या कळ्या’ या कादंबऱ्या प्रसिद्ध केलेल्या आहेत. दोन्हीही कादंबऱ्यांच्या दोन दोन आवृत्या प्रसिद्ध केलेल्या आहेत. ‘चितेवरच्या कळ्या’ या कादंबरीचे आकाशवाणी सांगली केंद्रावरून दोन वर्षे वाचन झाले होते. महाराष्ट्रातील रसिक श्रोत्यांनी उत्कृष्ट असा प्रतिसाद दिलेला होता.

श्री. वसंत गायकवाड यांची आगामी कादंबरी ‘तथागत... भगवान गौतम बुद्ध’ जीवन आणि तत्त्वज्ञान यावर आधारित मराठी भाषेतील महाकादंबरीचे चिंतन व लेखन सुरू आहे.

आपला नम्र,
प्रा. नरेंद्र गायकवाड
प्रकाशक

६वी आवृत्ती

# निर्मनुष्य

लेखक
रत्नाकर मतकरी

**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




मतकरींच्या प्रगल्भ शैलीतून साकार होत असलेल्या अगदी अलिकडच्या गूढकथांचा हा संग्रह.

वास्तवाच्या पायावर उभे असलेले कल्पनेचे जग मानसशास्त्रावर आधारलेले भितीचे विश्व मतकरींच्या कथांमधून साकार झाले आहे. उत्कंठा वाढवणारा संदेश आणि गारठून टाकणारे भय यांच्या जोडीनेच प्राणीमात्रांविषयी करूणा आणि अंतिम न्यायाचा आग्रह, राजकारणाचा स्पर्श हे त्या कथांचे लेखनसूत्र आहे.

या आशयसंपन्नतेमुळे मतकरींच्या कथा बदलत्या काळागणिक अधिकाधिक अर्थगर्भ होत गेल्या आहेत.

गूढकथा ही वाचकाला घाबरवण्यासाठी लिहिलेली कथा नसून ती मानवी जीवनावर भाष्य करण्यासाठी निवडलेली एक वेगळी दृष्टी आहे हेच या कथा वाचताना जाणवते.




## रमेश आगरवाल यांना 'ग्रीन नोबेल'

छत्तीसगडमधील आदिवासींमध्ये पर्यावरण जागृती आणि हक्कांची जाणीव निर्माण करण्यासाठी गेल्या दशकाहून अधिक काळ अविरत कार्यरत असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश आगरवाल यांना 'ग्रीन नोबेल' म्हणून ओळखले जाणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गोल्डमन पर्यावरण पारितोषिक जाहीर झाले आहे.

एक लाख ७५ हजार डॉलर अशी पारितोषिकाची रक्कम आहे. आगरवाल यांनी २०१२ मध्ये जिंदाल स्टील अँड पॉवर कंपनीविरुद्ध यशस्वी न्यायालयीन लढा लढवून, कंपनीला गारे या गावात आणखी एक कोळसा खाण उघडण्यास प्रतिबंध केला होता. या निकालानंतर तीन महिन्यांनी त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यांच्या डाव्या पायावर बंदुकीच्या दोन गोळ्या मारण्यात आल्या.

## जया दडकर यांच्या ग्रंथास केशवराव कोठावळे पुरस्कार

मॅजेस्टिक प्रकाशनाच्या केशवराव कोठावळे पुरस्कारासाठी या वर्षी ख्यातनाम चरित्रलेखक व छायाचित्रकार जया दडकर यांच्या 'दादासाहेब फाळके 'काळ आणि कर्तृत्व' या ग्रंथाची निवड झाली.

ललित मासिकाचा नुकताच साजरा झालेला सुवर्णमहोत्सव आणि पुरस्काराचे तिसावे वर्ष यांचे औचित्य साधत या वर्षी हे पारितोषिक एका विशेष रूपात दिले गेले. लेखकाच्या समग्र साहित्यिक कारकिर्दीचाही यानिमित्ताने गौरव केला गेला. २५ हजार रुपये रोख आणि मानचिन्ह, असे या विशेष पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. मीना वैशंपायन, प्रा. प्रतिभा कणेकर व चंद्रकांत भोंजाळ यांच्या निवड समितीने विपुल चरित्रसामग्रीचे संकलन,

अस्सल साधनांचा शोध व त्यातून जिव्हाळ्याने तरीही अलिप्तपणे चरित्रनायकाचे माणूस म्हणून केलेले चित्रण ही या ग्रंथाची वैशिष्ट्ये आहेत असे म्हटले.

## गुलजार यांना फाळके पुरस्कार प्रदान

पुरस्कार म्हणजे तुमच्या कामाची पावती असते. अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा त्यातून मिळते. तुम्ही आत्तापर्यंत केलेल्या कामावर दाखवलेला तो विश्वास असतो.

गेली पाच दशके आपल्या कवितेने, शायरीने अवघ्या भारतवासीयांना भुरळ घालणाऱ्या 'गुलजार' यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले गेले, तेव्हा रसिकांच्या मनात कृतज्ञतेचा भाव दाटला..

विज्ञान भवनात झालेल्या या शानदार समारंभात गुलजार (७९) पुरस्कार स्वीकारण्यासाठी मंचावर गेले, तेव्हा सर्व उपस्थितांनी उभे राहून त्यांना मानवंदना दिली. गुलजार यांच्या या स्वागताने केवळ ते स्वत:च नव्हे, तर त्यांच्यासोबत आलेली त्यांची लाडकी कन्या मेघनाही भावोत्कट झाली. सुवर्णकमळ, रोख दहा लाख रुपये आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

'आयुष्यभर जो शब्दांशी खेळत आला, त्याला आपल्या भावना व्यक्त करण्यासाठीही योग्य शब्द मिळू नयेत, असे फार क्वचितच घडते,' अशा शब्दांत गुलजार यांनी भावनांना वाट करून दिली. ते म्हणाले, 'लष्कर आणि चित्रपटसृष्टी ही दोन ठिकाणे अशी आहेत, की जिथे जात, वंश, धर्म यांना काहीही महत्त्व नाही. मी अत्यंत प्रामाणिकपणे सांगू शकतो, की सिनेमावाले लोक खूप छान आहेत. मी त्यांच्या धर्मनिरपेक्ष वृत्तीबाबत शपथेवर सांगू शकतो. मी या सिनेमासृष्टीचा भाग आहे आणि तेही माझ्या जगण्याचा भाग आहेत, याबाबत माझ्या मनात अत्यंत कृतज्ञ भाव आहे.'

सध्या राकेश ओमप्रकाश मेहरा यांच्या तूर्त 'मिर्झा' असे नामकरण केलेल्या नव्या प्रेमपटाची पटकथा व गीते आपण लिहिली असल्याचे जाहीर करून, हा पुरस्कार आपल्याला उशिरा मिळाला असे अजिबात वाटत नसल्याचे गुलजार यांनी स्पष्ट केले.

## अत्याळकर यांना 'अशोक मनोहर युवा ऊर्जा' पुरस्कार

तिसरा 'अशोक मनोहर युवा ऊर्जा' पुरस्कार गिरणी कामगार लढ्यातील कार्यकर्ते दत्तात्रेय अत्याळकर यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त ज्ञानेश्वर मोळक, कामगार नेत्या मुक्ता मनोहर, डॉ. अनंत फडके, उदय भट वगैरे उपस्थित होते.

''खाजगीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या प्रवासात प्रत्येकाचे कल्याण करण्याचे धोरण आखले जाते. मात्र, माणसाला जगवणे म्हणजे कल्याण नव्हे, तर त्याला आत्मसन्मानाने जगण्याची संधी देणे म्हणजे कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणणे,'' असे प्रतिपादन उत्तम कांबळे यांनी केले. संघटना, चळवळींना मोडून टाकल्यास कल्याणाची संकल्पना लोप पावेल, असेही त्यांनी नमूद केले.

कांबळे म्हणाले, ''भांडवलदारांच्या प्रभावामुळे १९९२ पासून सरकारने हळूहळू माघार घेण्यास सुरुवात केली. नव्या अर्थव्यवस्थेत प्रत्येकाला विकासाची संधी देण्याचे आश्वासन दिले गेले. स्पर्धेत उतरून लढा दिल्याशिवाय तुमच्या हाती काहीच लागणार नाही, अशी भावना रुजण्यास सुरुवात झाली. कंपन्यांच्या मागोमाग अनेक योजना आल्या. परंतु प्रत्येकालाच त्या योजनांपर्यंत पोचणे शक्य नाही. त्यामुळे ज्यांच्या कल्याणासाठी त्या योजना आहेत. त्यांच्यापर्यंत त्या घेऊन गेल्यास कल्याणकारी योजनांचा लाभ होईल.''

अत्याळकर म्हणाले, ''मनोहर यांच्या नावाने पुरस्कार देऊन माझा गौरव होणे, ही आयुष्यातील अभिमानास्पद गोष्ट आहे. जीवनात आलेल्या अनेक नैराश्याच्या प्रसंगांना दूर सारून चळवळीशी एकरूप झाल्याची ही पावती आहे.''

## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

आनंद गांधी दिग्दर्शित 'शिप ऑफ थिसियस' हा चित्रपट ६१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांत सर्वोत्कृष्ट ठरला. करमणूकप्रधान चित्रपटांच्या गटात 'भाग मिल्खा भाग'ने बाजी मारली. मात्र, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर पाच प्रकारांत पारितोषिके पटकावणाऱ्या मराठी चित्रपटांनी छाप पाडली आहे. तीन मे रोजी पारितोषिकांचे वितरण झाले.

''या पारितोषिकामुळे मला मनापासून आनंद झाला आहे. नितीश जैन

यांच्या ‘गुलाब गँग’ या चित्रपटालाही पारितोषिक मिळान्याचे मला समाधान आहे,’’ अशी प्रतिक्रिया गांधी यांनी व्यक्त केली. महान धावपटू मिल्खासिंग यांच्या जीवनावर आधारित व राकेश आमप्रकाश मेहरा दिग्दर्शित ‘भाग मिल्खा भाग’ या चित्रपटाने करमणूकप्रधान चित्रपटांच्या वर्गवारीत अग्रक्रम मिळवला. वकील आणि कार्यकर्ते ‘शाहीद’ या चित्रपटाबद्दल हन्सल मेहता सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक ठरले. याच चित्रपटातील प्रमुख भूमिकेबद्दल राजकुमार राव आणि ‘पेरियाथवर’ या मल्याळी चित्रपटातील भूमिकेबद्दल सुरज वेंजारामोडू यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक देण्यात आले. ‘जॉली एलएलबी’ या चित्रपटातील भूमिकेबद्दल अभिनेते सौरभ शुक्ला यांना सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचे पारितोषिक मिळाले. तसेच, ‘यलो’ या मराठी चित्रपटाला विशेष ज्युरी पुरस्कार मिळाला. या चित्रपटात काम करणारी कलाकार गौरी गाडगीळ आणि संजना राय यांचाही विशेष उल्लेख करण्यात आला.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रसिद्ध अभिनेत्री अमृता सुभाष यांना ‘अस्तु’ या मराठी चिपटासाठी सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्रीचा पुरस्कार या वेळी प्रदान करण्यात आला.

६१व्या राष्टीय चित्रपट पुरस्कारांवरच्या विजेत्या मराठी नावांमध्ये नागनाथ मंजुळे (फँड्री- पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन), सर्वोत्कृष्ट सामाजिक चित्रपट (तुहा धर्म कंचा), सोमनाथ अवघडे (बालअभिनेता, विभागून - फँड्री), अमृता सुभाष (सहायक अभिनेत्री, विभागून - अस्तू),बेला शेंडे (पार्श्वगायन - तुहा धर्म कंचा), सुमित्रा भावे, (पटकथा - संवाद - अस्तू) यांचा समावेश आहे.

अन्य विजेत्यांची नावे अशी : सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट : जॉली एलएलबी, इंग्रजी चित्रपट : आजचा दिवस माझा, कोकणी चित्रपट : बागा बीच, उत्कृष्ट दिग्दर्शक : हंसल मेहता-शाहीद, उत्कृष्ट अभिनेता : राजकुमार राव - शाहीद व मल्याळी अभिनेता सुरज वेंजरामोडू, उत्कृष्ट अभिनेत्री : गीतांजली थापा - लायर्स डान्स, सहायक अभिनेता : सौरभ शुक्ला - जॉली एलएलबी, सहायक अभिनेत्री : अमृता सुभाष (अस्तू) व आलिया अल्काशेफ - शिप ऑफ थिसियस, पार्श्वगायक : रूपंकर बागची (जतिश्वर, बंगाली), पार्श्वगायिका बेला शेंडे.

ज्येष्ठ अभिनेता सईद अख्तर मिर्झा यांच्या अध्यक्षतेखालील ११ सदस्यांच्या ज्युरी मंडळाने ही निवड केली.

## सावंत यांना 'नारगोलकर' पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे भवानी मंदिरात शिवजयंतीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात युवा शाहीर श्रीराम सावंत यांना 'शाहीर जयराम नारगोलकर' पुरस्कार देण्यात आला. विद्यापती ललिता नारगोलकर, अध्यक्ष दादा पासलकर आदी उपस्थित होते.

शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सावंत आणि त्यांच्या गटाने पोवाडे, भारूड, गण आदी कलाकृती सादर केल्या, तसेच शिवरायांवरील पाळणा, शौर्यगीते, राज्याभिषेक गीत आदींचा समावेश होता. कांचन जोशी, वनिता मोहिते आणि स्मिता बांदिवडेकर यांनी पारंपरिक पोवाडे सादर करून महाराजांना मानवंदना दिली. मुग्धा ओहाळ या बालशाहिराने सादर केलेल्या पोवाड्याला प्रेक्षकांची दाद मिळाली. 'लोककला आणि त्यातून प्रकट होणारी संस्कृती यांचे महत्त्व मोठे आहे. त्या गावांसोबत शहरांतही पोचवणे आवश्यक असल्याने हा वारसा अधिकाधिक कलाकारांनी पुढे न्यायला हवा,'' असे मत सावंत यांनी व्यक्त केले.

## श्रीकृष्ण दीक्षित यांना राज्यस्तरीय मुद्रितशोधक पुरस्कार

''लेखकाने केलेल्या लिखाणात मुद्रित शोधकाला हस्तक्षेप करण्याचे अधिकार नसतात. मात्र, तो लेखक व वाचकांतील महत्त्वाचा दुवा असतो,'' असे मत ज्येष्ठ मुद्रितशोधक श्रीकृष्ण दीक्षित यांनी व्यक्त केले.

स्वातंत्र्यसैनिक ल. स. वैद्य स्मृतिप्रीत्यर्थ हा राज्यस्तरीय पुरस्कार डॉ. अशोक कामत यांच्या हस्ते देण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, रा. रं. बोराडे, डॉ. सतीश बडवे, न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, दिनकर बोरीकर, पोलिस आयुक्त राजेंद्रसिंह, मधुकरअण्णा मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. रोख अकरा हजार रुपये, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. दीक्षित म्हणाले, ''लेखक, प्रकाशक, मुद्रकांना पुरस्कार दिले जातात; परंतु मुद्रितशोधकांसाठी पुरस्कार नाहीत. लेखक हे कधीकधी मुक्तहस्त लिखाण करताना गफलत करतात. शुद्धलेखनाच्या चुका झाल्याने




अनेक वाक्यांचे अर्थ बदलतात. अशा वाक्यांत लेखकाला जे म्हणायचे आहे; ते त्याच शब्दांत मांडण्याचे कसब मुद्रित शोधकांमध्ये असते.'' शालेय विद्यार्थ्यांना मुद्रितशोधनाचे धडे देण्याचा मानस त्यांनी या वेळी बोलून दाखविला. श्री. बोराडे म्हणाले, ''उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीला राज्य शासन पुरस्कार देते. तसेच मुद्रित शोधनाचे कष्ट उपसणाऱ्या व्यक्तींनाही पुरस्कार द्यायला हवेत.''

## २६ वी मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धा

सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आलेल्या २६व्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धेत अद्वैत आणि अश्वर्मा थिएटर या संस्थेच्या 'ठष्ट' या नाटकाला पाच लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले.

या स्पर्धेच्या अंतिम फेरीचे निकाल पुढीलप्रमाणे : अष्टविनायक आणि जिरिषा या संस्थेच्या 'गेट वेल सून' या नाटकास तीन लाख रुपयांचे द्वितीय पारितोषिक, कलावैभव या संस्थेच्या 'थोडंसं लॉजिक थोडंसं मॅजिक' या नाटकास दोन लाख रुपयांचे तृतीय पारितोषिक

दिग्दर्शन : पारितोषिक रु. ७५,००० चंद्रकांत कुलकर्णी (गेट वेल सून), द्वितीय पारितोषिक रु ५०,००० संजय पवार (ठष्ट), तृतीय पारितोषिक रु २५,००० राजीव शिंदे ('थोडंसं लॉजिक थोडंसं मॅजिक')

नाट्यलेखन : संवर्गात प्रथम पारितोषिक रु ५०,००० संजय पवार (ठष्ट) द्वितीय पारितोषिक रु. ३०,००० प्रशांत दळवी (गेट वेल सून), तृतीय पारितोषिक रु २०,००० राजीव शिंदे (थोडंसं लॉजिक थोडंसं मॅजिक)

प्रकाश योजना : प्रथम पारितोषिक रु. २०,००० हेमंत कुलकर्णी ('छापा काटा'), द्वितीय पारितोषिक रु. १०,००० भूषण देसाई ('मिस्टर अँड मिसेस')

## महाराष्ट्र साहित्य परिषद : (२६ मे २०१४)

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा मानाचा समजला जाणारा 'मसाप सन्मान' यंदा साहित्यिक डॉ. द. ता. भोसले यांना, तर 'भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' साधना कला मंचाचे विजय दांडेकर यांना देण्यात आला.

परिषदेचा १०८ वा वर्धापन दिन २७ मे रोजी साजरा करण्यात आला. या वेळी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ. मुं. शिंदे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. नव्याने सुरू केलेला 'ताईसाहेब कदम पुरस्कार' यंदा डॉ. पुष्पा गावित यांना, तर 'राजा फडणीस करंडक' परिषदेच्या सोलापूर शाखेला देण्यात आला. त्याआधी २६ मे रोजी निवारा सभागृहात अभिनेता विक्रम गोखले यांच्या हस्ते वार्षिक ग्रंथ व ग्रंथकार पारितोषिकांचे वितरण झाले.

* **वार्षिक ग्रंथकार पुरस्कार**

- राजा फडणीस पुरस्कार रामाचार्य अवधानी पुरस्कार (तत्त्वज्ञानविषयक) - डॉ. किसन महाराज साखरे,
- भा. रा. तांबे पुरस्कार (ज्येष्ठ कवीस) - प्रभा गणोरकर,
- ना. घ. देशपांडे पुरस्कार (गेय कविता) - दासू वैद्य,
- म. ना. गोगटे पुरस्कृत गो. रा. परांजपे पुरस्कार (विज्ञानविषयक लेखन) - मीना किणीकर,
- श्रीपाद जोशी पुरस्कार (संदर्भ ग्रंथ, अनुवाद, आंतरभारती कार्य) - राम म्हैसाळकर,
- कमलाकर सारंग पुरस्कार (नाट्यविषयक) अशोक पाटोळे

* **वार्षिक ग्रंथपारितोषिके (२६ मे २०१४)**

- ह. ना. आपटे पारितोषिक (कादंबरी) : विश्राम गुप्ते - 'ईश्वर डॉट कॉम'

- आनंदीबाई शिर्के पारितोषिक (कथासंग्रह) : म. वि. कोल्हटकर - 'मोहरा'
- म. वि. गोखले पारितोषिक (नाट्यविषयक) : राजीव नाईक - 'ना नाटकाचा'
- रा. ना नातू पारितोषिक (इतिहासविषयक) : श्रीकांत रामाणी - 'दर्यासारंग - वास्को द् गामा'
- सत्यशोधक केशवराव विचारे पारितोषिक (ललितेतर वैचारिक) : डॉ. सुधीर भोंगळे - 'आपुलाचि वाद आपणासी'
- गणेश सरस्वती ठाकूरदेसाई पारितोषिक (ललितेतर वैचारिक) : श्यामसुंदर मुळे - 'देवाला रिटायर करावे काय?'
- अभिजात पारितोषिक (सामाजिक शास्त्रे) : डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे - 'चाळीसगाव डांगाणी'
- शंकर पाटील पारितोषिक (कादंबरी) : अवधूत डोंगरे - 'एका लेखकाचे तीन संदर्भ'
- दि. बा. मोकाशी पारितोषिक (कथासंग्रह) : नीलिमा बोरवणकर - 'झळाळ'
- ग. ह. पाटील पारितोषिक (शिक्षणविषयक) : विनोदिनी पिटके-काळगी - 'सहज शिक्षणाची प्रयोगशाळा'
- नी. स. गोखले पारितोषिक (उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती) : अनुबंध प्रकाशन - 'स्पुटनिक ते चांद्रयान'
- कीर्तनसंजीवनी पुष्पलता रानडे पुरस्कृत लक्ष्मीबाई टिळक पारितोषिक (आत्मचरित्र) : संगीता धायगुडे - 'हुमान'
- शिवाजी सावंत पुरस्कृत राधाबाई सावंत स्मरणार्थ 'मृत्युंजय' पारितोषिक : प्रा. सुहासकुमार बोबडे - 'अग्नीकुंड'
- कमल व के. पी. भागवत पारितोषिक (वैचारिक-मानसशास्त्र, समाजशास्त्र, स्त्रीजीवनविषयक) : डॉ. अश्विनी धोंगडे - 'बायकांविषयक बरेच काही'
- स. रा. गाडगीळ पुरस्कृत विजया गाडगीळ पारितोषिक (उत्कृष्ट वाङ्मयमूल्य) : डॉ. सुशीला ओडेयर - 'सत्यशोधक विठ्ठल डोणे'
- डॉ. अरविंद वामन कुलकर्णी पारितोषिक (सामाजिक आशय) : रमाकांत कुलकर्णी - 'इथे नांदतो दुष्काळ'


- वि. वि. बोकील पारितोषिक (उत्कृष्ट बालवाङ्मय) : आ. गो. महाजन - 'टांगाटोली' (गद्य), संदीप खरे - 'अग्गोबाई ढगोबाई' (पद्य)
- अंबादास माडगूळकर पारितोषिक (सामाजिक आशय) : एम्. डी. रामटेके - 'आम्ही माडिया'
- शरश्चंद्र मनोहर भालेराव पारितोषिक (प्रबंधलेखन) : लतिका भानुशाली - 'आमच बाप आन् आम्ही आणि मराठी वाङ्मयीन परंपरा
- डॉ. पुष्पलता शिरोळे पारितोषिक (आहार, आरोग्य) : डॉ. रवी जवळगेकर - 'मृत्यूचा सौदागर तंबाखू'
- मालिनी शिरोळे पारितोषिक (स्तंभलेखन) : शुभांगी गोखले - 'रावा'
- ॲड. त्रिंबकराव शिरोळे पारितोषिक (ललितगद्य) : मंजिरी धामणकर - 'अनुनाद'


२८वी आवृत्ती

# श्रीमानयोगी


लेखक
रणजित देसाई

**किंमत : ५४०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**



**४थी आवृत्ती**

# यशाचा कानमंत्र




मूळ लेखक
अनंत पै

अनुवाद
चारुलता पाटील


**किंमत : ८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

यश संपादन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध घटकांची सांगोपांग या पुस्तकात लेखकांनी चर्चा केलेली आहे. ते म्हणतात,

''एकदा का तुमच्या हाती आत्मविश्वासाचा जादूचा दिवा हातात आला की, बस्स! तुम्ही मनात इच्छा करायचाच अवकाश, की तुमची ती इच्छा पूर्ण झालीच, म्हणून समजा!''


मात्र मनात ती इच्छा रुजवण्याचं देखील एक तंत्र आहे; आणि तेच या पुस्तकात सविस्तर सांगितलेलं आहे.

आपल्या यशाच्या आड येणारे सगळे अडथळे कसे दूर सारायचे, हे अतिशय साध्या आणि सोप्या भाषेत या पुस्तकात सांगितलेलं आहे... त्यामुळे पौगंडावस्थेत पदार्पण करणाऱ्या प्रत्येकाच्या संग्रही हे पुस्तक असायलाच हवे.




# सेंड देम टू हेल

बँकॉकच्या तुरुंगात काहीही गुन्हा नसताना काढलेली सतरा वर्षे




लेखक : सेबॅस्टियन विल्यम्स

अनुवाद : अभिजीत पेंढारकर

पृष्ठे २७२ । किंमत ₹ ३०० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

# कारावासातले अमानुष जीवन
## लेखकाची भूमिका

या पुस्तकाच्या कहाणीतील मुख्य व्यक्तिरेखेला मी 'स्लाय' असे नाव दिले आहे. तो आणि त्याचा मित्र 'ब्रेन्ट' (बदललेले नाव) याच्याशी 'विली' (पुन्हा बदललेले नाव) या सामाईक मित्राच्या माध्यमातून माझी ओळख झाली. तेव्हापासूनच स्लायच्या कहाणीविषयी मला प्रचंड उत्सुकता वाटली.

स्लाय हा एक ब्रिटिश नागरिक. थायलंडमधील वेगवेगळ्या कुप्रसिद्ध तुरुंगांत त्याने आयुष्याची १७ वर्षे काढली आणि ती कहाणी सांगण्यासाठी जिवंत राहिला. थाई अधिकाऱ्यांच्या दाव्यानुसार, त्याने सहा किलो हेरॉइन जवळ बाळगले आणि ते विकण्याचाही प्रयत्न केला. त्याच्या मते मात्र तो निरपराध होता आणि खंडणीखोर पोलीस अधिकारी व त्यांच्या साथीदारांनी त्याला बळीचा बकरा बनविले होते. थायलंडसारख्या देशात ही गोष्ट अजिबात अविश्वासार्ह नव्हती. त्याच्या सुटकेसाठी या लबाड अधिकाऱ्यांना त्याच्या कष्टाच्या कमाईतील मोठा वाटा हवा होता. त्यांची मागणी त्याने धुडकावल्याने त्याच्या या अवज्ञेचे गंभीर परिणाम त्याला भोगावे लागतील, अशी व्यवस्था त्यांनी केली.

स्लायने त्याचे तपशीलवार म्हणणे अटकेनंतर पहिल्या वर्षभरात तयार करून वकिलामार्फत न्यायालयात सादर केले होते. त्याच्यावर नजर टाकल्यानंतर मी त्यात गुंतलो, कारण प्रथमदर्शनी स्लायला खूप अन्याय्य वागणूक मिळाल्याचे त्यातून दिसत होते. पुढील सुमारे दीड दशक या प्रकरणात मी स्वत:ला गुंतवून घेतले. त्यातून अतिशय अस्वस्थ करणारा आणि धक्कादायक अनुभव मिळाला. थायलंडच्या व्यवस्थेत खोलवर मुरलेला भ्रष्टाचार आणि दुष्कृत्ये मला कळलीच, शिवाय तेथील न्यायव्यवस्था, कायदा आणि राजकीय जगतामध्ये या गोष्टी किती सहज शक्य आहेत, याचीही कल्पना आली. या मधल्या काळात माहितीचा खजिनाच माझ्या हातात आला, त्यातील बहुतांश माहिती माझा विश्वास वाढविणारी होती. त्यातील शक्य तेवढी माहिती वापरण्याचा मी निश्चय केला, जेणेकरून ती जाहीर करण्यातून काहीतरी चांगले घडावे.

स्लाय आधीही अनेक प्रकारच्या गुन्ह्यांसाठी तुरुंगात गेला असल्याचे तुरुंगातून त्याची सुटका होईपर्यंत मला माहीत नव्हते. सुमारे दोन दशकभर

तो वेगवेगळ्या किरकोळ गुन्ह्यांसाठी न्यायालयाच्या आणि तुरुंगांच्या वाऱ्या करून आला होता. तरीही, थायलंडमध्ये ज्यासाठी त्याला एवढी वर्षे तुरुंगात डांबण्यात आले, तो अमली पदार्थ बाळगण्याचा गुन्हा त्याने केला नसल्याचे त्याने ठामपणे सांगितले होते. थायलंडमधील तीन न्यायालयांत चाललेला त्याचा खटला ही क्रूर थट्टा होती, यात वादच नाही.

थायलंडमधील हे गैरप्रकार स्लायने स्वत: भोगले होते. मी जेवढी वर्षे या प्रकारांची माहिती घेतली, त्यापेक्षा जास्त काळ त्याने त्यांचा अनुभव घेतला होता. हा सर्व छळ सहन करून तो त्याची कहाणी सांगण्यासाठी जिवंत राहिला होता. त्यामुळे ही कहाणी त्याच्या नजरेतून पाहिल्याप्रमाणे आणि त्याच्या शब्दांतून व्यक्त केल्याप्रमाणे प्रथमपुरुषी एकवचनात सांगावी, असे मी ठरवले.

'सेंड देम टू हेल'मधून मी हाच प्रयत्न केला आहे. स्लायच्या अटकेच्या सुमारे वर्षभर आधीपासून ती सुरू होते आणि १७ वर्षांनंतर झालेल्या त्याच्या सुटकेनंतर तिचा समारोप होतो. तुम्हाला ती वाचायला नक्कीच आवडेल. पण एक धोक्याची सूचना: काही ठिकाणी ती खूप अस्वस्थ करणारी आहे, हे लक्षात ठेवा.

**– सेबॅस्टियन विल्यम्स**

# बॉम्बॅट कारागृहाची एक झलक
# उघडले नरकाचे दार

अटकेनंतर आठवडाभराने आम्हाला दुसऱ्या एका बंदिस्त वाहनात कोंबण्यात आले. त्यात फक्त एक छोटी खिडकी होती आणि मागच्या बाजूला असलेल्या दारांच्या वरच्या टोकाला एक छोटी पोकळी होती, त्यावर पोलादी जाळी बसविण्यात आली होती. दोन्ही बाजूच्या चाकांवरच बसण्याची बाकडी होती आणि गाडीतील लोखंडी बारला आम्हाला बेड्यांनी अडकवून टाकण्यात आले होते. मी आणि फ्रेड एका बाजूला आणि हॅन्सेल दुसऱ्या बाजूला. वीस मिनिटांच्या त्या प्रवासात फारसे बोलणे झाले नाही. त्या व्हॅनच्या मागून निघणाऱ्या धुरामुळे आमची अवस्था गुदमरल्यासारखी झाली होती.

सकाळी नऊच्या सुमारास न्यायालयातून आमच्या विभागांच्या बदलीची प्रक्रिया पूर्ण झाली आणि आम्हाला शिक्षा विभागाच्या (करेक्शन) ताब्यात देण्यात आले. आमच्या बेड्या काढून आम्हाला एका मोठ्या कोठडीत पाठविण्यात आले. तेथे साध्या कपड्यांतील अनेक आशियाई कैदी त्या घाणेरड्या जमिनीवर निमूट बसले होते. आमच्याप्रमाणेच त्यांनाही पहिल्यांदा न्यायाधीशांसमोर हजर केले जाणार होते.

पाच एकसारख्याच कोठड्या तेथे होत्या. त्यांच्यामध्ये फक्त लोखंडी गज होते. या प्रत्येक कोठडीशी जवळचा संबंध माझ्या नशिबात लिहून ठेवला होता. इतर कोठड्यांमध्ये कैदी भरभरून कोंबण्यात आले होते. प्रत्येकाच्या अंगावर तपकिरी चड्डी आणि शर्ट होता आणि त्यांच्या ढोपरांमध्ये भरभक्कम साखळ्या होत्या.

''आपण इथून कसे बाहेर पडणार आहोत, कुणास ठाऊक!'' फ्रेडचे स्वगत जरा मोठ्या आवाजात झाले. गजांना पाठ टेकून आम्ही बसलो.

पलीकडच्या कोठडीत बसलेल्या एका विदेशी कैद्याने स्वत:हून त्यावर प्रतिक्रिया दिली.

''तुम्हाला इथे कोणत्या गुन्ह्याबद्दल आणले आहे?''

तो उत्तर युरोपातील नागरिक असावा. बहुधा स्वीडन किंवा फिनलंडचा. तो उंच होता, डोळे निळे होते आणि केस पिवळसर लाल होते. तो आणि त्याचे दोन सहकारी यांनी इतर कैद्यांप्रमाणेच कपडे घातले होते. ते दोघेदेखील त्याच्याच देशाचे वाटत होते.

''हेरॉइन जवळ बाळगल्याबद्दल. तेही एक बॅगभर!'' फ्रेड उत्तरला. आपल्याला यात गुंतवायचे काहीच कारण नाही, असा त्याचा आविर्भाव होता.

''हं... मग बहुधा तुम्हाला बॉम्बॅट तुरुंगात पाठविले जाईल. अजिबात चांगली जागा नाहीये ती. मी तिथे सहा महिने राहिलो आहे. त्यानंतर माझी रवानगी क्लोंग प्रेम तुरुंगात झाली. तुम्हाला तिथे हुशारीने राहावे लागेल. तेथे मोठा धोका असू शकतो. तिथल्या कैद्यांपासून नव्हे, तर ज्या हीन प्रकारे तिथली व्यवस्था चालविली जाते, त्यापासून आणि तिथल्या 'विश्वस्तां'पासून.''

''विश्वस्त? कोण विश्वस्त?'' फ्रेडने चौकशी केली.

“विश्वस्त म्हणजे शिक्षा झालेले गुन्हेगारच, पण काही प्रमाणात संरक्षण आणि अधिकार मिळालेले. त्याशिवाय त्यांना काही विशेष अधिकारही असतात, जे इतर कैद्यांना नाहीत. ते वॉर्डच्या प्रमुखांचे हस्तक म्हणून काम करतात. कोणत्याही थराची चाटूगिरी करण्यास ते सदैव तत्पर असतात. आपल्या पाठीवर शाबासकी मिळावी किंवा काही सवलती पदरात पाडून घेता याव्यात, यासाठी ते कैद्यांना कोणत्याही प्रकारची वागणूक देण्यास मागेपुढे पाहत नाहीत.”

पुढचा जवळपास दीड तास ते तिघे त्या तुरुंगातल्या व्यवस्थेविषयी माहिती देत होते आणि मी व फ्रेड थिजून गेल्याप्रमाणे एका जागी स्तब्ध होऊन ती ऐकत होतो. त्यांच्या बोलण्यावरून एक गोष्ट नक्की स्पष्ट होत होती – पहिल्या न्यायालयाने आमचा खटला पूर्ण करून निकाल देईपर्यंत आमची इथून सुटका होणे शक्य नव्हते. आणि या प्रक्रियेला काही महिने लागणार होते... कदाचित काही वर्षे!

अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांतील संशयित आरोपींना, विशेषत: परदेशी व्यक्तींना सहसा जामीन मंजूर केला जात नसे. त्यामुळे सुनावणी सुरू होण्याआधी त्यातून सुटण्यासाठी दोनच मार्ग होते. एक म्हणजे पोलिसांनी आमच्याविरुद्धचा गुन्हा खटल्याच्या वेळी कायम न ठेवणे किंवा आमच्याविरुद्ध खटला भरण्यासाठी पुरेसे पुरावे नसल्याची वकिलांची खातरी होणे. अर्थात आम्ही सोन्याच्या राशी ओतल्याशिवाय या दोन्हींपैकी कोणतीही शक्यता प्रत्यक्षात येणे अवघड होते. या वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्याची संधी कोणीच सोडणार नसल्यामुळे, आम्ही द्यावयाच्या थैल्यांची संख्या वाढणार होती, हे निश्चित. अशा स्थितीत सबळ पुरावे सादर न करण्यासाठी पोलिसांची, आरोपी अडकणार नाहीत, असे प्रश्न न विचारण्यासाठी वकिलांची आणि काही मुद्द्यांकडे डोळेझाक करण्यासाठी न्यायाधीशांची काहीतरी मिळण्याची अपेक्षा होती, असे या परदेशी कैद्यांनी आम्हाला सांगितले.

त्यांच्यापैकी एकाला १५ महिने कोठडीत ठेवण्यात आले होते, तरी फौजदारी न्यायालयात त्याची सुनावणी पूर्ण झाली नव्हती, हे समजल्यावर आम्हाला आणखी खचल्यासारखे झाले. सुनावणीच्या दरम्यान अनेक प्रकारे त्याला असे सुचविण्यात येत होते की, खटल्याशी संबंधित सगळ्यांचे हात ओले केले, तर त्याची सुटका होऊ शकेल. तो त्या दृष्टीने खटपटही करत

होता, पण त्याला अद्याप काही व्यवस्था करता आली नव्हती. त्याच्या सांगण्यानुसार, त्याच्या मायदेशापेक्षा बँकॉकमध्ये हेरॉइन स्वस्त असल्याने तेथे स्वत:साठी ते विकत घेण्यासाठी तो आला होता. परतीच्या प्रवासात डॉन मुआंग येथील तपासणी नाक्यावर त्याला पकडण्यात आले. ज्या थाई व्यक्तीकडून त्याने हेरॉइन खरेदी केले, तो पोलिसांचा खबऱ्या होता. शिवाय सुखमवित रस्त्यावरील नाना प्लाझामध्ये त्याला भेटलेल्या ज्या इंग्रज व्यक्तीने त्याची त्या विक्रेत्याशी गाठ घालून दिली, तो देखील पोलिसांचा हस्तक होता, असेही त्याला नंतर समजले. वकिलाच्या सांगण्यानुसार आधी त्याने आपण निरपराध असल्याचा दावा न्यायालयात केला होता. त्यामुळे पैशांची व्यवस्था करण्यास हाताशी वेळ मिळेल, असा हिशेब त्यामागे होता. परंतु पैशांची व्यवस्था त्याला करता न आल्यामुळे आता तो गुन्हा कबूल करून टाकणार होता. जेणेकरून त्याचा खटला त्याच दिवशी मिटणार होता आणि दर महिन्याला न्यायालयाच्या वाऱ्या टळणार होत्या. चार वर्षे शिक्षा भोगल्यानंतर मायदेशातील तुरुंगात पाठविण्याची विनंती त्याला करता येईल आणि नंतर जास्तीत जास्त एक किंवा दोन वर्षांत त्याला घरी पाठविले जाईल, असे त्याच्या दूतावासातील अधिकाऱ्यांनी त्याला सांगितले होते.

त्यानंतर बऱ्याच काळानंतर, अनेकांच्या कहाण्या ऐकल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, तो ज्या प्रकारे लगेचच पकडला गेला, त्यावरून अमली पदार्थांचे व्यापारी आणि पोलीस यांचे साटेलोटे असावे, हे निश्चित. **माझ्या तर्कानुसार तरी ते असं होते — पोलीस त्यांनी जमविलेल्या अमली पदार्थांच्या बेकायदा साठ्यातील काही पदार्थ विक्रेत्याच्या ताब्यात देत. तो ब्रिटिश माणूस परदेशी नागरिकांना विश्वासात घेऊन त्या विक्रेत्यापर्यंत घेऊन जाई. मग पदार्थ खरेदी केल्यानंतर तो विक्रेता पोलिसांना खबर देई आणि ते या नागरिकांना अमली पदार्थांसह पकडत. बहुतांश वेळा हे नागरिक त्यांच्या परतीच्या मार्गावर असताना ही कारवाई केली जात असे. ग्राहकाने अमली पदार्थांच्या खरेदीसाठी मोजलेल्या पैशांतील वाटा तो ब्रिटिश आणि विक्रेता असे दोघे वाटून घेत. ही रक्कम किलोमागे आठ हजार ते बारा हजार डॉलर्सपर्यंत असे.** एकदा खटल्याचा निकाल लागला आणि ग्राहकाला शिक्षा झाली की, 'डीईए' आणि 'एनएसडी'कडून मिळणाऱ्या बक्षिसातील वाटाही त्या ब्रिटिशाला मिळत असे. काही वेळा आरोपीने भरपूर लाच देऊन प्रकरण मिटवण्याचा

प्रयत्न केला, तर त्यातील वाटा तो ब्रिटिश आणि विक्रेता या दोघांना बक्षिसाच्या ऐवजी मिळत असे. पोलिसांनी त्यांचे अमली पदार्थ परत मिळत असत, शिवाय त्यातील नफा आणि बक्षिसातील मोठा वाटा मिळत असे. प्रकरण दाबण्यासाठी पैशांचा व्यवहार झाला, तर पोलिसांना खरेदीची रक्कम आणि लाच, असा दुहेरी फायदा होतो. त्याशिवाय ते अमली पदार्थ दुसऱ्या प्रकरणासाठी वापरता येतता, ते वेगळेच. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर ते तुपाशी खात होते. शिवाय ड्युटी करण्याचा सरकारी पगार मिळत होता, तो वेगळाच. उत्तम कामगिरी केल्याबद्दल त्या पोलिसांना शाबासकीही मिळत होती. शिवाय 'एनएसडी'ला तथाकथित अमली पदार्थविरोधी मोहीम राबविल्याबद्दल अमेरिका आणि इतर देशांकडून अतिरिक्त सवलती आणि आर्थिक मदतही मिळत होती. हं! अमली पदार्थ-विरोधी मोहीम म्हणे! कदाचित, असे घडत नसेलही, पण मी माझ्यासमोर तुकड्या-तुकड्यांत आलेल्या गोष्टींचा अर्थ लावला तो असा. सारासार विचार करता त्यात तथ्यही वाटत होते.

हे माहीतगार बॉम्बॅट तुरुंगात अनुभवायला येणाऱ्या कष्टप्रद दिनक्रमाविषयी आम्हाला सांगत असताना एका गणवेशधारी अधिकाऱ्याने त्यांना दरवाजापाशी बोलावले. त्यांच्या हातात बेड्या अडकवून तो त्यांना लांब घेऊन गेला. त्यानंतर काही क्षणांतच आम्हा तिघांनाही दुसऱ्या मजल्यावरील न्यायालयाच्या कक्षात नेण्यात आले.

न्यायाधीशांसमोर आम्ही अगदी थोडा वेळ होतो. न्यायाधीशांच्या आसनाकडे तोंड करून एकमेकांशेजारी उभे राहण्यास आम्हाला सांगण्यात आले. आम्हाला घेऊन आलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याने न्यायाधीशांसमोर निवेदन केले. आमच्यापैकी फक्त हॅन्सेलला त्याचे बोलणे कळत होते. त्याने नंतर आम्हाला सांगितले की, अधिक चौकशीसाठी आम्हाला आणखी १२ दिवस कोठडीत ठेवण्याची परवानगी त्याने न्यायाधीशांकडे मागितली. आम्हाला काही बोलण्याची संधी मिळाली नाही. न्यायाधीशांनी पोलिसांची विनंती मान्य केली. आम्हाला नंतर आमच्या आधीच्या कोठडीत परत आणले गेले. आमच्यापैकी प्रत्येक जण आपापल्या विचारात बुडून गेला होता.

''स्लाय, स्लाय! इकडे बघ, इकडे बघ. स्लाय....''

कुणीतरी हाक मारत असल्याचे मला बऱ्याच वेळाने लक्षात आले. जेडोचा आवाज मी ओळखला. एका मोठ्या व्हरांड्याच्या एका बाजूच्या गजांपाशी मी उभा राहिलो. दुसऱ्या बाजूला कैद्यांना भेटायला आलेल्या त्यांच्या स्नेह्यांमधून जेडोला शोधून काढायला मला थोडे कष्ट पडले. ओमदेखील तिच्यासोबत होती. दोघी माझ्याकडे बघून हात हलवत होत्या.

ती भेटून गेल्यानंतर काय-काय घडले, ते मी तिला सांगितले. आमचा आवाज एकमेकांपर्यंत पोहोचविण्यासाठी खूपच जोरात ओरडावे लागत होते आणि आमचा घसा बसण्याची वेळ आली होती. तिथे बरेच लोक एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे आम्हाला तोंडाभोवती हातांची ओंजळ करूनच हाळी द्यावी लागत होती. तरीही, दुपारी आमची रवानगी बॉम्बॅट तुरुंगात होणार असून, तिने आमच्यासाठी खाद्य आणि पेयपदार्थ आणल्यास बरे होईल, असा संदेश त्या गोंधळातही तिच्यापर्यंत पोहोचविण्यात मी यशस्वी झालो. आम्हाला बॉम्बॅट तुरुंगातच पाठविले जाणार असल्याची खातरी तिने करून घेतली आणि दुसऱ्या दिवशी भेटायला येण्याचे आश्वासन दिले.

''स्लाय, तुला आता एखाद्या वकिलाची गरज लागेल, असं वाटतंय...'' ती म्हणाली, ''आता हे प्रकरण हाताबाहेर चाललं आहे. तू एकटा ते पेलवू शकणार नाहीस. मी कुठल्या वकिलाशी बोलू, त्यावर आता विचार करायला सुरुवात कर.''

आपण खचलेलो नाही, हे दाखविण्याचा ती वरवर प्रयत्न करत होती, पण मनातून ती भीती आणि काळजीत बुडून गेल्याचे तिचा चेहरा सांगत होता. या प्रकरणाचा तिच्यावर किती खोल परिणाम होत होता, हे तेव्हा माझ्या लक्षात आले.

ती गेल्यानंतर दहा मिनिटांनी एका अधिकाऱ्याने मला हाक मारून प्लॅस्टिकची एक पिशवी माझ्या हातात दिली. त्यातील काही छोट्या पिशव्यांमध्ये चिकन करी आणि भात होता. इतर पिशव्यांत आइस कॉफी आणि थंड पाणी होते. कायदा मंत्रालयातर्फे न्यायालयाच्या आवारात अन्न दिले जात नव्हते. जेडोने आमच्यासाठी जेवण पाठविले नसते, तर आम्हाला उपाशीच राहावे लागले असते.

दुपारी उशिरा आम्हाला कोठडीतून बाहेर नेण्यात येऊन बेड्या घालून

एका जुनाट, खिळखिळ्या झालेल्या निळ्या रंगाच्या बसमध्ये बसविण्यात आले. तिच्या खिडक्यांवर जाडजूड पोलादी जाळी घालण्यात आली होती. इतर कोठड्यांमधील पन्नासेक कैदीही आमच्याबरोबर त्या गाडीत कोंबण्यात आले. त्यांच्यापैकी बहुतेकांनी हा प्रवास आधी केला असावा. गाडीत चढल्याबरोबर त्यांनी धक्काबुक्की करून केबिनच्या दोन्ही बाजूंना असलेली बाकडी पटकावली. जे अगदीच संथ होते किंवा स्वत:हून उभे राहण्यास इच्छुक होते, ते मधल्या मोकळ्या जागेत छताला टांगलेल्या बारना धरून दाटीवाटीने उभे राहिले. मागच्या बाजूचा सुरक्षा कर्मचाऱ्यांचा कक्ष आणि कैद्यांच्या कक्षामधील दार लावून घेण्यात आले आणि बस आमच्या नव्या मुक्कामाच्या ठिकाणाकडे निघाली.

जवळपास दीड तासांच्या त्या कष्टप्रद प्रवासानंतर आम्ही नव्या तुरुंगात पोहोचलो. गाडीच्या त्या धुराड्यामुळे आमची डोकी सुन्न झाली होती. बँकॉकच्या नव्या व्यवस्थेची ओळख हळूहळू पटू लागली होती आणि पुढे आमच्या ती कायमच राशीला येणार होती.

बस मुख्य रस्त्यावरून अचानक वळली आणि क्लोंग प्रेम तुरुंगाच्या मुख्य दाराजवळून गेली. डावीकडे वळून तुरुंगाच्या भिंतींना समांतर अशा रस्त्यावरून पुढे जाऊ लागली. शेवटी बस उजवीकडे वळली आणि एका छोट्या रस्त्याला लागली. उजव्या हाताला उंच काँक्रीटची भिंत होती. प्रत्येक वीस मीटरवर सुरक्षारक्षकांचे टेहळणीसाठीचे टॉवर होते. काही रक्षक नुसतेच बसले होते, तर काहींच्या हातात रायफली होत्या. काहींकडे रोवून ठेवलेल्या मशीनगन्सदेखील होत्या. दिवसभर एकाच ठिकाणी आणि अवस्थेत काहीच कृती न करता उभे राहून येणारा कंटाळा त्यांच्या चेहऱ्यावर ठायी-ठायी जाणवत होता.

प्रशासकीय व्यवस्थेतील आपण महत्त्वाचे घटक असल्याचे हे सैनिक भासवत असले, तरी प्रत्यक्षात त्यांची अवस्था कैद्यांपेक्षा थोडी बरी होती, असेच मला जाणवले. खरे तर ज्यांचे संरक्षण ते करीत होते, त्यांनाच त्यांच्यापेक्षा जास्त स्वातंत्र्य उपभोगता येत होते. कैद्यांना निदान माणसांचा सहवास होता. ते बोलू शकत होते, हसू शकत होते, खेळ खेळू शकत होते आणि तुरुंगाच्या आवारात पाय मोकळेही करू शकत होते. कैद्यांना रात्री भले बराकींमध्ये दाटीवाटीने कोंबले जात असेल किंवा अन्य त्रासही सहन करावा लागत असेल, पण या सुरक्षारक्षकांना त्यांच्या कामाच्या वेळात पूर्णपणे

त्यांना दिलेल्या टेहळणीच्या जागेवरच कोंडून घ्यावे लागत होते. ते स्वत: कधीच मान्य करणार नाहीत, पण दिवसाचे जवळपास दहा तास ते कैद्यांचेच जिणे जगत होते.

बस पुन्हा उजवीकडे वळली आणि तुरुंगाची भिंत अर्ध्या किलोमीटर-पर्यंत पसरल्याचे लक्षात आले. डाव्या बाजूला एक मोठा कालवा होता. त्याच्या दुसऱ्या बाजूला हिरवळीचा एक छोटासा पट्टा होता. त्याच्या पलीकडे असलेला रस्ता वाहनांनी ओसंडून वाहत होता.

मुख्य दरवाजातून मेढरांप्रमाणे आम्हाला आत ढकलण्यात आल्यानंतर एका मोठ्या दालनात आम्ही पोहोचलो. तेथे आमच्या प्रवेशाची प्रक्रिया पार पडली. आमच्याजवळच्या सर्व साहित्याची तपासणी झाली आणि मौल्यवान वस्तू ताब्यात घेऊन वहीत नोंद करून एका पिशवीत भरण्यात आल्या. प्रत्येकाच्या वस्तूंचा तपशील असलेला आणि त्या त्या कैद्याने सही केलेला कागद त्या पिशवीला जोडण्यात आला. कोणत्याही कैद्याला तुरुंगात स्वत:जवळ पैसे किंवा मौल्यवान वस्तू बाळगण्याची परवानगी नाही. त्यामुळे त्याच्याजवळील पैसे ताब्यात घेऊन ते तुरुंग प्रशासनाकडे जमा केले जातात, जेणेकरून त्याला तुरुंगातील दुकानातून आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी टप्प्याटप्प्याने थोडी रक्कम काढता येईल.

नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आम्हाला शरीरातील छिद्रांच्या तपासणीला सामोरे जावे लागले. ही तपासणी करणारा अधिकारी प्रत्येक कैद्याच्या गुदद्वारात बोट घालून तपासण्याच्या कामाचा आनंद घेत असावा, असे वाटले. त्या गटात आम्ही तिघेच परदेशी नागरिक असल्याने आमची या तपासणीतून सुटका होईल, असे वाटत होते, पण आम्हालाही त्याच्यासमोर पँट काढून वाकून उभे राहावे लागणे धक्कादायक होते. त्याच्या हातात मोजे असले, तरी प्रत्येक वेळेला बोट आत घातल्यानंतर ते धुण्याचे किंवा निर्जंतुक करण्याचे कष्ट तो घेत नव्हता. त्याच्यासमोर ठेवलेल्या पाण्याच्या छोट्या भांड्यात तो बोट बुडवून धुवत होता.

मी आधी तुरुंगात जाऊन आलो असल्याने, प्रत्येक वाईट गोष्टीनंतर चांगले काहीतरी घडते, याची मला खातरी होती. तरीही, त्या ५० कैद्यांपैकी कोणालाही असलेला एखादा भयानक रोग आपल्याला या संसर्गातून होऊ शकेल, अशी भीती मला वाटली. मी या तपासणीला विरोध करून पाहिला,

पण काही रक्षकांनी तातडीने मला धरले आणि तपासणी पूर्ण करण्यास भाग पाडले. नंतर अनेक आठवडे अशा प्रकारे 'एचआयव्ही'चा संसर्ग होतो काय, हीच चिंता मला खात होती. इतर अनेक गुप्तरोग आणि विषाणू किंवा जिवाणूजन्य रोग अशा प्रकारे पसरू शकतात, याविषयी मला खातरी होती. त्या काळात थायलंडमध्ये 'एचआयव्ही'चा उद्रेक झाला असल्यामुळे माझ्या पुढे तपासणीला या ना त्या माध्यमातून त्याचा संसर्ग झाला असावा, अशी मला भीती वाटत होती.

प्रवेशाची ही प्रक्रिया तीन क्रमांकाच्या तुरुंगाच्या समोरच्या भागात सुरू होती. अन्य सर्व विभाग दुपारी तीन वाजता बंद केले जात असत आणि तिकडे जाण्याची परवानगी नसे. त्यामुळे न्यायालयातून परतणाऱ्या कैद्यांना तिसऱ्या क्रमांकाच्या तुरुंगातच दुसऱ्या दिवशीच्या सकाळपर्यंत राहावे लागणार होते. न्यायालयातून बस दुपारच्या आत तुरुंगात आली, तरच कैद्यांना तपासणीनंतर त्यांच्या त्यांच्या तुरुंगात पाठविले जात असे.

बॉम्बॅट तुरुंगातील प्रत्येक बराक आठ ते नऊ मीटर लांब आणि साडेचार मीटर रुंद आहे. मुख्य इमारतीत अशा दहा बराकी आहेत. प्रत्येक बराकीत जास्तीत जास्त १५ कैदी असतील आणि ते व्यवस्थित राहू शकतील, अशा रीतीने त्यांची रचना होती. त्यानुसार, प्रत्येक कैद्याला पाय पसरून झोपण्यासाठी आणि इकडेतिकडे फिरकण्यासाठी, तसेच स्वच्छतागृहात जाण्यासाठी दुसऱ्याला त्रास देण्याची गरज नव्हती. प्रत्यक्षात माझ्या तुरुंगवासाच्या काळात किंवा अनेक वर्षे इथे राहिलेल्या अन्य कैद्यांच्या म्हणण्यानुसार, तेथे तीसपेक्षा कमी कैदी कधीच नसायचे. न्यायालयातून बस उशिरा परत आली की, विभाग क्र. ३मधील अनेक बराकींमध्ये ५०हून अधिक कैदी कोंबले जात असत. त्यातील अनेकांच्या पायात जाडजूड साखळ्या असत. एवढ्या गर्दीमुळे त्यांना फक्त ढोपरे वर करून त्यात हनुवटी खुपसून बसावे लागे. किंवा झोपताना गर्भात असलेल्या मुलाप्रमाणे पाय पोटाशी मुडपून घ्यावे लागत. कैद्यांना या परिस्थितीची कल्पना असल्याने प्रत्येक जण पाय मुडपून पोटाशी घेऊन, एकमेकांकडे पाठ करून झोपत असे.

एवढ्या प्रमाणात भरलेल्या अशा बराकीत स्वच्छतागृहात जाणे म्हणजे समरप्रसंग असे. जागोजागी कैदीच कैदी असल्याने कुठे पाय ठेवायलाही जागा नसे. प्रत्येकाच्या पायात पंधरा किलोपर्यंतच्या वजनाच्या साखळ्या

असल्याने, बराकीच्या चुकीच्या बाजूला आपण असलो, तर लोकांना तुडवून जाणेही महासंकट असे.

या छळाचा कहर म्हणजे प्रत्येक तासानंतर सुरक्षारक्षक तेथून गस्त घालत असे आणि दरवेळी गजांवर त्याच्या हातातील दंडुक्याने ठोठावत असे. कोणत्याही एका कैद्याला उठून मग सर्व कैदी व्यवस्थित असल्याचे त्याला सांगावे लागे. ही अतिशय गैरलागू, न तपासलेली आणि नोंद न होणारी माहिती देण्याची जबाबदारी या बराकीत बराच काळ मुक्कामाला असलेल्या कैद्यांनी एकमेकांत वाटून घेतली होती. त्यामुळे त्यांच्यापैकी एकाला महिन्यातून एके रात्री कायम जागे राहण्याची तयारी ठेवावी लागे.

फ्रेड, हॅन्सेल आणि माझ्यासह अन्य वीस जणांना दुसऱ्या स्तरावरील एका बराकीत नेण्यात आले. फक्त आम्ही तिघेच तात्पुरते कैदी होतो आणि आमच्या पायांत जाडजूड साखळ्या नव्हत्या. आम्ही रांगेत शेवटी असल्याने, बराकीत प्रवेश केल्यावर मी सभोवती पाहिले आणि खचूनच गेलो. तेथे कैदीच कैदी होते आणि माझी बॅग ठेवू शकेन, एवढीही जागा दिसत नव्हती. माझ्यासोबत आलेल्या कैद्यांनी चपळाई करून त्या गर्दीतही कुठेकुठे जागा पटकावल्या.

दरवाज्यांच्या दोन्ही बाजूंना लाकडी फळ्यांपासून जमिनीपासून नऊ इंच उंचीचा एक भाग तयार करण्यात आला होता. मागच्या भिंतीच्या बाजूलाही अशाच प्रकारचा एक भाग होता. त्यांच्या मधल्या भागात काँक्रीटचा थर होता. या भागात पायात जाडजूड साखळ्या असलेले कैदी कोंबून-कोंबून भरले होते. त्यातील काही उभे होते, काही बसले होते, तर काही उकिडवे होते. त्यांच्या चेहऱ्यावर नैराश्याची आणि भकासपणाची छाया होती. मागच्या भिंतीला चार छोटे झरोके होते आणि त्यांवर उभे लोखंडी गज बसविण्यात आले होते. दोन ओंगळ सीलिंग फॅन अगदी बाबा आदमच्या जमान्यात बसविण्यात आलेले वाटत होते. ते कुरकुरत फिरत होते आणि आतली कोंदट, कुबट हवा सर्वत्र पसरवत होते. बराकीचे मुख्य दार आणि मागच्या बाजूला असलेली दोन छोटी दारे, एवढीच काय ती हवा खेळती राहण्यासाठीची सोय होती.

कधीतरी एकदा पांढरा रंग दिल्याचा आभास देणाऱ्या बराकीच्या भिंती आता वर्षानुवर्षांचे सिगारेटचे धूर आणि प्रदूषणामुळे काळ्या पडल्या होत्या.

दोन्ही बाजूंच्या उंचवट्यांवर असलेल्या फळ्यांचे रंग उडाले होते आणि त्या खिळखिळ्या झाल्या होत्या. आतापर्यंत कितीतरी कैद्यांची पाठ त्या फळ्यांवर टेकलेली होती. पूर्वी त्या एकत्रित घट्ट बांधलेल्या असाव्यात, पण आता त्यांच्यात मोठमोठ्या फटी पडल्या होत्या आणि त्यांच्याखाली अनेक प्रकारच्या कीटकांना अभयारण्यच मिळाले होते. अनेक कैद्यांचा घाम प्याल्याने बुरशी आलेल्या त्या फळ्यांच्या खाली असलेल्या कचऱ्यात मोठमोठी झुरळे, कोळी, माश्या, ढेकूण आणि इतर अनेक रक्तपिपासू कीटक तिथे सुखाने नांदत होते.

दाराच्या मागच्या बाजूच्या भिंतीवर साधारणपणे डोक्याच्या उंचीला बौद्ध धर्माच्या प्रथेप्रमाणे वस्तू अर्पण करण्यासाठी एक जागा तयार केली होती. तिथे तीन मातीची भांडी होती. उदबत्तीचा एक स्टँडही होता आणि इतर धार्मिक पूजेचे साहित्य होते. थायलंडमध्ये बौद्ध धर्माचा मोठा प्रभाव असून, प्रथेप्रमाणे गुन्हेगारी जगतातील अनेक लोकही रोज बुद्धाची पूजा करतात. बॉम्बॅट तुरुंगात तर गुन्हेगार बुद्धाला साकडे घालून आपल्याला तुरुंगातून लवकर सोडविण्याची प्रार्थना करतात. त्या छोट्या भांड्यांमध्ये फळांचे तुकडे, बिस्किटे, लाल तांदूळ, ग्रीन टी, सिगारेट आणि अर्थातच सिगारेट लायटर असे अनेक प्रकार होते. उदबत्तीच्या घरात सुमारे वीस ते तीस अर्धवट जळालेल्या उदबत्त्यांचे तुकडे होते. ज्या वीस ते तीस कैद्यांना तुरुंगातून सुटून जाण्याचे भाग्य पाहता आले, त्यांच्या त्या उदबत्त्या असाव्यात. खाली पडलेली ढीगभर राख ही इथेच संपून गेलेल्या कित्येक कैद्यांचे प्रतीक असावी.

एवढ्या कळकट स्वरूपातील नैवेद्य भगवान बुद्धालाही रुचणारा नसेल, याची दखल मात्र कुणीच घेत नव्हते. तसेच डोक्यावरच्या पंख्यामुळे उदबत्त्यांची राख उडून खोलीभर पसरत होती आणि श्वास घेण्यालाही त्रास होत होता, हेही कुणाच्या गावी नव्हते.

**बराकीच्या एका कोपऱ्यात एक आकर्षक स्त्री होती. तिची उत्तान वक्षस्थळे तिने इतरांना पाहण्यासाठी बरीचशी उघडी ठेवली होती. मूळचा चिनी वाटणारा एक थाई कैदी त्यांच्याशी चाळे करत होता. ही बाई म्हणजे कृत्रिम शस्त्रक्रिया करून घेतलेला पुरुष असावा, हे लक्षात यायला मला वेळ लागला नाही. थायलंडमध्ये अशा पुरुषांना 'लेडी-**

**बॉय' म्हणतात. तीदेखील कोणालाही अंगचटीला येऊ देत असल्याचे दिसत होते.**

तुरुंगात आणखी एक असाच लेडी-बॉय होता. त्याचे उभारही आकर्षक असले, तरी एकूण चेहरेपट्टीने तो ओंगळ आणि अनाकर्षक होता. दुसऱ्या दिवशी सकाळीच तो माझ्यापाशी आला. नव्या वातावरणात ॲडजस्ट करण्यासाठी काही मदत हवेय का, असे त्याने मला विचारले. तो बऱ्यापैकी इंग्रजी बोलत होता. दिसतं तसं नसतं, हे खरंच!

बराकीत प्रवेश करताना आम्ही सगळ्यात मागे होतो हे बरेच झाले, असे मला नंतर जाणवले. आमच्या मागे तो भरभक्कम लोखंडी दरवाजा लावला गेला आणि आम्ही त्या खडतर परिस्थितीचा सामना करण्याची तयारी करू लागलो, तेव्हा व्हरांड्याच्या दुसऱ्या बाजूने मला हाक आली. उदबत्तीच्या उडणाऱ्या राखेने माझे डोळे चुरचुरत होते, तरी मी वळून पाहिले, तर पलीकडच्या बराकीत दोन कॉकेशियन कैदी मला हाक मारत होते.

''हाय गाइज! मजा येतेय ना? तुम्ही सिगारेट ओढता का?''...विचारणारा नक्की अमेरिकन होता.

''हं... पहिल्या प्रश्नाचं उत्तर आहे – 'नाऽऽऽही आणि दुसऱ्याचं उत्तर आहे – 'हो!' आम्ही दोघेही ओढतो, पण आमच्या तपासणीच्या वेळी त्या हरामखोरांनी सगळ्या सिगारेटी बळकावल्या आणि आता आम्हाला परत देणारही नाहीत!''

''हं... मला माहितेय. ते आहेतच तेवढे हरामखोर... नाही का?'' असे म्हणून त्याने माझ्या दिशेने सिगारेटची दोन पाकिटे टाकली. मी हात लांब करून ती ताब्यात घेतली. आम्ही एकमेकांची ओळख करून घेतली आणि काही वेळ गप्पा मारल्या. आम्हाला बहुधा विभाग क्र. ४मध्ये उद्या पाठवले जाईल आणि निदान ताजी हवा मिळण्यासाठी गजांच्या जवळच राहणे सोयीचे आहे, असे त्याने मला सांगितले. मी आणि फ्रेड उभे असलेल्या ठिकाणीच बसून घेतले. हॅन्सेल सरकत-सरकत आणखी पुढे गेला आणि मध्यभागी त्याने एक जागा पटकावली.

या बराकीच्या मधील वाटेच्या अगदी शेवटी एक छोटासा संडास होता. दोन फूट उंचीची भिंत घातलेला एक अगदी छोटासा उंचवटा. तिथे पडदा वगैरे काही नव्हते. संडासची व्यवस्था आणि एक टमरेल, एवढेच काय ते

होते. स्वच्छतागृहात तरी ‘प्रायव्हसी’ मिळण्याची आशा शून्य होती.

सतत उडणाऱ्या उदबत्त्यांच्या राखेमुळे सुकलेल्या नाकपुड्या, चुरचुरणारे डोळे, साठ कैद्यांची दाटीवाटी आणि दर तासाने सुरक्षारक्षकाच्या तुरुंगाच्या गजांवर आपटणाऱ्या काठ्या, यामुळे मी आणि फ्रेड त्या रात्री झोपूच शकलो नाही. एकमेकांकडे तोंड करून आम्ही गजांना टेकून बसलो आणि बराच वेळ गप्पा मारत राहिलो. अखेर दिवसभराच्या थकव्यामुळे कधीतरी उशिरा थोडीशी झोप लागली.

आदल्या रात्री आम्हाला मदत करणाऱ्या त्या अमेरिकन कैद्याला आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी भेटलो. इतरही अनेक परदेशी कैदी भेटले. दुसरा एक जण ऑस्ट्रेलियन होता. त्याला आपण जॉन मॅकफर्सन म्हणू. त्याने आमची खाण्याची सोय केली आणि आम्हाला हातपाय धुऊन फ्रेश होता येईल, अशी जागाही सांगितली. विभाग क्र. ४च्या तुरुंगात आमच्या वाट्याला काय-काय येणार आहे, याचीही त्याने थोडीशी कल्पना दिली आणि लेक पठाण नावाच्या एका माणसापासून आम्हाला सावध केले.

साधारण दहा वाजण्याच्या सुमारास आम्हाला त्या तुरुंगाच्या एका विभागात नेऊन बेड्या आणि साखळ्या ठोकण्यात आल्या. एक मोठा लांबलचक ओंडका जमिनीवर पडलेला होता. बहुधा, रेल्वेचा काढून टाकलेला ‘स्लीपर’ असावा. आमच्या पायात घोट्याच्या थोडेसे वर सुमारे पोलादाच्या गंजलेल्या, ओंगळ बेड्या बसविण्यात आल्या. त्यांच्या मधली लोखंडी साखळी सुमारे दहा किलो वजनाची होती. नंतर एकेक पाय त्या लाकडी ओंडक्यावर ठेवून बेड्या एकत्रितपणे ठोकून घट्ट करण्यात येत होत्या. एक जण मोठ्या हातोड्याने बेड्यांवर घाव घालत होता.

मी अजिबात हालचाल न करता बसून राहिलो. श्वासही घेण्याचे धाडस केले नाही. माझ्या किंचित हालचालीमुळेही त्या हातोड्याचा घाव माझ्या पायाच्या नडगीवर बसण्याची शक्यता होती. नंतर अशी अनेक उदाहरणे मला पाहायला मिळाली. अनेकदा मुद्दामहून त्या कैद्याच्या पायावर हातोड्याचा घाव घातला जात असे आणि त्यातून त्याची वेदना पाहवत नसे. जखमेमुळे होणारा त्रास पुढे अनेक दिवस, आठवडे आणि महिनेही भोगावा लागत असे.

सुमारे ११ वाजता आम्हाला विभाग क्र. ४मध्ये आमच्या बराकीत

पाठविण्यात आले. ही खोली आकाराने आणि रचनेने कालच्यासारखीच होती, पण त्यात फक्त ३८ कैदी होते, हे बघून जरा हायसे वाटले. वाईट गोष्ट अशी होती की, आम्ही ज्याच्याविषयी ऐकले होते, तो 'लेक पठाण' म्हणजे या खोलीचा कॅप्टन होता. पुढच्या चार महिन्यांत तो किती उलटच्या काळजाचा आहे, याचा प्रत्यय आम्हाला आला.

आतापर्यंत आम्हाला आलेले भयानक आणि विदारक अनुभव म्हणजे एका दु:स्वप्नाची केवळ सुरुवात आहे, हे फ्रेड आणि माझ्या हळूहळू लक्षात आले होते...

## सरकारी गणवेशातील सैतान

''आयचा घो! स्लाय, तिकडे भिंतीकडे बघ! त्या गरीब बिचाऱ्या माणसाला काय करतायंत ते?''

फ्रेडच्या डोळ्यांत भीतीची छाया होती. मी त्या दिशेने पाहिले आणि तेव्हाच मला धपाक-धपाक असा आवाज जाणवला. आम्ही तुरुंगात आलो, तेव्हाच हा आवाज ऐकला होता. एका कैद्याला सुरक्षारक्षक बेफाम मारहाण करीत होता, त्याचा हा आवाज होता.

एक ठेंगणासा, हडकुळा आशियाई कैदी होता तो. त्याच्या पाठीवर एखादे बौद्ध चिन्ह असल्यासारखा एक निळा टॅटू होता. त्याला एका झाडाला घट्ट बांधून त्याचे हात डोक्याच्या मागे झाडाच्या खोडाला करकचून बांधण्यात आले होते. एक गणवेशधारी सुरक्षारक्षक अंगात सैतान शिरल्या-सारखा त्याला हातातील काठीने बेफाम मारहाण करीत होता. तो कैदी गलितगात्र होऊन निश्चल झाला होता. त्याच्या शरीरातून आता कोणतीही प्रतिक्रियाही उमटत नव्हती, तरी या सुरक्षारक्षकाला त्याची पर्वा नव्हती. त्याला स्वत:लाच दम लागल्यावर तो मारायचा थांबला. बेसबॉलच्या बॅटपेक्षा थोडी कमी जाड, पण तेवढ्याच लांबीची त्याच्या हातातील रक्ताळलेली काठी त्याने एका ट्रस्टीच्या हातात दिली आणि ती स्वच्छ करण्याची सूचना केली.

या रानटीपणाची शिकार झालेल्या त्या कैद्याला तसेच झाडाला लटकत ठेवण्यात आले होते. त्याच्या दोन्ही हातांमधून अखंड रक्तस्राव होत होता. एका कोपराचा चक्काचूर झाला होता. त्याची पाठही सोलवटून निघाली होती. डोळे थिजून गेल्याप्रमाणे आम्ही आणि तुरुंगातले अन्य कैदीही त्या दृश्याकडे

पाहत राहिलो. त्या सुरक्षारक्षकाने मग एका ट्रस्टीला त्याच्यासाठी पाणी आणण्यास फर्मावले. जोरजोरात श्वास सुरू असतानाच तो ग्लास त्याने तोंडाला लावला आणि त्या कैद्याच्या रक्त ओघळणाऱ्या शरीराकडे पाहत राहिला. त्याच्या हातांवरून आणि पाठीवरून वाहणारे रक्ताचे पाट त्याच्या पँटच्या कंबरपट्ट्यात जमा होत होते. हे पाट खाली जमिनीवर सांडू लागल्यानंतर रक्षकाने त्या कैद्याला सोडून पेटीत भरण्याचा आदेश दिला. दोन ट्रस्टी झाडाजवळ गेले आणि त्याच्या हाताच्या दोऱ्या सोडवून त्यांनी त्याला खांद्यात धरले. मग विभाग क्र. ४च्या बंदिगृहाच्या दिशेने त्याला ते घेऊन गेले. त्याच्या शरीरात प्राण शिल्लक होता की नाही, कुणास ठाऊक!

फ्रेडच्या आणि माझ्या तोंडचे पाणीच पळाले होते. ते दृश्य पाहताना आमचे डोळे विस्फारले गेले आणि तोंडही उघडेच राहिले होते. तो सुरक्षारक्षक तेथून जाईपर्यंत आणि कैद्यालाही हलविले जाईपर्यंत आम्ही श्वास घेण्याचेही धाडस केले नव्हते. त्याच्या नेण्याच्या वाटेवर रक्ताचा सडा पडला होता. आमच्या आयुष्यात आम्ही एवढा संताप आणि घटनेचे दृश्य पाहिले नव्हते. एवढ्या प्रमाणातील क्रौर्य तुरुंगात घडत असेल, याची आम्हाला पुसटशी कल्पनाही नव्हती आणि आज आम्ही अशाच एका क्रौर्याचे प्रत्यक्ष साक्षीदार झालो होतो! कदाचित असाच एकादा प्रसंग भविष्यात आमच्याही वाट्याला येऊ शकेल, ही भीती आणखी थरकाप उडविणारी होती.

''काय झालंय काय? एवढं झालंय तरी काय?'' फ्रेड अस्वस्थ होऊन म्हणाला. त्या धक्क्यातून आम्ही थोडेसे वर आल्यानंतर एका परदेशी कैद्याला विचारून एवढी भीषण शिक्षा देण्यामागचे कारण तरी काय, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

''विशेष काही नाही. तो नुकताच न्यायालयातून परत आला होता. कधीकधी एखादी बस दुपारच्या जेवणाच्या वेळी परत येते. शक्यतो नेहमी असं घडत नाही... कदाचित, आज न्यायालयात खूप गर्दी असेल. कसेही असो – तपासणी करणाऱ्या सुरक्षारक्षकाला त्या कैद्याने त्याच्या अंतर्वस्त्रांमध्ये लपविलेले दोनशे बाथ सापडले. तो या विभागातला असल्यामुळे शिक्षा देण्यासाठी त्याला इकडे आणण्यात आले.''

''फक्त दोनशे बाथसाठी एवढी शिक्षा? म्हणजे, त्या रक्षकानं त्याला मरेपर्यंत मारलं ते फक्त त्याच्याकडे हे पैसे सापडले म्हणून? दोनशे बाथ

म्हणजे आठ डॉलर्ससुद्धा नाहीत. हे सगळं खरं आहे?'' फ्रेडची अस्वस्थता त्याच्या आवाजातून आणि हावभावांतून जाणवत होती. त्याने आधी आमच्याशी बोलणाऱ्या त्या परदेशी कैद्याकडे आणि नंतर माझ्याकडे पाहिले. मी एका जागी थिजून गेलो होतो.

''हो. एवढंच कारण होते. त्या विकृत माणसाचं डोकं फिरण्यासाठी एवढंही कारण पुरतं. तो मनोविकृत आहे, खरंच हाताबाहेर गेलेली केस. तो अशा प्रकारची कृत्यं कितीतरी वेळा करतो. दर महिन्याला त्याच्या विभागातल्या एकाचा तरी तो बळी घेतो आणि इतरांना त्रास देतो. आता ते सगळे जण त्याला एका पेटीत ठेवतील आणि तिथून तो पुन्हा जिवंत बाहेर पडण्याची शक्यता खूपच कमी आहे.'' त्याने अतिरिक्त माहिती पुरवली.

''ही पेटीची काय भानगड आहे?'' आम्ही दोघांनीही एकाच वेळी विचारले. आम्हाला सांगण्यात आले की, ही पेटी म्हणजे धातूचे आवरण असलेली बराक होती. जेमतेम चार फूट रुंद आणि चार फूट उंच. प्रत्येक विभागात अशा बराकी होत्या आणि विभाग क्र. ४च्या तुरुंगातील अशा किमान एका बराकीत कायम या नराधम सुरक्षारक्षकाच्या तावडीत सापडलेला कोणी ना कोणी कैदी असायचा.

''शरीराने कडक झालेल्या एका कैद्याला अशा पेटीतून बाहेर काढताना आज सकाळी मी स्वत: बघितलेले आहे,'' असेही त्याने आम्हाला सांगितले. ''हा नराधमच त्यासाठी जबाबदार होता. उद्या आणखी कुणी कैदी त्याच्या तावडीत सापडलेला नसेल, तरच आश्चर्य,'' अशी टिप्पणीही त्याने केली. त्याचे नाव आहे मॉंगखोन. मी तुमच्या जागी असतो ना, तर त्याच्यापासून शक्यतो चार हात दूरच राहिलो असतो. तो कधी कसा वागेल काही सांगता येत नाही, एवढा सटक आहे. अशा प्रकारच्या क्रौर्याच्या पातळीवर तो कधीही उतरू शकतो. त्यानं माझ्याबाबतीत असं काही कधी केलं, तर मी त्याच्या ××× मध्ये बांबू घालीन आणि नाकातून बाहेर काढेन...'' तो आम्हाला सावध करत होता.

''ओह शिट! कुठल्या जागी येऊन पडलोय आपण?'' फ्रेडच्या आवाजात कंप जाणवत होता. ''कैद्यांना मिळणारी अशा प्रकारची वागणूक तुरुंगाच्या बाहेर कशी कोणाला कळत नाही? ती नक्कीच बाहेर कळली पाहिजे. आणि नातेवाइकांचे काय? ते कधी तक्रार करत नाहीत? पेपरवाले

कधी असे प्रकार उघडकीस आणत नाहीत? जे मरतात, त्यांच्या मृतदेहांचे काय? या कैद्याच्या नातेवाइकांनी किंवा अन्य कोणीतरी त्याच्या जखमा पाहायला हव्यात. त्याचे दंड मोडलेत. आतली हाडं कोपरातून बाहेर दिसू लागली आहेत. त्याला एखाद्या ट्रकने धडक दिली असावी, असं वाटतंय. त्याच्या बरगड्या पण मोडल्या असाव्यात. या सगळ्याचा खुलासा कसा करणार? आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तो सध्या रिमांडवरच असेल. त्याचा खटला अजून पूर्ण झालेला दिसत नाही. नाहीतर त्याला न्यायालयात कशाला नेलं असतं?''

फ्रेड अगदी घाबराघुबरा झाला होता. अशा अवस्थेत गेलेला तो एकटाच नव्हता. आदल्या दिवशी न्यायालयातला गोंधळ पाहून आमच्या लक्षात आले होते की, आम्ही नजीकच्या भविष्यकाळासाठी तरी इथे पुरते अडकलो होतो. हा असा मनोविकृत माणूस आमच्या जोडीला असताना आम्हाला लढण्याचे बळही मिळणे अवघड होते.

आमच्या नव्या सहकाऱ्याचा उल्लेख यापुढे मी जॉफ हिगिन्स असा करणार आहे. आम्ही त्याला आमची ओळख करून दिली आणि हस्तांदोलन केले. जॉफ हा कॅनेडियन होता आणि सदा आनंदी प्राणी होता. जवळपास सहा फूट उंच. त्याच्या अंगावर जवळपास तीसेक किलो अतिरिक्त चरबी असावी. त्याच्या हाफपँटच्या कंबरपट्ट्यातून ती बाहेर ओंगळवाणेपणे ओघळत असायची. त्याला दोन अन्य कॅनेडियन्ससह हेरॉइन बाळगल्या-प्रकरणी कित्येक महिन्यांपूर्वी अटक करण्यात आली होती.

अर्थात जॉफही या प्रकरणात त्याच्या नशिबाचा खेळ म्हणून अडकला होता, अगदी फ्रेड आणि माझ्यासारखाच. त्याचे दोन सहकारी, त्यांना आपण केविन आणि डॅनिएल म्हणूया, अमली पदार्थ जवळ बाळगून असताना दुर्दैवाने जॉफ त्यांच्या सोबत होता. त्यांच्याकडे अमली पदार्थ असल्याचे त्याच्या गावीदेखील नव्हते. जेव्हा त्याला ते कळले, तेव्हा खूप उशीर झाला होता. त्या दोघांनी थायलंडमधील त्यांच्या सहलीमध्ये स्वत:साठी अगदी थोड्या प्रमाणात अमली पदार्थ खरेदी केले होते. त्यांचे दुर्दैव असे की, त्यांना ते विकणारा पोलिसांचा खबऱ्या होता.

''तुम्ही आत्ता बघितलात, तसा रानटीपणा नक्कीच सहन करण्याच्या पलीकडचा आहे. पण हे थाई पोलिसच कैद्यांना मारतात असं नाही,'' जॉफ

सांगत होता, ''माझ्या सहकाऱ्याचा इथे तुरुंगात आणल्यानंतर आठ दिवसांत मृत्यू झाला, तो अन्य कुणामुळे नव्हे, तर कॅनडाच्या दूतावासात खुर्च्या उबवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बेपर्वाईमुळे!''

''काय बोलतोस काय जॉफ?'' मला मोठा धक्का बसला होता. एखाद्या माणसाच्या देशाचा दूतावासच त्याच्या जिवावर कसा काय उठू शकतो, हा मला पडलेला प्रश्न होता. आपल्या देशाचा दूतावास म्हणजे आपण परदेशात असताना अडचणीत सापडलो, तर हक्काने मदतीची साद घालण्याची जागा, अशी बालिश समजूत माझी होती. जॉफने त्याची कहाणी सांगेपर्यंत ती कायम होती.

जॉफने त्याची हकीकत सांगायला सुरुवात केली. व्हॅंकूव्हरहून येताना विमानात त्याची तिशीतल्या केविनशी आणि त्याची प्रेयसी डॅनिएल हिच्याशी ओळख झाली होती. डॅनिएल पंचविशीची होती. रात्रीच्या मेजवानीचा बेत त्यांनी आखला होता आणि नंतर शहरातील मनोरंजनाचे कार्यक्रम पाहायला ते जाणार होते. संध्याकाळी सातच्या सुमारास बाहेर पडण्यासाठी तो हॉटेलातील त्या दोघांच्या रूमपाशी पोहोचला. एक ड्रिंक घेण्यासाठी त्यांनी त्याला आत बोलावले. तो हातात बिअरचा टिन घेऊन कोचावर विसावला. जेमतेम दहा मिनिटे झाली असतील नसतील, तोच दारावर टकटक झाली. केविनने दार उघडले, त्या वेळी सात पोलीस एकदम आत घुसले. दोघांच्या हातात पिस्तुले रोखलेली होती.

''त्या क्षणी माझी अक्षरश: बोबडी वळली. हे काय चाललंय, ते मला समजेचना. केविनलाही काही लक्षात येईना. डॅनिएल बहुधा मेक-अपसाठी बाथरूममध्ये गेली होती. बाहेरचा गोंधळ ऐकून तिने दार उघडले. एका पोलिसाने तिचा हात धरून तिला जोराने खोलीत ओढले. ती किंचाळली आणि केविनकडे धावली. मग दुसरा एक पोलीस केविनशी बोलला आणि ते खोलीची झडती घेणार असल्याचे त्याने स्पष्ट केले. मी आता पुरता हादरलो होतो. मी अजूनही कोचावर बसून होतो आणि एका पोलिसाने माझ्या डोक्यावर त्याची पिस्तूल रोखून धरली होती...'' जॉफ सांगताना घाम पुसत होता.

पोलिसांच्या झडतीमध्ये जे काही घडणे अपेक्षित असते, ते सर्व प्रकार तिथे घडले. त्यांनी जॉफचीही झडती घेतली, पण त्याच्याकडे काही आक्षेपार्ह

आढळले नाही. तो अमली पदार्थ घेत नव्हता आणि त्याच्या त्या दोन मित्रांकडे ते असल्याची कल्पनाही त्याला नव्हती, असे त्याने आम्हाला सांगितले. केविनच्या बॅगेत पोलिसांना अमली पदार्थांच्या पुड्या सापडल्या. ते पदार्थ त्याने खरेदी केलेले असून, जॉफचा त्याच्याशी काहीही संबंध नाही, असे त्याने परोपरीने पोलिसांना सांगून पाहिले, पण तरीही ते जॉफलाही पकडून पोलीस स्टेशनात घेऊन गेले. हेरॉइन बाळगल्याबद्दल त्या दोघांसह जॉफवरही गुन्हा दाखल करण्यात आला.

केविनला डायबेटिस होता आणि नियमितपणे इन्सुलिनची इंजेक्शन्स घ्यावी लागत होती, याचीही जॉफला आधी कल्पना नव्हती. झडतीमध्ये त्याच्या बॅगेत पोलिसांना इन्सुलिनची इंजेक्शन्स सापडली, पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यांचे उद्दिष्ट अमली पदार्थ शोधून काढणे, हे होते. त्या तिघांना पकडून पोलीस स्टेशनात नेल्यानंतर केविनला इंजेक्शन्सचा बॉक्स सोबत नेण्यास पोलिसांनी परवानगी दिली. दूतावासातील कोणीतरी पोलीस प्रमुखांना विनंती करून केविनला नियमितपणे इन्सुलिन घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला असल्याची माहिती दिली होती. दूतावासातील कोणी माणूस बँकॉकच्या पोलीस हॉस्पिटलमध्येही गेला आणि त्याने केविनला साधारणपणे महिनाभर पुरेल एवढा इन्सुलिनचा साठा आणून दिला.

''खरे सांगायचे तर तिथले पोलीस बरे होते. त्यांनी आम्हाला बरी वागणूक दिली. एकाने तर आम्हाला अमली पदार्थांचा एकेक घोट फुकट देण्याची ऑफरही दिली! खरं वाटेल का कुणाला?'' जॉफ सांगत होता.

त्यानंतर या तिघांची रवानगी बॉम्बॅट तुरुंगात झाली आणि परिस्थिती बिघडली. विभाग क्र. ३च्या मुख्य कार्यालयात या तिघांची नावनोंदणी सुरू असताना, तेथे असलेल्या सुरक्षारक्षकाला आपण परदेशी कैद्यांबाबत किती कर्तव्यकठोर आहोत, हे दाखविण्याची खुमखुमी आली. शिवीगाळ करीत तो कैद्यांच्या जवळील बॅगांतून वस्तू निष्काळजीपणाने हाताळून मुद्दाम खाली पाडत होता. केविनचे इन्सुलिनही त्याने जप्त केले. केविनच्या आरोग्याच्या दृष्टीने त्या इन्सुलिनची किती गरज आहे, हे त्या दोघांनी त्याला परोपरीने पटवून सांगण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! त्याने काहीही ऐकून घेतले नाही. वर त्या दोघांच्या अंगावर तो खेकसला. सामान उचलून पुढच्या विभागात शारीरिक तपासणीसाठी जाण्यास त्याने या दोघांना बजावले. डॅनिएल आधीच महिलांच्या लाडयो तुरुंगाकडे रवाना झाली होती.

‘‘आम्हाला वरच्या मजल्यावर नेऊन एका कोठडीत त्या रात्रीपुरते ठेवण्यात आले, तेव्हा केविन खरंच काळजीत पडला होता,’’ जॉफ सांगत होता, ‘‘त्याला इन्सुलिन मिळाले नाही तर त्याची काय अवस्था होईल, याची त्याला पूर्ण कल्पना होती. या तुरुंगात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी मला केविनची जरा जास्तच काळजी वाटायला लागली. म्हणून एका परदेशी कैद्याकडे मी मदत मागितली. त्याला भेटायला नियमितपणे काही लोक येत असत. त्यांना सांगून मी कॅनडाच्या दूतावासाला केविनची अवस्था कळविण्याची विनंती केली. त्याच दिवशी एक जण केविनला भेटायला आला आणि त्याची अवस्था पाहून त्याने तातडीने कॅनडाच्या दूतावासातील सल्लागार विभागातील सदस्यांना दूरध्वनी करून त्याविषयी माहिती दिली. केविनला वेळीच इन्सुलिन मिळाले नाहीतर त्याची अवस्था आणखी बिकट होईल, हे त्याने दूतावासातील अधिकाऱ्यांना सांगितले.

‘‘त्यानंतर काहीच झाले नाही. दूतावासाकडून कोणताही संपर्क झाला नाही. दोन दिवसांनी दूतावासात पुन्हा दूरध्वनी करून निरोप देण्याची व्यवस्था केली. केविन आजारी पडण्यास सुरुवात झाली असल्याचेही त्यांना सांगितले. दूतावासातील सल्लागारांनी तुरुंगाधिकाऱ्यांना फक्त एक दूरध्वनी करून केविनला इन्सुलिन पुरविण्याची सूचना करण्याची गरज होती. तरीही पुढे काहीच झाले नाही...’’ जॉफ त्या विदारक परिस्थितीचे वर्णन करीत होता.

‘‘चारच दिवसांत केविनची प्रकृती अतिशय बिघडली. दूतावासात पुन्हा दूरध्वनी करून विनंती करण्याचा निरोप मी त्या मित्रांना दिला. त्यांनी माझे काम केले आणि दुपारीच तसा निरोप देण्यासाठी ते माझ्याकडे आले. दूतावासातील सल्लागाराशी स्वत: बोललो असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, तो सल्लागार जरासा उर्मट आणि आगाऊ होता. केविनच्या स्थितीशी त्याला काही देणे-घेणे नसावे, अशा आविर्भावात त्याने उडवाउडवी केली होती. आपण काहीच करू शकत नसल्याबद्दल ते मित्रही अस्वस्थ झाले होते. त्याच्या दुसऱ्याच दिवशी केविन बेशुद्ध पडला.’’

‘‘ही परिस्थिती सहन करण्यापलीकडे चालली होती. सलग चार दिवस मी तुरुंगाच्या संचालकांशी बोलण्याचा प्रयत्न करत होतो. मी त्या नराधम माँगखोनशीदेखील बोलण्याचा प्रयत्न केला, केविनला रुग्णालयात नेण्यासाठीची व्यवस्था करण्यासाठीही मी ट्रस्टींकडे विचारणा केली. कोणीही

माझ्याकडे लक्ष द्यायला तयार नव्हते. त्यांना त्याच्या जिवाशी काही देणे-घेणेच नव्हते. अखेर तो कोसळल्यानंतर त्यांनी त्याला इथल्या रुग्णालयात नेले. 'रुग्णालय' फक्त म्हणण्यापुरते. तिथे नेल्यावर त्या मूर्खांनी सगळ्यात आधी काय केलं माहितेय? डायबेटिसविषयी शून्य माहिती असतानाही, त्या रुग्णालयात ऑर्डर्ली म्हणून काम करणाऱ्या एका बेअक्कल ट्रस्टीने केविनला ग्लुकोज दिले. केविनकडून जप्त करण्यात आलेले इन्सुलिन तेथे शेजारीच असतानादेखील! त्यानंतर काही तासांतच त्याचा मृत्यू झाल्याचे आमच्या कानावर आले...'' जॉफ ही कहाणी सांगताना घामाघूम झाला होता आणि त्याचा श्वासही जोरजोरात सुरू होता. तो खाली बसला आणि शर्टाच्या बाहीने त्याने चेहऱ्यावरचा घाम पुसला. आम्ही शांतपणे त्याच्या शेजारी बसलो.

''केविन रोज इन्सुलिन घेत होता. त्याला ॲटॅक आला, तेव्हा त्याच्या शरीरात भरपूर ग्लुकोज जमा झाले होते. त्यालाच 'हायपरग्लायकेमिया' म्हणतात. त्याला गरज होती इन्सुलिनची. पण त्यांनी त्याला त्याऐवजी पुन्हा ग्लुकोज दिले आणि त्याची प्रकृती आणखी बिघडली. सहा दिवस... सहा दिवस आमच्या भुक्कड दूतावासाच्या हातात होते, पण त्यांनी काहीही केले नाही. त्यांच्याकडून काय अशी मोठी अपेक्षा होती? तुरुंगाधिकाऱ्याला फक्त एक फोन करण्याची! त्याच्यासाठी फक्त इन्सुलिनची व्यवस्था करणे गरजेचे होते आणि दर महिन्याला त्याला हा साठा मिळत राहील, अशी व्यवस्था करायला हवी होती. त्याहून जास्त काही नाही. फोन करण्यासाठी त्यांनी दहा मिनिटं वेळ दिला असता, तर कदाचित केविन आज जिवंत असता!'' जॉफ हताशपणे सांगत होता... ''त्या बिचाऱ्याचा गुन्हा तरी काय होता? इथले नालायक सुरक्षारक्षक स्वत:च अमली पदार्थ विकतात. केविनच्या जवळ असलेलं इन्सुलिन त्यांना जप्त करण्याची काय गरज होती? या हरामखोरांना काय साध्य करायचं होते? त्या इन्सुलिनचं त्याला व्यसन लागेल असं त्यांना वाटत होते का? त्याला दुसरी काही व्यसनं नव्हती. मग त्यालाच अशी वागणूक का?''

फ्रेडला दिवसभरातला हा दुसरा मोठा धक्का होता. त्याची बोलतीच बंद झाली होती. तरीही कसाबसा धीर एकवटून तो पुन्हा म्हणाला, ''बापरे! स्लाय, पुन्हा काही तुझ्याबरोबर घर शोधायला येणार नाही रे बाबा!''

अर्थात त्यांच्या दूतावासाने केविनच्या मदतीसाठी काही प्रयत्न केलेच

नाही, असे मानण्यासाठी ठोस पुरावा आमच्याकडे नव्हता. कदाचित त्यांनी प्रयत्न केला असेल, पण त्यांना या भानगडीत न पडण्याच्या सूचना मिळाल्या असतील... कुणास ठाऊक? फ्रेड आणि मला आमच्या दूतावासावर विश्वास ठेवायला एवढा संशयाचा फायदा पुरेसा होता.

काही तासांनंतर आम्ही विभाग क्र. ४च्या सर्वांत वरच्या मजल्यावरील बराकीतील छोट्या जागेत त्या रात्रीच्या मुक्कामाकरिता परतलो. आम्ही आत येत असताना त्या मारहाण झालेल्या कैद्याच्या रक्ताचे ओघळ त्या मार्गावर दिसत होते. त्याला आत आणल्यानंतर जिन्यावरून खेचत वर नेण्यात आले असावे. त्याचे गुडघे आणि नडग्या त्या काँक्रीटच्या बांधकामावर ठिकठिकाणी घासल्या असाव्यात. व्हरांड्याच्या शेवटच्या टोकाला रक्ताचे ओघळ संपून रक्ताचा पाट तयार झाला होता. तिथे पाच पोलादी पेट्या दिसत होत्या. आम्हाला वर्णन करण्यात आलेल्या याच त्या पेट्या. प्रत्येक पेटीला वरच्या बाजूला सुमारे ६चौ.इंचाचा एक झरोका होता. पुढच्या बाजूला सुमारे १८ इंच रुंद आणि तीस इंच उंचीचे एक दार होते.

**दुसऱ्या दिवशी सकाळी ते दार उघडून त्याचा मृतदेह खेचून बाहेर काढण्यात आला. तो लाकडासारखा टणक झाल्याचे जाणवत होते. त्याला आत ढकलण्यात आले, त्याच स्थितीत त्याचे शरीर वाकले होते. तो गतप्राण झाला होता, पण काही वेळापूर्वीपर्यंत त्याच्या शरीरात प्राण असावा, असे जाणवत होते. पेटीच्या तळाशी रक्त ओघळून गोठले होते. त्याची आतडीही लोंबत होती. त्याला पेटीतून बाहेर काढल्यावर सहन होण्यापलीकडची दुर्गंधी वातावरणात पसरली. वाईट अवस्थेतील त्याचा मृतदेह आणि त्याभोवती घोंघावणाऱ्या माश्या आणि त्याला लागलेल्या छोट्या काळ्या मुंग्या, यामुळे आधीच उद्ध्वस्त झालेल्या आम्हाला आणखी काळोख्या दरीत फेकून दिल्यासारखे वाटले.**

त्यानंतर जेमतेम तीन आठवड्यांतच आम्हाला त्या विकृत माँगखोनने केलेले आणखी एक असेच कृत्य आणि आणखी एक भयानक अवस्थेतील मृतदेहाचे दृश्य पाहण्याची वेळ आली. दरम्यानच्या काळात कित्येक कैद्यांना रानटीपणे मारहाण झाली होती. माँगखोनच्या या विकृतीची लागण इतर अनेक सुरक्षारक्षकांनाही झाली होती.

अशा प्रकारचे मृत्यू आणि छिन्नविच्छिन्न मृतदेह यांच्याविषयी तुरुंगाचे

प्रशासन काय खुलासा करते, असा प्रश्न मला पडला होता. कार्यालयीन पातळीवर त्याचे काही परिणाम कसे उमटत नाहीत? काहीतरी अहवाल सादर करावा लागत असेल. किमान शवविच्छेदन तरी करावे लागत असेल, अशी माझी आणि फ्रेडची समजूत होती. तुरुंगात एवढे राजरोस चालणारे खून ही मंडळी पचवतात तरी कशी, हा प्रश्न मला सतावत होता.

काही कालावधीनंतर मला असे लक्षात आले की, बॉम्बॅट आणि माझी नंतर पाठवणी झालेल्या अन्य दोन तुरुंगांतही ज्या कैद्यांना बाहेरून फारसे कोणी भेटायला येत नसे, असे कैदी या सुरक्षारक्षकांच्या बेदम मारहाणीचे बळी ठरत होते किंवा रानटीपणाने झोडपले जात होते. ते या जगात अगदीच एकटे नसले, तरी त्यांना कोणीच भेटायला येत नसल्याची कारणे अनेक होती – त्यांचे कुटुंबीय किंवा मित्रमंडळी अतिशय गरीब घरांतील होती आणि तुरुंगापासून खूप दूरच्या ठिकाणी राहत असावीत. त्यामुळे त्यांना आपल्या माणसाला भेटायला येणे शक्य होत नव्हते. आपण भेटायला गेलो, तर कदाचित आपल्यालाही अमली पदार्थांच्या गुन्ह्यात गोवले जाईल, अशी दहशत त्यांच्या मनात होती. माझ्या बायकोच्या नातेवाइकांनीही असाच पवित्रा घेतला होता. माझ्या संपूर्ण तुरुंगवासाच्या काळात एकदाही ते मला भेटायला आले नाहीत. हे कैदी शेजारच्या देशांतून बेकायदा स्थलांतर केलेले नागरिकही असण्याची शक्यता होती. अशा अनेक गोष्टी होत्या. त्यामुळे त्यांच्या मृत्यूबद्दल कोणाला उत्तर द्यावे लागणार नव्हते. त्यांना झालेल्या जखमांबद्दल विचारणा झाल्यास, अपघात किंवा भांडणाचे कारणही देता येणे शक्य होते. विकृत अधिकाऱ्यांवर दोष कधीच येणार नव्हता. या मृतदेहांची विल्हेवाट कशी लावली जाते, हा प्रश्न मात्र माझ्या मनात कायम राहिला.

माझ्या संपूर्ण तुरुंगवासाच्या काळात मी अशी सुमारे ५० कैद्यांची हत्या झालेली पाहिली. त्यातील काही मी स्वत: डोळ्यांसमोर पाहिल्या, तर काही घटना मला अगदी जवळच्या लोकांनी पाहिलेल्या होत्या. त्याबद्दल कधी नियमानुसार काही कारवाई झाल्याचे एकदाही माझ्या कानावर आले नाही.

२१वी आवृत्ती


# आपण सारे अर्जुन




लेखक
व.पु. काळे


**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

संसार खरंच इतकं अवघड आहे का? माणसाला नेमकं काय हवंय? संपूर्ण आयुष्य संगीतमय करता येणार नाही का?
एखाद्या मैफीलीसारखं रंगवता येणार नाही का?
आपल्या जन्मापूर्वी हे जग होतंच. आपण मेल्यानंतरही जगाचा कारभार तसाच चालू राहणार आहे. या अवाढव्य रंगमंचावर' आपली एन्ट्री मध्येच केव्हातरीच होते आणि एक्झिट ही. हे नाटक किती वर्षांचं हे माहीत नाही. चाळीसी, पन्नासी, साठी, सत्तरी... सगळं अज्ञात. धडधाकट भूमिका मिळणार, की जन्मांधळेपणा, अपंगत्व, बुद्धीचं वरदान लाभणार की मतिमंद?
भूमिकाही माहीत नाही.
तरी माणसाचा गर्व, दंभ, लालसा.... किती सांगावं?
कृष्णानं बासरीसहीत आपल्याला पाठवलं पण त्या सहा छिद्रातून संगीत जन्माला येत नाही.
षड्रिपूंचेच अवतार प्रकट होतात.
स्वत:ला काहीही कमी नाही. स्वास्थ्याला धक्का लागलेला नाही. तरी माणसं संसार सजवू शकत नाहीत.
आपण सारे अर्जुनच




# एल्मर आणि विल्बर

पॅचवर्कवाला हत्ती करतो नाना गमती




लेखक : डेव्हिड मॅकी

अनुवाद : डॉ. वृषाली पटवर्धन

पृष्ठे ३२ । किंमत ₹ ६० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

एका घनदाट जंगलात राहणाऱ्या हत्तींच्या कळपातला एक-छोटा हत्ती एल्मर. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा वर्ण. इतर सर्व हत्तींप्रमाणे तो काळा-भुरा नव्हता; तर रंगीबेरंगी चिंध्यांपासून गोधडी बनवावी तशी त्याची कातडी होती. त्यामुळे इतर सगळे हत्ती त्याला पॅचवर्कवाला हत्ती असे म्हणत. त्याच्या अंगावर पिवळ्या धमक, लाल चुटुक, गुलाबी, नारिंगी, जांभळ्या, हिरव्या गडद निळ्या रंगांच्या पॅचवर्कची त्वचा होती आणि त्यामुळे त्या कळपात तो सर्वांपेक्षा वेगळा वाटे. त्वचेवरचे हे पॅचवर्कचे डिझाइन सोडले तर एल्मर इतर हत्तींसारखाच होता आणि इतर हत्तींबरोबर तो वेगवेगळे खेळ खेळण्यात, जमतीजमती आणि खोड्या करण्यात नेहमी पुढे असे.

अशी स्पेशल हत्तींबाबत त्याच्या आई-वडिलांच्या काय भावना असतील? असे मानू या की त्याचे आई-बाबाही त्याचे लाड करीत. तो जन्माला आला आणि त्याचा रंग काळाभुरा नाही तर आपल्यापेक्षा वेगळा आहे, तोही एकच एक नसून गोधडीसारखा चक्ठ्यापक्ठ्यांचा आहे, पॅचवर्कसारखा आहे. म्हणून त्याच्या आईला थोडे विचित्र वाटले. पण त्याच्या बाबांना मात्र तो एकदम आवडला. इतर सर्व हत्तींच्या बाळांमध्ये माझा पोर एखाद्या राजपुत्रासारखा, देवदूतासारखा देखणा आहे; म्हणून ते अभिमानाने त्याला जंगलात बरोबर नेत, आणि झाडाझुडपांची माहिती देत. त्यांची पिकलेली फळे कशी ओळखावी, फांद्या कशा वाकवाव्या, वाघ, सिंह, कोल्हे, हरणे वगैरे प्राण्यांबरोबर कसे वागावे, पक्ष्यांच्या आवाजावरून त्यांचा शोध कसा घ्यावा, शिकारीला येणाऱ्या माणसांना कसे चुकवावे याचे धडे देत... एकूण, काय तर इतर हत्तींच्या काळ्याभुऱ्या रंगांपेक्षा एल्मरची त्वचा पॅचवर्कसारखी असूनही त्याच्या आईबाबांना तो प्रिय असल्याने त्या हत्तींच्या कळपात एल्मरला कोणी कसलाही त्रास देत नसत किंवा तुच्छ मानत नसत. अर्थात कोणीतरी, कधीतरी त्याच्याशी छेड काढत नसे असे नाही; तेव्हा एल्मर त्या हत्तींना जशास तसे उत्तर देऊन आपले सामर्थ्यही दाखवून देत असे. नाही असे नाही.

असे माणसाप्रमाणेच हत्तींच्या बाबतीतही होत असणार.

– तर या जगावेगळ्या, पॅचवर्कवाल्या हत्तीच्या बाळाच्या काही गमतीदार गोष्टी डेव्हिड मॅकी या लेखकाने लिहून छान छान रंगीत चित्रांसह

बालवाचकांच्या हाती दिल्या आहेत. इंग्लंडमध्ये बालवाचक गेली २५ वर्षे या कल्पनारम्य गोष्टी वाचून हत्ती माझा दोस्त म्हणत त्यांचा आनंद घेत आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊसने हत्तींच्या गोष्टींचा पाच पुस्तकांचा संच नुकताच मराठी मुलांसाठी बाजारात आणला आहे.

हा पॅचवर्कवाला हत्ती एल्मर. त्याचा चुलत भाऊ विल्बर. या विल्बरची खासियत म्हणजे तो वेगवेगळे अवाज काढण्यात पटाईत असतो. तो जवळपास असला तरी, आवाज असा काढतो की ऐकणाऱ्याला तो खूप लांबून बोलतोय असे वाटते. कधी डावीकडून आवाज येतो; कधी उजवीकडून. त्यामुळे इतर हत्ती आणि वाघ, सिंह, वगैरे प्राणी गोंधळून जात. ''हाय एल्मर, मी इथे आहे.'' असे तो म्हणे, त्या आवाजाच्या दिशेने बघितले तर तेथे कोणीच नसे. ''वाचवा ऽ वाचवा. मी तळ्यात पडलोय...'' पण तळ्यात एल्मरला आपलेच प्रतिबिंब दिसते. तेव्हा इतर प्राणी त्याचा नाद सोडतात. ''आम्ही आता घरी जातो रे. तुला यायचे असेल तर लगेच ये. नाहीतर मग एकटा ये.''

''अरे, मला सोडून जाऊ नका. मी इथे झाडावर अडकून पडलोय. मला फांदीवरून खाली उतरता येत नाही.''

– तेव्हा विल्बर त्यांना खरोखरच झाडाच्या फांदीवर बसलेला दिसतो.

मग एल्मर आणि इतर हत्ती त्याला युक्तीने खाली घेतात.

हत्ती हा सर्वात मोठा, वजनदार प्राणी. पण जोराचा वारा आला तर तो उडतो देखील, असे म्हटले तर ते आपल्याला खरे वाटणार नाही. पण एल्मर आणि विल्बर आपल्या दोस्तांबरोबर एकदा खूप वादळी वारा आल्यावर गुहेत शिरतात. वाऱ्यामुळे आपण हवेत उडालो तर असे एल्मर म्हणतो तेव्हा एक पक्षी त्याला भित्रीभागुबाई म्हणून चिडवतो. त्यामुळे एल्मर गुहेतून तावातावात बाहेर पडतो. एल्मर विल्बरला सांगतो, ''आपण हवेतून उडतोय, वाऱ्यातून चाललोय असा आवाज काढ. म्हणजे सर्वांना वाटेल की आपण खरोखर हवेत उडतोय.''

विल्बरचा तसा आवाज ऐकून इतर हत्ती काळजीत पडतात. ''धावा धावा. मी हवेत वाऱ्यानं उडतोय. मला वाचवा.'' एल्मरचा ओरडा ऐकू येतो.

आता एल्मरला खाली कसे घ्यायचे? आपल्या पुढच्या हत्तीचे शेपूट

सोंडेने धरायचे, असे ठरवून एक मोठी रांग करण्यात येते. पण सोंड आणि शेपट्या एकमेकांत गुंतल्याने त्यांना तोंड उघडता येईना... तेव्हा एल्मर–विल्बर या दोघांनी आपल्याला मामा बनवले, आपल्याला फसवले, हे इतरांच्या लक्षात येते.

एकदा छोटू हत्तीचा टेडी बेअर तो सहलीला गेल्यावर हरवतो. तो जवळ असला तरच छोटूला झोप येते. तो नसल्याने खूप रात्र झाली तरी त्याला झोप येत नाही. तो रडत असतो.

एल्मर छोटूच्या आईला विचारतो, ''हा का असा रडतोय?''

''अरे, त्याचा टेडी हरवलाय. टेडीशिवाय छोटू झोपायला तयार नाही. म्हणून चाललीय रडारड.'' तेव्हा एल्मर आपला टेडी त्याला देतो. छोटू शांत होतो. झोपी जातो.

दुसऱ्या दिवशी टेडीला शोधायला एल्मर बाहेर पडतो. विल्बर, सिंह, वाघोबा, वगैरेंना तो टेडी दिसला का असे विचारतो. शोधता शोधता टेडीच्या रडण्याचा आवाज त्याला येतो. एका झुडपात त्याला टेडी बेअर दिसतो. ''मला छोटू हत्तीकडे जायचेय. मला त्याचा खूप आठवण येतेय. मला त्याच्याकडे घेऊन चल.'' टेडी बोलतोय हे बघून एल्मरला नवल वाटते. तर विल्बर टेडीसारखा आवाज काढतोय हे त्याच्या लक्षात येते. एल्मर, विल्बर मग टेडीला घेऊन गाणी म्हणत नाचत घरी येतात. छोटूला टेडी देतात. छोटूची आई एल्मर–विल्बरला खाऊ देते. असा हा टेडी स्पेशलही आपल्याला भेटतो.

एकदा एल्मर आणि विल्बर उडी मारण्याच्या स्पर्धेत चक्क आपल्या जंगलात आलेल्या कांगारूला भाग घ्यायला प्रोत्साहन देतात. नदीच्या एका काठावरून दुसऱ्या काठावर झेप घ्यायची असते. बाऊन्स आणि उडी एकच हे त्या कांगारूला ठाऊक नसते. एल्मरमुळे तो कांगारू त्या स्पर्धेत भाग घेतो आणि त्या स्पर्धेत बक्षीस मिळवतो.

एल्मर–विल्बर या हत्तींच्या पिलांच्या अशा गोष्टींच्या या पिक्चर बुक्समधील चित्रांची शैली आणि रंगसंगती अफलातून आहे. लेखन आणि चित्रांकन दोन्ही मध्ये डेव्हिड मॅकीची कल्पकता दिसते.


१०वी आवृत्ती

## स्वयंपाकघरातील नवा मित्र

# मायक्रोवेव्ह ओव्हन

लेखिका
राजश्री नवरे

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**





आज बहुसंख्य स्त्रियांना आपल्या नोकरी-उद्योग-व्यवसायाचा व्याप सांभाळतच घराकडे बघावं लागतं. त्यामुळे साहजिकच कमीत कमी वेळात सर्वांना आवडणारे स्वादिष्ट आणि घरातील सर्व वयोगटातील व्यक्तींच्या आरोग्याला पोषक असे पदार्थ कसे बनवता येतील याचा त्यांना विचार करावा लागतो. यासाठी या दशकात ज्या सुखसोई त्यांना लाभल्या, त्यातील मायक्रोवेव्ह ओव्हन ही एक महत्त्वाची सोय आहे असं म्हणायला हरकत नाही.

झटपट, स्वादिष्ट व आरोग्यास पोषक जेवण म्हणजेच मायक्रोवेव्ह कुकिंग' असा निर्वाळा आज स्त्रियांनी तर दिला आहेच, पण स्वत: काहीतरी खास पकवून घरातल्यांना खिलवणाऱ्या चोखंदळ पुरुषांनाही मायक्रोवेव्ह हे वरदान ठरले आहे.

या पुस्तकात मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये करावयाच्या अनेक शाकाहारी व मांसाहारी पाककृती दिलेल्या आहेत. त्यात रोजचे साधे पदार्थ, इतर प्रातांतील विविध पदार्थही आहेत. तसेच ओव्हन कसा वापरावा, तो हाताळताना कोणती काळजी घ्यावी. याविषयी लेखिकेने केलेल्या सूचना या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य आहे.

**३री आवृत्ती**

# आजीच्या पोतडीतल्या गोष्टी




मूळ लेखिका
सुधा मूर्ती


अनुवाद
लीना सोहोनी

**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

सुरस आणि चमत्कारिक गोष्टी ऐकायला कुणाला आवडत नाही? उन्हाळ्याच्या सुट्टीत कधी दिवसा, तर कधी रात्री आजी आपल्या नातवंडांना गोष्टी सांगत बसते. ही नातवंडं तिच्या खेड्यात आपली सुट्टी घालवायला आपल्या आजीकडे आलेली असतात. आजींनी आपल्या गोष्टींची पोतडी उघडल्यावर सगळेजण तिच्याभोवती गोळा होतात. आजीच्या पोतडीतून राजाच्या आणि भामट्याच्या, माकडांच्या आणि उंदरांच्या, अस्वलाच्या आणि देवाच्या अशा असंख्य गोष्टी निघतात. त्यात एक अस्वल खूप वाईट खीर खाऊन चिडतं, तर कधी गोष्टीतला माणूस इतका आळशी असतो की, समोर आग लागलेली असूनसुद्धा ती विझवण्याचे कष्ट घेत नाही आणि अखेर स्वत:ची दाढी पेटल्यावर घाबरतो! कधी एका राजकन्येचं कांद्यात रूपांतर होतं तर कधी एक राणी रेशमी वस्त्र बनवण्याच्या कलेचा शोध लावते.


प्राण्यांचे आणि माणसांचे विविध नमुने आपल्याला या गोष्टीतून भेटतात. आजीच्या या गोष्टी मनोरंजक तर आहेतच; पण त्या मुलांना खूप काही ज्ञान देऊन जातात.

चला, तर या गोष्टीचा आनंद लुटू या!




# लढा लोकपालचा...
## उद्रेक आम आदमीचा

४६ वर्षात दहा वेळा संसदेत मांडल्यावर
एक विधेयक मंजूर होते, त्याची कहाणी




लेखक : धनंजय बिजले

पृष्ठे २१० । किंमत ₹ २०० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

'लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा' हे पत्रकार धनंजय बिजले यांचे समकालीन भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचा सर्वंकष समाचार घेणारे पुस्तक प्रत्येक राजकीय-सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला प्रेरणा देणारे आहे. १९६८ साली संसदेत प्रथम लोकपाल विधेयक मांडण्यात आले. राजकीय, प्रशासकीय भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी नेत्यांवर आणि प्रशासकांवर अंकुश ठेवण्याच्या उद्देशाने केंद्रिय दक्षता आयोगाला काही अधिकार देणारे हे विधेयक पहिल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने १९६६ साली सुचवले. त्यानुसार लोकपाल विधेयक संसदेत मांडण्यात आले. (१९६८) १९६९ मध्ये लोकसभेने ते मंजूर केले; परंतु राज्यसभेने ते फेटाळून लावले. पुढे १९७१, १९७७, १९८५, १९८९, १९९६, १९९८, २००१, २००५, आणि २००८ असे नऊ वेळा ते विधेयक संसदेत मांडण्यात आले. पण प्रत्येक वेळी त्यात काही नवी कलमे सुचवून त्यांच्या परामर्शासाठी संसदीय समित्या नेमण्यात आल्या आणि संसदेत ते मांडल्यावर वेळकाढूपणा करून ते मंजूर करण्याचे टाळण्यात आले. ते मंजूर झाले तर खासदार, मंत्री, प्रशासक यांच्या चौकशीचे अधिकार लोकपालाला मिळतील आणि आपल्याला भ्रष्टाचार करण्यात अडसर येईल याची भीती खासदारांना मनोमन भेडसावत राहिली असणार असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही.

ऑगस्ट २०११ मध्ये अण्णा हजारे यांनी राजधानी दिल्लीत लोकपाल विधेयक संसदेने मंजूर करावे यासाठी उपोषण केले.

समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंह यादव यांनी म्हटले आहे की, ''लोकपाल विधेयक संमत झाले तर प्रशासनात सुधारणा होण्याऐवजी ते ठप्प होईल, कोणीही अधिकारी फाइलवर सही करणार नाही. सर्व लोकप्रतिनिधी भ्रष्ट आहेत असे या विधेयकाद्वारे गृहीत धरले जात आहे. पंतप्रधानांना देखील या विधेयकाच्या कक्षेत आणले जात आहे. ही फार मोठी चूक आहे. भविष्यात याचे गंभीर परिणाम होतील. लोकप्रतिनिधींचे अधिकार कमी करणारे हे विधेयक आहे.''

लोकपाल नेमण्यासाठी समितीची जडणघडण करणे, लोकपाल म्हणून कोणालाही नियुक्त करताना कोणती पथ्ये पाळणे, या समितीच्या कक्षेत कोणती प्रकरणे येतील, केंद्रीय गुप्तचर संस्थेसह पीसीआय वगैरे कोणत्याही तपास यंत्रणेला आदेश देण्याचे अधिकार लोकपालना असावेत की नाही,

भ्रष्ट व्यक्तींची चौकशी चालू असताना भ्रष्ट मार्गाने मिळवलेली मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार लोकपालना असावेत की नाही वगैरे बाबींचा खूप बारकाईने आणि तपशीलवार विचार करून शेवटी हे बिल जनमताच्या रेट्याने मंजूर झाले.

पत्रकार धनंजय बिजले यांनी या विधेयकाचे वेळोवेळी बदललेले मसुदे दिलेले आहेत. त्यामुळे चाळीस वर्षे ते का रखडत राहिले याची कल्पना येऊ शकते.


याशिवाय भारतात स्वातंत्र्योत्तर काळात गाजलेली भ्रष्टाचाराची प्रकरणे, (पृष्ठ १० ते २४) भ्रष्टाचार विरोधी समित्या व कायदे (२६ ते ४२), अण्णा हजारे यांचे कार्य, माहिती अधिकार वगैरे कायद्यांसाठी त्यांनी केलेली आंदोलने, भ्रष्ट मंत्र्यांवरील खटले, वगैरे तपशीलही या पुस्तकात देण्यात आलेले आहेत. त्यायोगे किती विविध पातळ्यांवर भ्रष्टाचारविरोधी लढा त्यांना करावा लागला हे लक्षात येते. भारतात लोकशाही जिवंत राहण्यासाठी सतत जागृत राहण्याची गरज आहे. हे पुस्तक या लढ्यात एक प्रभावी हत्यार म्हणून वापरता येईल.


**२७वी आवृत्ती**

# अमृतवेल

लेखक
वि.स. खांडेकर

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**



**१२वी आवृत्ती**

# काही खरं काही खोटं

कथा सुखाची.... दु:खाची
प्रेमाची... विरहाची
वेदनेची... अश्रूची
अश्रूमधल्या फुलाची
उपकाराची... अपकाराची
उद्वेगाची... आकांडतांडवाची
मुकेपणाने सोसण्याची
भुलण्याची... झुलण्याची
मोहधुक्यात हरवण्याची
सावध राहण्याची
सावज होण्याची
आयुष्य उधळण्याची
कातडी बचावण्याची
उजेडा... अंधाराची
उगवतीच्या क्षितिजाची
उदास सायंकाळची
जगताना मरण्याची
मरूनही उरण्याची
कथा वपुंची
तुमची आमची सगळ्यांची
जीवनाचे पुस्तक उघडल्याची
- दत्ता हलसगीकर




लेखक
व.पु. काळे

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व लेखक सीताराम पंडित खेर यांचे निधन

स्वातंत्र्यपूर्व काळात (१९३५ ते १९४७) मातृभाषेतून शिक्षण दिले जावे, असा आग्रह होता. खेर या मतांशी सहमत असल्याने, त्यांनी अर्थशास्त्रावरील पुस्तके मराठीत लिहिण्याचे व्रत घेतले होते. अर्थशास्त्रावरील त्यांची १८ मराठी पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अर्थशास्त्रातील नवनव्या विषयांवर त्यांनी मराठीत लिखाण केले आहे. ‘पैसा’ (१९५३) हे त्यांचे पहिले पुस्तक क्राउथर यांच्या An Outline of Money या पुस्तकावर आधारित आहे, त्यात त्यांनी पैशाची कार्ये, पैशाची अर्थव्यवस्थेतील भूमिका व परिणाम इत्यादी गोष्टींचे चांगले विश्लेषण केले आहे. ‘दारिद्र्याचा अर्थ’ या पुस्तकात त्यांनी भारतातील दारिद्य, त्याची कारणे, यांचा वेध घेतला आहे. अगदी अलीकडच्या काळातील ‘वित्तीय अरिष्टे, स्वरूप व उपाय’ (२०११) या पुस्तकात त्यांनी १९९७-९८ व २००७-०८ मध्ये आलेल्या जागतिक आर्थिक मंदीबद्दल भाष्य केले आहे. आग्नेय आशिया व अमेरिकेतील प्रस्थापित नियमांना झुगारून देऊन दिलेल्या गृहगहाण कर्जामुळे व त्याच्या रोखीकरणामुळे आलेल्या व संपूर्ण जगाला व्यापलेल्या अरिष्टांचे यथायोग्य विश्लेषण केले आहे. पैसावाद की केन्सवाद (१९८७), क्रांतिकारी अर्थशास्त्रज्ञ (१९८७), आर्थिक सुधारणांचे नवे पर्व (१९९३) वगैरे त्यांच्या पुस्तकांनी मराठी वाचकांचे आर्थिक घडामोडीचं आकलन समृद्ध केले.

खरे यांचा स्वभाव अबोल होता. त्यांनी कधीही व्याख्यानांची निमंत्रणे स्वीकारली नाहीत, की व्यासपीठावर उभे राहून व्याख्यान दिले नाही. या अबोलपणाबरोबरच त्यांच्यात पराकोटीची प्रसिद्धी पराङ्मुखता होती. त्यामुळे अर्थशास्त्रावर इतके समृद्ध लिखाण करूनही ते अप्रसिद्धच राहिले.

त्यांची अखंड व्यासंगी वृत्ती आणि लिखाणाची प्रवृत्ती ही त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत टिकून होती. भारतीय राज्यघटनेवरील त्यांचे शेवटचे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल, परंतु ते पहायला खेर मात्र नसतील!

## ख्यातनाम छायाचित्रकार गोपाळ बोधे यांचे निधन

हवाई छायाचित्रण हा प्रकार भारतात लोकप्रिय करणारे आणि या क्षेत्रात स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटविणारे ज्येष्ठ छायाचित्रकार गोपाळ बोधे (६६) यांचे नैनिताल येथे १७ मे रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी सुधा, एक पुत्र, सून आणि नातू असा परिवार आहे. बोधे हे छायाचित्रणासाठी जिम कॉर्बेट अभयारण्यात गेले होते. तेथे त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने उपचारासाठी नैनिताल येथे हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. बोधे हे निसर्ग आणि वन्यजीव छायाचित्रणही करत होते. मात्र ते लोकांपर्यंत पोहोचले ते हवाई छायाचित्रणामुळे. एखादी संकल्पना घेऊन तिच्यावर हवाई छायाचित्रण करण्यासाठी ते प्रसिद्ध होते.

## रुसी मोदी यांचे निधन



टाटा स्टील कंपनीला आपल्या कारकिर्दीत उत्तुंग स्थानावर घेऊन जाणारे, टाटा समूहातील आदरणीय व्यक्तिमत्त्व असलेले पद्मभूषण रुस्तमजी होमसजी ऊर्फ रुसी मोदी (९७) यांचे दि. १६ मे रोजी निधन झाले. १९८४ ते १९९३ या कालावधीत मोदी टाटा स्टील कंपनीचे अध्यक्ष होते. तत्कालीन मुंबई राज्यात १७ जून १९१८ रोजी पारशी कुटुंबात जन्माला आलेल्या मोदी यांचे शिक्षण हॅरो विद्यापीठात झाले. लंडनच्या ख्राइस्ट महाविद्यालयातून त्यांनी पदवी प्राप्त केली. १९३९ मध्ये ते तत्कालीन टिस्को (टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी) या टाटा समूहातील कंपनीत दाखल झाले. त्यानंतर ते तब्बल ५४ वर्षे टाटा समूहाच्या सेवेत होते.

मोदी यांचा जन्म त्यावेळच्या मुंबई प्रांतात १७ जानेवारी १९१८ रोजी

सर होमी मोदी व लेडी जेरबाई या पारशी दाम्पत्याच्या पोटी झाला. मोदी हे त्याकाळात मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. ते नेहमी विविध रंगाचे कपडे परिधान करायचे, त्यातून त्यांचा उत्साह प्रतीत होत असे. त्याकाळात पोलाद उद्योग मुक्त झालेला नव्हता, त्यामुळे स्पर्धा कमी होती.

रुसी मोदी १९७२ मध्ये टिस्कोचे अध्यक्ष असताना बोकारो येथे पहिला पोलाद प्रकल्प प्राधिकरणाने सुरू केला. भारतीय पोलाद प्राधिकरणाने १९७३ मध्ये राऊरकेला, दुर्गापूर व भिलाई येथे पोलाद प्रकल्प उभे केले.

रुसी मोदी यांचे व्यक्तिमत्त्व चतुरस्त्र होते. टाटा पोलाद समूहाने पोलाद निर्मितीच्या पलीकडेही वळून पहावे असे त्यांना वाटत होते. त्यांच्याच काळात 'वुई आल्सो मेक स्टील' हे वाक्य सर्वतोमुखी झाले. त्यांच्या आठवणी अनेक आहेत. एकदा त्यांनी न्याहरीच्या वेळी १६ अंडा ऑम्लेट सेवन केली होती. प्रख्यात वैज्ञानिक आइनस्टाइनच्या व्हायोलिन वादनाला त्यांनी पियानोवर साथ केली होती. त्यांचे वडील होमी मोदी हे संयुक्त प्रांताचे पहिले गव्हर्नर होते. त्यांचे शिक्षण हॅरो येथे झाले व नंतरचे शिक्षण ऑक्सफर्डच्या ख्राइस्ट चर्च कॉलेजात झाले. त्यांनी त्यांची पुतणी सिलू हिच्याशी विवाह केला.

रतन टाटा १९३७ मध्ये जन्मले, त्यानंतर दोन वर्षांनी १९३९ मध्ये रुसी मोदी टाटा स्टीलमध्ये आले. त्यांनी कंपनीत उत्साही अधिकारी तयार केले. जमशेदपूर येथील कारखान्यात त्यांचे कामगारांशी सौहार्दाचे संबंध होते. त्याकाळात पश्चिम बंगालमध्ये कम्युनिस्ट राजवटीत कामगारांचे संप सुरू होते. त्या काळात जमशेदपूर येथे कामगार जोमाने काम करीत होते.

१९७० मध्ये त्यांना सहसंचालक व नंतर सह व्यवस्थापकिय संचालक नेमण्यात आले. टाटा समूहातील कामाने त्यांना नावलौकिक मिळवून दिला.

१९९३ मध्ये टाटा समूहातून ते निवृत्त झाले व त्यावेळचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी त्यांना इंडियन एअरलाइन्स व एअर इंडियाचे सह अध्यक्ष नेमले. नंतर ते राजकारणात आले. त्यांनी झारखंडमधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली, त्यात ते पराभूत झाले. टाटा पोलाद कंपनीचे त्यांनी कठीण काळात नेतृत्व केले होते. ते उद्योगनिपुण समाजनिष्ठ माणसाचा आदर करणारे होते. त्यांनी टाटा फुटबॉल अकादमी व टाटा स्टील रुरल डेव्हलपमेंट सोसायटी या दोन संस्था स्थापन केल्या. टाटा कंपनी

केवळ पोलाद बनवत नाही तर माणसांचे जीवनमान सर्वांगाने सुधारण्यासाठी काम करते हे त्यातून सिद्ध केले. १९३९ मध्ये ते कंपनीत आले तेव्हा ८ लाख टन पोलाद निर्मितीची क्षमता होती, ते निवृत्त झाले त्यावेळी ही क्षमता ३० लाख टनापर्यंत पोहोचली होती. टाटा समूहाने त्यांना कामाची संधी दिली, संधीचे त्यांनी सोने केले, त्या अर्थाने ते पोलादी पुरुष होते.

## 'एअरबोर्न टू चेअरबोर्न'चे लेखक वैमानिक अनिलकुमार यांचे निधन

हवाई दलातील वैमानिक आणि परराष्ट्र धोरण क्षेत्रातील नामवंत लेखक एम. पी. अनिलकुमार यांचे खडकी येथील मिलिटरी हॉस्पिटलमध्ये निधन झाले. पंचवीस वर्षांपूर्वी घरी परतताना रस्त्यात झालेल्या अपघातात त्यांना कायमचे अपंगत्व आले होते.

मज्जारज्जूच्या कर्करोगाशी झुंज देत असताना ता. २० मे रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई, दोन बहिणी, आणि भाऊ आहेत.

अनिलकुमार राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) ६५व्या तुकडीचे विद्यार्थी होते. त्यांच्या तुकडीत त्यांना 'बेस्ट एअरफोर्स कॅडेट' चा सन्मान मिळाला होता. लढाऊ वैमानिक बनण्याचे स्वप्न उराशी बाळगत ते हवाई दलात दाखल झाले.

पंजाबमधील पठाणकोटजवळ अनिलकुमार यांचा १९८८ मध्ये अपघात झाला होता. रात्री विमानातून यशस्वी उड्डाण करून ते ऑफिसर्स मेसकडे जात होते. या अपघातात त्यांच्या मणक्याला जोराचा मार लागल्याने कमरेखालील भाग लुळा पडला होता. त्यानंतरही परिस्थितीशी जिद्दीने लढा देत त्यांनी तोंडात पेन धरून लिहिण्याचा सराव केला. स्टायलस आणि विशिष्ट प्रकारे बनविलेला कीबोर्ड त्यांनी संगणकाचाही वापर याद्वारे केला.

१९९० पासून ते खडकीतील पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये (पीआरसी) राहात होते. या काळात त्यांनी आपल्या जीवनावर आधारित 'एअरबोर्न टू चेअरबोर्न' या पुस्तकाचे लेखन केले. या पुस्तकाचा काही भाग महाराष्ट्र आणि केरळमधील दहावीच्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यांनी लिहिलेल्या लेखांवर आधारित पुस्तकाचे संपादन त्यांची बहीण डॉ. प्रीजा यांनी केले. त्याचे प्रकाशन केरळचे मुख्यमंत्री ओमेन चंडी यांनी नुकतेच केले होते. भारतीय हवाई दल आणि भारतीय लष्कराने अनिलकुमार यांचा विशेष पदकांनी गौरव केला होता.


११वी आवृत्ती

# पुण्यभूमी भारत

मूळ लेखिका
सुधा मूर्ती

अनुवाद
लीना सोहोनी

**किंमत : १३०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




‘लोक मला अनेकदा विचारतात, एवढ्या सगळ्या चित्रविचित्र गोष्टी नेमक्या तुमच्याच बाबतीत कशा काय घडतात?’ त्यावर त्या सगळ्यांना माझं एकच सांगणं असतं– जीवनाच्या या प्रवासात आपल्याला सर्वांनाच नानाविध माणसं भेटतात, कितीतरी अनुभवांना सामोरं जावं लागतं. त्यातले काही अनुभव आपल्याला स्पर्शून जातात, काही अंतर्बाह्य बदलूनसुद्धा टाकतात. तुमच्यापाशी जर संवेदनाक्षम मन असेल आणि तुम्ही या अनुभवांची नियमितपणे नोंद करून ठेवत असाल, तर तुमच्याही लक्षता येईल...तुमचा आयुष्य हासुद्धा एक विविध कथांचा खजिना आहे...’

खेड्यापाड्यात जाऊन तेथील गोरगरिबांसाठी, झोपडपट्टी-वासियांसाठी आणि सामान्य माणसांसाठी कार्य करीत असताना सुधा मूर्ती एक समाजसेविका, लेखिका, प्राध्यापिका या नात्याने सर्वांशी बोलतात, त्यांचं म्हणणं नोंदवून ठेवतात. त्या माणसांचा जीवनसंघर्ष, खडतर आयुष्य, त्यावर केलेली मात तर कधी मानलेली हार हे सगळं लेखिकेने आपल्या प्रवाही शब्दात या पुस्तकांतून मांडले आहे.

भारतीय समाजाचा आत्माच या पुस्तकाच्या रूपानं प्रकट झाला आहे.

१२वी आवृत्ती

# वन फॉर द रोड


लेखक
व.पु. काळे

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




उभ्या आडव्या महाराष्ट्रातच नव्हे तर त्याबाहेरही मराठीचे प्रेम जेथे जोपासले जाते तेथेही वसंत पुरुषोत्तम काळे हे नाव लोकप्रिय आहे. त्या नावाशी एक प्रतिमा निगडीत आहे. ती प्रतिमा म्हणजे त्यांच्या कथेचेच प्रतिबिंब आहे. इतकी ती कथा आणि तिचे लेखक आणि ती कथन करणारे कलावंत एकरूप झालेले आहेत. कथा पुण्या-मुंबईच्या मध्यमवर्गी मराठी माणसाची. तिला ग्रामीण मेकअपचा सोस नाही की अत्याधुनिकतेच्या होषात अंर्तमनात सूर मारून व्यथांचे पापुद्रे हाताळण्याचा तिला आपला खास अकृत्रिम ढंग आहे. ती साध्याही विषयात आशय शोधते आणि तो विनोदाच्या अंगाने सजवते. तिला व्यथा वर्ज्य नाही पण तिचे फार कौतुकही नाही. ती नॉर्मल माणसाची नॉर्मल कथा आहे.
ती त्याला खुलवते, हसवते सांसारिक आपदांचा विसर पाडते. म्हणून ती त्याला एवढी प्रिय. वसंत पुरुषोत्तम काळ्यांचा हा चोविसावा संग्रह.



# एल्मर आणि विल्बर

आज एल्मरला भेटायला विल्बर येणार होता. विल्बर हा एल्मरचा चुलत भाऊ. एल्मर त्याची वाटच पाहत होता.

''बापरे! विल्बरला खूपच उशीर झालाय. एव्हाना यायला हवा होता तो! कुठे हरवला तर नसेल ना? वाट चुकला असेल का?'' एल्मरला काळजी वाटायला लागली होती. ''चला – विल्बरला शोधायला जायला हवं'', असं म्हणून एल्मर निघाला.

''विल्बरला शोधू या, हे खरं – पण तो दिसतो तरी कसा?'' एका हत्तीनं एल्मरला विचारलं.



''मला वाटतं, आपण थोडं थांबून त्याची जरा वेळ वाट बघू या. कारण, हा विल्बर मोठा खोडसाळ आहे. वेगवेगळे आवाज काढून फार खोड्या करतो. तो



आवाजाचा जादूगारच आहे म्हणा ना! तो अगदी जवळपास असला ना, तरी तो असा काही आवाज काढून बोलतो की, आपल्याला वाटतं – हा खूप दुरून कुठून तरी बोलतोय.'' एल्मर म्हणाला.

''अस्सं? म्हणजे लपंडावच झाला की!'' विल्बरला शोधायला निघालेला हत्ती म्हणाला.

एल्मर आणि तो हत्ती हे सगळं बोलत असताना अचानक त्यांच्या कानांवर आरोळी आली. ''हाय एल्मर! मी इथे आहे.''

ते त्या आवाजाच्या दिशेनं धावले.

''मला शोधताय का?'' चक्क एक वाघ त्यांना विचारत होता.

''नाही रे – मला वाटलं, माझ्या भावाचाच आवाज आहे.'' एल्मर हिरमुसला होऊन म्हणाला. ''गंमतच आहे! एल्मर, नीट ऐक. कदाचित हा तुझ्या भावाचाच आवाज असेल. म्हणजे मला तरी

तोच ओरडतोय असं वाटतंय.'' वाघोबा म्हणाला.

''वाचवा ऽ वाचवाऽऽ मी तळ्यात पडलोय!'' असा आवाज त्यांच्या कानांवर आला.

''एल्मर – अरे, तोच तो असणार! मी बघितलं त्याला.'' एक हत्ती म्हणाला.

''काहीतरीच काय बोलतोयस? वेड्या, ते तुझंच प्रतिबिंब आहे. तूच दिसतोयस पाण्यात. बघ-बघ. विल्बर इथेच कुठे तरी असणार आहे. पण आवाज येतोय तिथे नक्कीच नसेल.'' एल्मर म्हणाला.



सगळे जण त्या आवाजाच्या दिशेनं शोधत राहिले. पण आवाज तर वेगवेगळ्या ठिकाणांहून येतोय, असं वाटत होतं. ''कुऽऽऽ– मी इकडे आहे.



हे बघ.'' असं ऐकेपर्यंत जोरात ''बूऽऽ'' अशी आरोळी आली की, हत्तींच्या कानठळ्या बसून त्यांनी उडीच मारली. एवढ्यात ससुल्या गडी त्यांच्या बिळातून बाहेर येऊन म्हणाले, ''गंमत नाही हो ही – बिलकुल गंमत नाही. सगळा वेड्यांचा बाजार आहे, झालं!''

एल्मर आणि त्याचे हत्ती दोस्त विल्बरला शोधून-शोधून दमले.

''जाऊ दे एल्मर, हा तुझा भाऊ काही सापडत नाही. चल, आपण परत जाऊ.'' एक जण म्हणाला. त्यावर एल्मरनं त्यांची समजूत घातली आणि तो मोठ्यांदा म्हणाला, ''विल्बर, आम्ही हरलो रे. जिथे असशील, तिथून बाहेर ये!''

''अरे, मी बाहेर येऊ शकत नाहीये. मी ना, इथे या झाडावर अडकून पडलोय. चिकटलोय मी!'' झाडावरून विल्बरचा आवाज आला. सगळे हत्ती जोरजोरात हसले.'' ''हा विल्बर फार चतुर आहे बरं!'' एक हत्ती म्हणाला.

''विल्बर, आता तू आला नाहीस, तर तुला न घेताच आम्ही घरी जाऊ हं.'' एल्मर म्हणाला.

''अरे, मी खरंच झाडावर चिकटून बसलोय. शप्पथ!'' विल्बरचा आवाज आला.

सगळे हत्ती पुन्हा हसले.

एवढ्यात एक जण म्हणाला, ''एल्मर, हा तुझा विल्बर काळा आणि पांढरा आहे का रे?''



''हो. पण तू असं का विचारतोयस?'' एल्मर म्हणाला.

''नाही... म्हणजे, मी हळूच डोकावून पाहिलं, तर तो खरंच झाडाच्या फांदीला चिकटून बसलेला



मला दिसला!'' तो हत्ती उत्तरला.

त्या सरशी सगळ्यांनी वर पाहिलं.

तर काय, विल्बर खरोखरच झाडावर होता!

''अरे विल्बर, पण तू असा झाडावर कसा काय गेलास?'' एल्मरनं विचारलं.

''अरे, वर कसा आलो, ते सोड. आधी मला खाली कसं उतरवायचं, ते बघ.'' विल्बर म्हणाला.

एल्मर म्हणाला. ''मला तर काहीच कळत नाहीये. पण आता आम्हाला भूक लागली. तेव्हा आम्ही आधी घरी जाऊन चहा-पोहे खाऊन येतो. आता तू कुठे आहेस, ते तर कळलंय; त्यामुळे ती काळजी नाहीये. बरं, अच्छा, आम्ही जातो. आता उद्या भेटू. बाय!'' असं म्हणून तो सगळ्यांच्या पुढे निघाला.


''एऽ एल्मर – मला सोडून नका ना जाऊ. मला पण खूप भूक लागलीय. मला उतरवा ना – तुमच्याबरोबर यायचंय मला.'' आता मात्र विल्बर रडवेला झाला होता.

''हंऽ कशी एका मुलाची गंमत केली!'' एल्मर हसत-हसत म्हणाला आणि मागे फिरला. ''आम्ही तुला एकट्याला सोडून कसे जाऊ?

तुला खाली उतरायचं आहे ना? मग असं कर – झाडाच्या त्या फांदीवरून हळूहळू खाली यायला लाग. तुझ्या वजनानं ती फांदी वाकेल आणि मग आम्ही ती सोंडेने धरू. त्या फांदीला धरून उतर.'' एल्मरनं युक्ती सांगितली.



''ओके'' असं म्हणत विल्बर फांदीवरून खाली यायला लागला. त्याच्या वजनानं फांदी वाकायला



लागली. सगळ्या हत्तींनी सोंडेनं ती फांदी बाहेर खेचली आणि विल्बरची सुटका झाली.

तो जमिनीवर अलगद उतरला.

''थँक्स दोस्तांनो, तुम्ही मला किती मदत केलीत!'' विल्बर म्हणाला. ''अरे, पण ते चहा-पोह्याचं काय म्हणत होतात? ते कुठं आहेत?'' असं म्हणत तो हत्तींच्या कळपात शिरला आणि सगळेजण हसत-खेळत, उड्या मारत, गमती करत घराकडे निघाले.

रात्र झाली. सगळ्यांनी आपापल्या गाद्या घातल्या. उशी-पांघरूण घेऊन सगळे झोपायच्या तयारीला लागले. ''गुड नाईट विल्बर, गुड नाईट मून'' असं म्हणून एल्मरनं अंगावर चादर घेतली. ''गुड नाईट दोस्तांनो, गुड नाईट. स्लीप टाईट. स्वीट ड्रीम्स...'' असा आवाज सगळ्यांना ऐकू आला. जणू काही चंद्रच बोलत होता! एल्मर हसला आणि हळूच म्हणाला, ''ए विल्बर, तू त्या झाडावर कसा चढलास? सांग ना–'' पण तोवर विल्बर गाढ झोपला होता.

